# माणूस

शनिवार
२० नोव्हेंबर १९७१
पन्नास पैसे

७५ पैशांवर मजुरी दिली जाऊ नये
अशी परवाच 'शहादे' भागात
दवंडी पिटली गेली म्हणे........



# माणूस

दशकपूर्तिनिमित्त

# रुपया पुस्तक योजना

## माणूसची ५ वर्षांची
## १०० रुपये वर्गणी भरल्यास

| | | |
|---|---|---|
| राजा शिवछत्रपती* | ब. मो. पुरंदरे | ३०—०० |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे | ३—५० |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ३—५० |
| शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३—०० |
| मुजऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | ३—०० |
| कधी आणि कोठेतरी | डॉ. सुधीर फडके | १२—०० |
| रातराणी | विजय तेंडुलकर | १२—०० |
| शतपावली | रवींद्र पिंगे | १२—०० |
| पूर्णिया | अनिल अवचट | ६—०० |
| श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५—०० |

## ही दहा दर्जेदार पुस्तके
## प्रत्येकी एक रुपयास मिळतील

योजनेच्या सविस्तर तपशीलासाठी कव्हर पान तीन पहा.

* पाचवी प्रतिष्ठान आवृत्ती

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २० नोव्हेंबर १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | पंचवीस | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## सप्रेम नमस्कार...

□ आपला 'माणूस'चा दिवाळी अंक आताच माझ्या वाचनात आला. त्यातील श्री. रवीन्द्र पिंगे यांचा 'चंद्रोदय चंद्रास्त' हा बालगंधर्वांवरील आत्मचरित्रपर लेख वाचला. त्यातील 'चंद्रास्त'मधील लेखात, एका गोष्टीचा मला उल्लेख करावासा वाटतो. श्री. पिंगे लिहितात, की गोहरबाईने, मराठी नाट्य परिषदेचे रु. १००१।– व श्री. पृथ्वीराज कपूर यांचे रु. ५००।–, कमी रक्कम म्हणून परत केले. परंतु आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे, आम्ही आमच्या 'ॐ कला मंदिर' या संस्थेतर्फे दिलेले रु. १००१।– त्यांनी आनंदाने स्वीकारले. मुद्दाम लिहिण्याचे कारण, की ज्यावेळी मदतीसाठी 'वेबंदशाही' नाटकाचा प्रयोग, भांगवाडी, प्रिन्सेस स्ट्रीट, येथे केला, त्याचवेळी मराठी नाट्य परिषदेनेही, मला वाटतं थोड्या दिवसांच्या फरकाने, शिवाजीपार्कवर मोठा समारंभ योजला होता आणि या दोन्ही समारंभावर थोडीफार उलटसुलट चर्चा झाली होती.

वास्तविक दुर्दैवाने मी बालगंधर्वांचे कोणतेही नाटक पाहिले नव्हते, अगर त्यांच्याबद्दल मला काहीही माहिती नव्हती. परंतु Indian Express मधील श्री. कमला मन्कीकर यांचा लेख वाचून आम्ही नाटकाचा प्रयोग लावला व बालगंधर्व आणि गोहरबाई मुद्दाम उपस्थित होते.

आम्ही सामान्य माणसांनी केलेल्या कामाचे त्यांनी खूप कौतुक केले. श्री. बाळासाहेब भारदे प्रमुख पाहुणे होते. आचार्य अत्रे व श्री. शाहू मोडक काही कारणामुळे येऊ शकले नाहीत. प्रयोग दि. १८-२-६४ रोजी झाला होता.

आतापर्यन्त मला याचे फारसे कौतुक वाटले नव्हते. परंतु श्री. पिंगे यांचा लेख वाचल्यानंतर त्याचे महत्त्व पटले, की त्यांनी आमची अल्पशी भेट स्वीकारून आम्हाला उपकृत केले, याची मला नेहमी सुखद आठवण राहील. त्यानंतरसुद्धा गोहरबाईंनी माझ्याशी प्रेमाचे आणि आपुलकीचे संबंध शेवटपर्यंत ठेवले होते.

२७ ऑक्टोबर, १९७१ (कु.) सिंधू काटदरे, माहीम, मुंबई.

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# वनवासी व वर्गविग्रह

अॅड. तु. ज. पटेल

साप्ताहिक 'माणूस'च्या दि. १४।८।७१ च्या अंकात शहादे तालुक्यातील वन्य जमातीविषयी (त्यांत 'आदिवासी' शब्द वापरला आहे, पण 'वन्य' हा जास्त समर्पक वाटतो.) लिहिताना लेखकाने त्या भागातील श्रीमंत गुजर समाजासंबंधी वास्तवतेला सोडून विधान केले आहे. वस्तुत: हे गुजर बहुतांशी पोटापाण्यापुरते कमवतात, काही थोडे सधन असतीलही; पण ५०० एकरवाला तर हल्ली शोधून सापडायचा नाही. याला अपवाद फक्त डॉ. विश्राम हरी यांचा आहे. गुजर मध्यमवर्गीयच असून त्यांचेकडे प्रत्येकी ५ ते ५० एकरापर्यंत जमिनी आहेत. हे लोक आपले आटोपशीर संसार कसे टिकवतात याला त्यांच्यातील अंगभूत गुणच कारणीभूत आहेत. हे लोक काही शतकांपूर्वी गुजरातेतून या भागात आले तेव्हा सातपुडा परिसरात सर्वत्र झाडी अथवा माळरान अशी कित्येक हजार एकर जमीन पडीक दिसली. ती पाहून शेतकी करायची त्यांनी जिद्द धरली. आणि खूप कष्ट उपसून झाडी तोडून ती जमीन नांगरटी वगैरे करून पिकाला लायक केली. नंतर त्या लोकांनी गावेच्यागावे वसवली: आणि आपल्या संस्कृतीचा ठसा उमटवला. गुजर लोक पूर्वापार शांत वृत्तीचे, शाकाहारी, निर्व्यसनी, साक्षर, आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे उद्याची चिंता वाहणारे. या त्यांच्या गुणसमुच्चयामुळे त्याची अधोगती होऊ शकली नाही. त्यांनी कोणाच्या जमिनी हिसकावून घेतल्या नाहीत. याउलट याच भागातील वन्य जमाती, ज्या पूर्वीपासून वस्ती करून राहात आल्या, त्यांच्यात शिकार वगैरे करून उदरनिर्वाह करण्यापलिकडे जमिनी पिकवण्याचे धोरण अभावानेच. त्याऐवजी दारूबाजी, अडाणीपणा, कर्जबारीपणा वगैरे अवगुण भरपूर प्रमाणात त्यांच्यात असून आजच्या पुरतेच पाहण्याची वृत्ती प्रबळ. हा मूलभूत फरक या दोन्ही संन्निध राहणाऱ्या समाजाच्या दरम्यान आहे. दोन्ही समाजांमध्ये परस्परपूरक असा संबंध निर्माण होऊन तो आजवर टिकून आहे.

वन्य जमातींपैकी बऱ्याच लोकांना व इतरांना ब्रिटीश सरकारने १९३२ पूर्वीच झाडीतील सुमारे ३७ हजार एकर जमीन नवीन शर्तीने वाटून दिली. पण त्या

वन्य लोकांपैकी बरेच जण त्या जमिनी स्वत: न करता वन्येतरांकडूनच करून घेत. त्यासाठी आगाऊच खंड घेत असत. हल्लीही ही प्रथा चालू आहे. जमिनी जुन्या शर्तीच्या झाल्यावर तर पुष्कळांनी त्या विकल्यादेखील. ही थोडक्यात वन्य शेतकऱ्यांची पार्श्वभूमी आहे.

अलीकडे बहुसंख्य वन्य लोक गुजरांच्या जमिनीवर मोलमजुरी करून पोट भरतात. त्यांना वेतनही योग्य प्रमाणात मिळते. सालोसाल पगारवाढही मिळते. शिवाय धान्य माफक दरात मिळते. या समाधानकारक व्यवस्थेमुळे वन्य लोकांना असंतोषाला कारण मुळी नाहीच.

अशा प्रकारे दोन्ही समाज शेजारी शांततेने नांदत असता गेल्या वर्षापासून त्यांच्या दरम्यान जो काही ठिकाणी संघर्ष पेटलेला दिसतो तो बाहेरून ठिणगी पडल्यानेच. यापूर्वीही, सुमारे १५ वर्षे झाली. त्या भागात बाहेरूनच जाळ करण्यात आला होता. त्यावेळीही अनेक अनिष्ट घटना घडल्या. पण शासनाने कडक पावले उचलल्याने तो जाळ शमला. पुन्हा त्याचीच पुनरावृत्ती होत आहे आणि त्यास कारणीभूत वन्य जमातीमधील अंबरसिंग आणि त्यांचे काही हस्तक आहेत, अशीच भावना शहादे भागात बद्धमूल झाली आहे.

अंबरसिंग व शहादे भागातील अलिकडे वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या ठळक घटना घटना याबाबत आम्हास माहिती मिळाली ती अशी –

अंबरसिंग हा पाडळदे गावचा. सर्वोदयात ड्रायव्हर होता. नंतर कार्यकर्ता झाला. त्याने सर्वोदयी कार्यकर्त्यांच्या आशीर्वादाने स्वतंत्र वन्य जमातीची संघटना सुरू केली. स्वत:ला सर्वोदयी कार्यकर्ता म्हणवत असूनही त्याने आपल्याच गावात शेतकरी व भिल्ल यांचे दरम्यान तेढ निर्माण केली. आणि वातावरण सतत तंग ठेवत राहिला. एकदा तर त्याने जाहीरपणे, 'नागालँड करून टाकीन', अशी मांडी ठोकून गावकऱ्यांना धमकी दिली. गुजर गावकरी फौजदारीला घाबरतात हे पाहून त्या तंग वातावरणात भिल्लांना चिथावणी देऊन त्यांच्या झोपड्या (आतील सामान हलवून) जाळून टाकविल्या आणि ते किटाळ गावच्या गुजर शेतकऱ्यांवर लादले. तहसीलदार वन्य जमातीपैकी ! त्याने चटकन् भिल्लांना भरपूर भरपाई देऊन टाकली ! झोपड्या जाळल्या, तेव्हा खुद्द फौजदारही हजर होता. ही घटना जानेवारीत झाल्यानंतर खटला भरला. त्यांत अंबरसिंगही आरोपी आहे. या घटनेनंतर २ मे रोजी पाटीलवाडीची दुर्घटना झाली. पाटीलवाडी ही रानांतील एक वस्ती. शहादा या तालुक्याच्या गावापासून सुमारे १० मैलांवर वन्य जमातीच्या वस्त्यांनी व गावांनी वेढलेली. पाटीलवाडीस फक्त एकमेव बिगरवन्य शेतकरी– डॉ. विश्राम हरी पाटील. ते स्वत: शहाद्यालाच राहातात. मुलगा पाटीलवाडीस असतो. त्या सकाळी ८ चे सुमारास पाटीलवाडीस सुमारे एक हजार सशस्त्र वन्य लोकांनी वेढा घातला. मोटार बसेस रोखून धरल्या. प्रथम १५।२० जण आत शिरले व

पाटलांच्या मुलाकडे धान्य मागू लागले. नकार मिळताच, दरडावून किल्ल्या मागितल्या. गांभीर्य ओळखून मुलाने कोठाराच्या किल्ल्या दिल्या. लगोलग सर्व जमाव आत शिरून त्यांनी पद्धतशीरपणे सुमारे १०० क्विंटल धान्य लुटले. तोपर्यंत पाटील सक्त नजरकैदेत ! लुटण्याचा ' कार्यक्रम यथासांग पार पाडल्यानंतर लोक आपापल्या गावी गाठोडी घेऊन निघाले. काहींना रस्त्यात पोलिसांनी पकडले. आणि जवळच्या म्हसावद गावी नेले. हां हां म्हणता वनवासी गोळा झाले. तीन हजारांचा जमाव झाला. अटक केलेल्यांना सोडा म्हणून दडपण येऊ लागले. अटकेत वन्य आमदाराचाही मुलगा आहे. त्यास अटक करताना त्याने चाकू उगारले होते. म्हसावद गावचे गुजरही काही प्रमाणात जसा झाले. वनवासी गाव जाळायचा कट करू लागले. त्यावर गुजरांनी पाण्याची व्यवस्था करून ठेवली. वनवासी जमाव सशस्त्र होता, पण पोलीसपार्टी तोकडी. बाकी आरोपींना अटक करता आली नाही. शेवटी दोन दिवसांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी आल्यावर त्याने गोळीबाराचा इशारा देताच वनवासी पांगले आणि मग बाकी आरोपींना अटक करता आली. काहीं गुजरही अटकेत ठेवले. त्या गडबडीत एक भिल्ल ठार मेला. काहीं गुजर व इतरांनाहीं गोळ्या व तीर लागले आहेत.

अंबरसिंगने सर्वोदयी मुखवटा चढवून शहादे तालुक्याबाहेर वावरायला सुरुवात केली आहे. त्याकामी तो इतर सर्वोदयी मंडळींचे साहाय्य घेतो. सर्वोदय केंद्राचे हिशेबाचे घोटाळे कित्येक असून त्याची माहिती अंबरसिंगला असल्याचे ऐकिवात आहे. त्यामुळेच इतर कार्यकर्ते अंबरसिंगची तळी उचलून धरतात व काही विपरीत झालेच तर रान उठवून सरकार दरबारी रदबदली करतात—असे म्हटले जाते. या इसमाने पुणे-मुंबईला सभा घेऊन वनवासींवरील खटले काढून घ्यायची मागणी केली आहे. पण तसे करायला ज्योती बसूचाच भाईबंद गृहमंत्री पाहिजे· वनवासींवर अन्याय झाला, मदत करा,—अशी हाकाटी करून हा अंबरसिंग सर्वोदयाच्या कृपेने जनतेकडून मदत गोळा करीत सुटला आहे. पण जनतेने वस्तुस्थिती जाणून घेतली पाहिजे. नाहीतर अपात्री दान पडेल. याबाबत आश्चर्याची गोष्ट ही की सर्वोदयी मंडळींनी अंबरसिंगची तळी उचलून धरताना सत्याचा बळी दिला आहे.

हा अंबरसिंग शहाद्याबाहेर सर्वोदयी मुखवटा चढवतो. गावी मात्र त्याचा डॉ. जेकीलचा भेसूर अवतार सर्वांना परिचित आहे. त्याची नक्षलवादी पत्रे मी स्वतः पाहिली आहेत. पोलिसांनी पाहिलीत. पाटीलवाडी प्रकरणात त्याचा हात असेल तर त्याला का अटक नाही ? असा सोईस्कर सवाल ' माणूस 'कार करतात. त्याचे काही चेले आहेत. त्यांचेमार्फत बेमालूमपणे जणू ' आपण त्या गावचे नव्हेत ' अशा अविर्भावाने तो कामे करून घेतो असे म्हणतात आणि ती गोष्ट शक्य आहे. अंबरसिंग पाटीलवाडी प्रकरणी गोवला नसला, तरी पोलिसांच्या अखत्यारीतील काहीतरी कारवाई अंबरसिंगबाबत होणार आहे असे ऐकिवात आहे आणि खरोखरच

पोलीसांनी मनावर घेऊन काही कारवाई केल्यास वन्य समाजात शांतता पुनः प्रस्थापित होईल याबद्दल स्थानिक जनतेला खात्री वाटते.

वरील विवेचनावरून एक गोष्ट उघड आहे की, वन्य जमातींविरुद्ध अन्याय झाला म्हणून हाकाटी वर्तमानपत्रातून आजकाल आपण वाचतो. ती केवळ राजकीय असून तिला सामाजिक अथवा वास्तविक असा कोणताही आधार नाही. तसा अन्याय झाला असता, तर शतकानुशतके ही वन्य मंडळी गुजर मंडळींशेजारी नांदलीच नसती. कधीच त्याचा उद्रेक होऊन गेला असता. दोन्ही जमाती दरम्यान वर्गविग्रह भडकावा असेच विचार लाल निशाणवाल्यांइतकेच सर्वोदयी मुखवटा चढवलेल्या मंडळींचेही आहेत व त्या दिशेनेच त्यांची पावले पडत आहेत.

गरिबी हटाव, झटपट समाजवाद यासारख्या भव्य, सवंग आणि आकर्षक घोषणांबरोबरच ' वनवासी जागा व्हावा ' अशा आशयाच्या चिल्लर उप-घोषणा करण्याची व त्यासाठी दौरे काढायची राजकीय पुढारी काय, परंतु पत्रकार व साहित्यिकांच्यामध्येदेखील अलीकडे जणू शर्यतच लागली आहे ! तथापि बहुतेकांची दृष्टी राजकारणनिरपेक्ष अशी दिसत नाही. वन्य जमातींचा प्रश्न राजकारण बाजूस ठेवून खोलवर अभ्यासल्यास सुटण्यासारखा असून तोच मार्ग चिरंतन कल्याण करणारा व सर्वोदयकारी ठरणार आहे.

वन्य नेत्यांचा डोळा डॉ. पाटील यांच्या मोठ्या शेतीवर आहे, हेच कारण पाटलांच्या कोठारावर धाड घालण्यामागे आहे. पण ही मोठी शेती त्यांना फुकट मिळाली नाही हे त्यांनी लक्षात घ्यावे. अमेरिकेहून शेतकी व दुग्धव्यवसाय या विषयात एम्. एस्.सी., पी. एच्. डी. पदवी संपादन करून डॉ. विश्राम सन १९३२ मध्ये भारतात आले. त्यावेळी त्यांना सहज मोठ्या पगाराची व मानाची सरकारी नोकरी मिळाली असती. पण त्याऐवजी त्यांनी आम शेतकरी जनतेपुढे आदर्श शेतकरी निर्माण व्हावा यासाठी जमिनीची मागणी केली. त्याप्रमाणे ब्रिटिश सरकारने सातपुडा-पायथ्यावरची ५०० एकर फॉरेस्ट जमीन त्यांना खंडाने दिली. डॉक्टरांनी आपली दुसरी जमीन विकून आलेला पैसा फॉरेस्ट साफ करून ती पिकाऊ करण्याचे कामी ओतला. अशा प्रकारे तयार झालेली शेतजमीन त्यांनी आदर्श बनवली. त्या जमिनीवर सुधारणेसाठी डॉक्टरांनी खर्च केलाच, पण नंतर कालांतराने सरकारकडे निर्धारित किंमत भरून ती जमीन मालकी हक्काची करून घेतली. म्हणजे कूळ मालक झाले. हा प्रचंड फार्म डॉक्टरांनी वाटून द्यावा अशी वन्य पुढाऱ्यांची आंतरिक इच्छा. तिची परिपूर्ती होऊ शकत नाही. पण त्याआधी वन्य पुढाऱ्यांनी आत्मसंशोधन केल्यास त्यांना समजून येईल, की कितीतरी वन्य मंडळींना बऱ्यापैकी जमिनी असूनही ते अपेशी शेतकरी ठरले आहेत आणि त्याला कारण त्यांच्या ठायी असलेले दुर्गुण. वन्य जनतेची सुधारणा न करता त्यांना पुन्हा जमिनी वाटून दिल्या तर जुन्या अनुभवाचीच पुनरावृत्ती होईल यात शंका नाही.

आणि त्यामुळे उत्पादनावर अत्यंत विपरीत परिणाम होईल. तात्पर्य हे, की ही व्यवस्था सर्वांना मारक अशीच होईल. आमच्या गावच्या वन्य कोतवालाने आपली इनामी जमीन कधी स्वत: केली नव्हती, विकूही शकत नव्हता. पण कायद्याने पूर्ण मालक बनताच त्याने ती जमीन फुकून टाकली आणि आलेला पैसा २।३ महिन्याच्या अल्पावधीतच दारू, जुगार, हॉटेल वगैरे व्यसनापायी घालवला आणि त्यातच शेवटी त्याचा अंत झाला !

तसे पाहाता आर्थिक असमतोलपणा ग्रामीण भागापेक्षा शहरांमध्ये जास्तच आहे. तेव्हा सर्व बुद्धिवंतांचा कटाक्ष भोळ्या ग्रामीण शेतकरी वर्गावर का, याचा उलगडा होत नाही. शासन शहरी मालमत्तेची मर्यादा ५ लाखांची ठरवणार आहे. मग ग्रामीण शेतकऱ्यांच्यासाठी किंमतीऐवजी एकराचे परिमाण काय म्हणून ? किंमतीच्या रूपात पाहू गेल्यास शेतीची कमाल मर्यादा जेमतेम अर्ध्या लाखापर्यंत येईल. हा अन्याय एकीकडे होत असताना त्यांना वन्य व इतर लोकांच्याकडून होणारा त्रास सहन करावा लागतो. अशा वेळेस दोन्ही वर्गांच्या दरम्यान विग्रहाची चिथावणी न देता समन्वय चालूच राहील व दोघांचे उत्तरोत्तर कल्याण होईल. अशी सर्वोदयकारी योजना पुढे आल्यास तीच स्वागतार्ह ठरेल. इतर मार्ग विनाशकारीच ठरण्याचा संभव आहे.

---

पुढील सहा महिन्यात ‘ कविता ’ सदरात प्रसिद्ध होणाऱ्या कवितांची निवड पूर्ण झाली आहे. कविमित्रांनी कृपया कविता पाठवू नयेत, त्यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही. —संपादक

# सर्वोदय आणि शहादे

## एका पत्रकाराला दिसलेले....

दोंडाईचा गांव.

तापी खोऱ्यातील, सुरत–भुसावळ मार्गावरील एक आडगांव. सातपुडा पर्वत राजी येथून काही हाकांच्या अंतरावर.

धुळयाकडून सातपुडा–उत्तर महाराष्ट्राकडे जाणारा रस्ता व सुरत–भुसावळकडे जाणारा रेल्वेमार्ग या गावाच्या ठिकाणी एकत्र येतात, म्हणूनच छोटेखानी असूनही गावाला महत्त्वाचे स्थान.

पहाटेची सुमारे साडेचारची वेळ. या दिवसांत तेथे थंडीचा जोरदार कडाकाच असतो, पण यावेळी थंडी थोडी कमीच. तरीही तिची मिठी सुखद म्हणण्या पलीकडचीच.

गावात निरव शांतता पसरलेली असते. पण सुरतकडून भुसावळ व भुसावळकडून सुरतकडे जाणाऱ्या गाड्या येण्याची ती वेळ असल्याने स्टेशनवर थोडीफार गर्दी असते.

गरम कॉफीचे घोट घेत असतानाच माझी आणि श्री. दामोदर ऊर्फ भाऊ मुंदडा यांची चर्चा चाललेली असते. तेजस्वी चेहऱ्याचे भाऊ रात्री पुरेशी झोप मिळाली नसली तरी ताजेतवाने वाटतात. वृद्धत्व आले तरी त्यांचा कामाचा उत्साह अजूनही टिकून आहे.

सर्वोदयी कार्यकर्त्यांबद्दल तशी मला आस्था कधीच वाटलेली नव्हती. सर्वत्र टिंगल टवाळीचा विषय झालेले, शेळीचे दूध पिणारे हीच त्यांची डोळ्यासमोरील प्रतिमा. शिवाय त्यांची (भाऊंची) भेट होण्याआधी त्यांच्याबद्दलची अनेक मते मी ऐकलेली होती. धुळ्यात पाऊल टाकताच एक पत्रकार म्हणाला होता की, आदिवासींचे प्रश्न कितीही ज्वलंत असले आणि लढा देण्याची पाळी आली असली तरी सर्वोदयी भाऊ त्याला तयार होणार नाहीत. त्यांच्या ढिल्या कारभाराबद्दलही अने-

कांनी नाराजी व्यक्त केली होती. शहादयाच्या पंचायत समितीचे सभापती व काँग्रेसचे एक नेते श्री. फकिरा जयरामभाई म्हणाले होते की, आदिवासी व गुजर समाजात अंतर निर्माण करण्यात इतरांप्रमाणे भाऊही जबाबदार होते. कारण ते ५० टक्के गुजरांच्या बाजूचे आहेत तर ५० टक्के आदिवासींच्या बाजूचे. आदिवासींना ते उठावाची चिथावणी देत असतात, असेही जयरामभाईंनी सांगितले. त्यामुळे भाऊंबद्दलची माझ्या मनातील प्रतिमा डागाळलेली राहिली होती. म्हणूनच प्रश्न विचारताना माझी भूमिका काहीशी तशीच होती. पण प्रत्यक्षात भाऊ फारच प्रांजळ, मोकळे व वस्तुस्थितीची पूर्ण कल्पना असलेले आणि ती निर्भिडपणे मान्य करणारे, आपल्या चुकाही पदरात घेणारे आढळले; आणि हे सर्व काहीही आडपडदा न ठेवता.

भाऊंचा कारभार ढिला जरूर आहे. अनेकांवर त्यांनी फाजील विश्वास टाकल्यामुळे अनेकदा ते फशी पडले. इतरांनी अफरातफर करावी आणि त्याची जबाबदारी भाऊवर यावी असेच नेहमी घडत गेले. त्यांच्याबद्दलची खूप काही माहिती मिळाली. गैरसमजाची पटले बरीच दूर झाली. त्यांच्या चुकांबद्दल जर त्यांना दोषी ठरवून एक फटका मारायचा असेल, तर त्यांच्यापेक्षा हजारपटीने सामाजिकदृष्ट्या गुन्हेगार असणाऱ्यांना दहा तरी फटके प्रथम मारले पाहिजेत याबद्दल माझी तरी पूर्ण खात्री पटली.

ते ज्या कठीण परिस्थितीत त्यांचे कार्य करीत आहेत तो भाग पुढे येणारच आहे. त्याआधी आमच्या खुल्या चर्चेत आलेले काही मुद्दे देतो.

मी त्यांना म्हणालो, सर्वोदयी कार्यकर्ते खेडापाड्यातून कार्य करीत आहेत पण आवश्यक तेवढा लढाऊपणा त्यांच्यात नसल्याने उभी राहिलेली चळवळ इतरांच्या हातात पडते. याबद्दल तुम्हाला काय म्हणायचे आहे ?

त्यावर त्यांनीही सरळ मान्य केले की, सर्वोदयाची चळवळ संघटनेत मागे पडली आहे. संघटना ढिली पडली आहे. कार्यकर्ते काही वेळा सुस्तावतात. गांधीजींकडे कोणतेही आव्हान स्वीकारण्याची कुवत होती, ते आव्हानाला धैर्याने सामोरे जात असत. पण आचार्य विनोबा भावे परिस्थितीने दिलेल्या आव्हानाला सामोरे जायला राजी नाहीत. बिहारात लाखो एकर जमीन भूदानात मिळाली पण वाटपाचा महत्त्वाचा प्रश्न योग्य प्रकारे हाताळला गेलाच नाही. उलट तो चक्रव्यूहाप्रमाणे गुंतागुंतीचा बनत गेला. त्याचवेळी प्रशिक्षित व तयार कार्यकर्त्यांचे 'केडर' हाती असते तर ग्रामस्वराज्याची वाटचाल यशस्वी झाली असती. ओरिसातील कोरापूट येथे तर बोऱ्याच वाजला. अप्पासाहेब सहस्रबुद्धे, दाते इंजिनियर यांच्यासारखे निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने तेथे गेले. पण शेवटी दारुण निराशेने ग्रासल्यामुळे त्यांना परत यावे लागले. काही प्रश्न तर अगदी मामुली होते. उदारणार्थ तेथे काम

पृष्ठ ५९ वर

अरुण गोसावी

# मुंबई वार्ता

## युद्ध, प्रकाशबंदी, निवडणुका, डावपेच, मोर्चे इ. इ...

दिवाळी संपली आणि संभाव्य युद्धाचे सावट देशावर पडले आहे. दिवसेंदिवस सीमेवरची परिस्थिती चिघळत असल्याच्या बातम्या आहेत. युद्ध लादले गेलेच तर त्याला तोंड कसे द्यायचे याची जोरात तयारी सुरू आहे—सरकारी पातळीवर! सामान्य नागरिकांमध्ये—विशेषतः मुंबईत—मात्र युद्धाच्या संभाव्यतेची जाणीव विशेष तीव्रतेने झालेली दिसत नाही. मुंबईत दोनदा झालेल्या प्रकाशबंदीच्या चाचण्याच्या वेळी दिसलेली बेशिस्त, गलथान आणि बेपर्वा वृत्ती आणि नागरी संरक्षणखात्याला स्वयंसेवकांचा भासणारा तुटवडा या गोष्टी काय दाखवतात? प्रकाशबंदीची पहिली चाचणी म्हणजे तर केवळ थट्टाच होती. आपण जणू त्या गावचेच नाही अशा उर्मटपणाने अनेकांनी घरातले दिवे चमकवून खिडक्या सताड उघड्या टाकल्या होत्या. दुसऱ्या चाचणीच्या वेळी हे प्रमाण कमी होते. पण पोलिसांनी चोपन्न जणांवर प्रकाशबंदीचे नियम मोडल्याबद्दल खटले भरले ते केवळ प्रतीकात्मक. या संख्येच्या हजार पटींनी नियम मोडले गेले. विशेष म्हणजे श्रीमंत, उच्चभ्रू वस्त्यांमध्ये प्रकाशबंदी धुडकावून लावणाऱ्यांचे प्रमाण अधिक.

युद्ध झालेच तर मुंबईवर पाकिस्तानी विमाने येतीलच असे नाही. पण येणारच नाहीच अशा भ्रामक समजुतीत झोपा काढणे गबाळेपणाचे ठरेल. कोणत्याही शत्रूचे मुंबई हे अत्यंत आकर्षक आणि महत्त्वाचे लक्ष्य ठरू शकते. लढाई होईल तेव्हा बघू असे म्हणून स्वस्थ बसण्यात धोका आहे. बचावाची तयारी सतत असली पाहिजे.

अण्वस्त्रयुद्धाचा धोका अगदी नजीक असल्याचे कुणालाच वाटत नाही. पण तसे युद्ध झालेच तर त्यापासून बचाव करण्याची तयारी अनेक राष्ट्रे करीत आहेत. विशेषतः चीन. अण्वस्त्रयुद्ध सुरू झालेच तर वीस मिनिटांत चीनची अर्धी लोकसंख्या भूमिगत होण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे वृत्त आहे. अणुयुद्ध झालेच तर अशा तऱ्हेने चीनची अर्धी अधिक लोकसंख्या संहारापासून वाचेल. अगदी चीनचा धडा गिरविण्याची जरी गरज नसली तरी चीनपासून याबाबतीत शिकण्यासारखे पुष्कळ आहे. हे नक्की.

संभाव्य युद्धाच्या गडगडाटापुढे आगामी राज्य निवडणुकांचे नगारे आणि मुख्य-

मंत्रीपदाच्या कुस्तीसाठी होणारे भूभू:कार यांचे आवाज लुप्त झाले आहेत असेही नाही. महाराष्ट्रातला मुख्यमंत्रीपदाचा वाद आता भलताच कुजला आहे; निवडणुका होईपर्यंत त्या विषयात आता हात घालायचा नाही असा आपण कानाला खडा लावून घेतला होता. पण राजकारण हे असे आहे. खुद्द राजकारणी लोकांना बोलण्यावागण्याचे तारतम्य नसते. मग राजकारणावर लिहिणाऱ्या लोकांकडून तशी अपेक्षा करण्यात काय अर्थ ?

आणीबाणी निर्माण झाली नाहीच तर महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या निवडणुका फेब्रुवारी १९७२ मध्ये होतील असे दिसते. तशा तऱ्हेची शिफारस महाराष्ट्र सरकारने निवडणूक मंडळाला केली आहे. फेब्रुवारी ६, ९ आणि १२ या तारखाही सरकारने सुचविल्या आहेत. म्हणजे एका बाजूने युद्धाला तोंड देण्याची तयारी सुरू असताना सरकारने दुसऱ्या बाजूने निवडणुकांचीही तयारी सुरू केलेली आहे. अर्थात निवडणुकांसंबंधी अधिकृतरीत्या अद्याप काही ठरलेले नाही. प्रधानमंत्री इंदिरा गांधी नुकत्याच परदेश दौऱ्यावरून आलेल्या आहेत. निवडणुका घ्यायच्या का नाहीत यासंबंधीचा निर्णय त्याच घेणार आहेत.

असे असले तरी राजकीय पक्ष मात्र निवडणुकांच्या जय्यत तयारीला लागलेले आहेत. तिकीट वाटपासाठी काँग्रेस सदनावर आणि टिळक भवनावर आता अनेकांच्या वाऱ्या सुरू झालेल्या आहेत. जपून ठेवलेल्या परीटघडीच्या पांढऱ्या खादीच्या टोप्या आता पुन्हा सूर्यप्रकाश पाहू लागल्या आहेत. महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नुकतेच परदेश दौऱ्याहून परत आले आणि सांगलीला गेले. ते सांगलीहून मुंबईला परत आले की, टिळक भवनावर पांढऱ्या टोप्यांची जत्राच भरू लागेल. पुण्याला भरलेले सोशॅलिस्ट फोरमचे अधिवेशन म्हणजे एकप्रकारे निवडणुकीची पूर्वतयारीच असे म्हणणे विकृत मनोवृत्तीचे लक्षण ठरविले जाण्याची शक्यता आहे. पण त्याला इलाज नाही. अधिवेशनात हजर असणाऱ्यांमध्ये " तिकिटेच्छुकां "चा भरणा कसा होता हे कोणताही सामान्य निरीक्षक ओळखू शकतो.

नव्या काँग्रेसची निवडणूक तयारी म्हणजे आत्मविश्वासातून होत असलेली तयारी. फ्रॉम पोझिशन ऑफ स्ट्रेंग्थ. त्यामुळे तिकीट वाटप हा मुख्य भाग आणि जास्तीत जास्त जागा मिळवू अशी खात्री. महाराष्ट्र काँग्रेस दर निवडणुकीच्या आधी कार्यकर्त्यांचे एक शिबीर घेत असते. यावेळचे असे शिबीर डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात कदाचित मुंबईतच भरविले जाईल असा अंदाज आहे.

महाराष्ट्रातील विरोधी पक्षही आपापली मरगळ झटकून आस्ते आस्ते आता निवडणुकांचा विचार करू लागले आहेत. एकाहत्तरच्या लोकसभा निवडणुकीत बसलेला कमरतोड धक्का अद्याप ते विसरले नाहीत. श्री. जांबुवंत धोटे सोडल्यास महाराष्ट्रातून लोकसभेवर निवडून गेलेल्यांमध्ये विरोधी पक्षाचे एकमेव खासदार म्हणजे तेव्हाच्या प्रजासमाजवादी पक्षाचे आणि आताच्या समाजवादी पक्षाचे

प्रा. मधु दंडवते. कै. नाथ पै यांच्या पुण्याईच्या जोरावर दंडवते निवडून आले हे उघड आहे. आता राज्यातल्या या समाजवादी शक्ती एकत्र झालेल्या आहेत आणि इतर लोकशाहीवादी समाजवादी शक्तींशी निवडणुकीच्या निमित्ताने संवाद करण्याच्या त्यांच्या भाषा चालू आहेत. अर्थात यामध्ये स्वतःला लोकशाहीवादी आणि समाजवादी समजणाऱ्या नवकाँग्रेसचा अंतर्भाव त्यांच्या यादीमध्ये नाही हे उघड आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीस मंडळाची निवडणूकविषयक पहिली बैठक सप्टेंबरच्या पहिल्याच आठवड्यात भरली होती. आणखी बैठकांच्या तारखा लागलेल्या आहेत. पण १९६५ मध्ये शे. का. पक्षाची जी ताकद होती ती आता उरलेली नाही हे उघड आहे. पक्षाची मनस्थिती आता द्विधा आहे. एक गट तर आता सरळ सरळ काँग्रेसमध्ये सामील होण्याचा विचार करीत आहे. पक्षाला वेगळ्या अस्तित्वाची गरज नाही असे या गटाचे म्हणणे. आणि अशा अवस्थेतच पक्ष निवडणुकीला तोंड देणार.

जनसंघही महाराष्ट्रात सुमारे १५० जागा लढविण्याचे बेत करीत आहे. जनसंघाची राज्यशाखेची कार्यकारिणी आणि संसद मंडळ यांची संयुक्त बैठक निवडणुकीचा विचार करण्यासाठी लवकरच मुंबईत भरणार आहे. जनसंघाचा निवडणूक जाहीरनामाही तयार होत असल्याचे सांगण्यात येते. महाराष्ट्र कम्युनिस्ट पक्षाच्या कौन्सिलची बैठकही निवडणूकीचा विचार करण्यासाठी याच महिन्यात भरणार आहे.

अशा तऱ्हेने पक्षोपपक्ष आपापल्या कंबरा कसू लागले आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र काँग्रेसमध्येही मुख्यमंत्रीपदाच्यासाठी सुरू झालेले वादळ अद्याप शमण्याची चिन्हे दिसत नाहीत. वरवर जरी फारशी गडबड दिसत नसली तरी आतून मात्र जोरात खळबळ सुरू आहे. एवढ्यात तर मुख्यमंत्रीपदासाठी चाललेली ही रस्सीखेच अधिकच चुरशीला आलेली आहे.

मुख्यमंत्री नाईक आपल्या मंत्रीमंडळातील काही सदस्यांना काढून टाकणार ही एक अशीच उठवून दिलेली आवई होती म्हणतात. मुख्यमंत्रीपदाच्या लढतीतलाच हा एक भाग. अशी बातमी उठविली की ज्यांची नावे या आवईत गोवली गेली ते मंत्री मुख्यमंत्रीपदाच्या आधी आपले मंत्रीपद टिकविण्याच्याच प्रयत्नात लागणार अशी स्ट्रॅटेजी होती म्हणे. ही आवई कुणी उठविली याविषयी मुंबईच्या जाणकारांमध्ये फारसे अज्ञान नाही. फक्त श्री. नाईक यांच्या आशिर्वादाने ही बातमी प्रसृत केली गेली की काय हा प्रश्न आहे. श्री. नाईक यांनी आतापर्यंत या बातमीवर स्पष्टपणे काहीही बोलण्याचे नाकारले आहे.

मुख्यमंत्री नाईक यांची भूमिका काय असावी याविषयी नुकतेच एका जाणकाराकडून ऐकले. खरे म्हणजे १९७२ नंतर सत्तेवर रहायचे नाही अशी नाईकांची

इच्छा होती. त्याप्रमाणें ते खाजगीत बोलूनही दाखवीत होते. पण मध्यंतरी त्या धाडीची बातमी झाली आणि श्री. नाईक नर्व्हस झाले. आपला काहीही गुन्हा नसताना आपल्याला मुद्दाम बदनाम करण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांना वाटले. अशा स्थितीत जर आपण १९७२ मध्ये निवृत्त झालो तर त्यांचा लोक भलताच अर्थ लावायचे. म्हणून ७२ नंतरही मुख्यमंत्री राहण्याची श्री. नाईक यांची जिद्द आहे. श्री. नाईक यांना यशवंतराव चव्हाण आणि खुद्द इंदिरा गांधी यांचाही विरोध नसल्याचे नाईकांच्याच गोटातून सांगण्यात येते.

या संदर्भात आणखी एक वार्ता आहे. त्या कुप्रसिद्ध धाडीच्या वार्तेच्या सुमारालाच राजस्थानचे मुख्यमंत्री सुखाडिया आणि आंध्र प्रदेशचे ब्रह्मानंद रेड्डी यांना आपापला गाशा गुंडाळावा लागला होता. आणि आता नाईकांचा नंबर, अशा जोरदार अफ़वा पसरविण्यात आल्या होत्या. तसे काही झाले नाही. एवढ्यात काही होणार असल्याची लक्षणेही दिसत नाहीत. नाईक आपल्या घोड्यावर पक्की मांड ठेवून आहेत. पण तेव्हापासूनच प्रधानमंत्र्यांची श्री. नाईकांवर फारशी मर्जी नसल्याची भावना सर्वत्र पसरली होती. कमाल जमीन धारणेसंबंधी श्री. नाईक यांनी वेळोवेळी केलेली जाहीर वक्तव्येही कदाचित याला कारण असतील. पण तशी भावना झाली होती खरी. वास्तविक पाहता समाजवादी धोरणांची जलद अंमलबजावणी करण्यात महाराष्ट्र राज्य कसे आघाडीवर आहे हे श्री. नाईक यांनी कॉंग्रेसच्या १५ कलमी कार्यक्रमावर आधारून घेतलेल्या निर्णयांनी दाखवून दिले आहे. जमीनधारणेवरील आपली मते शास्त्रशुद्ध आहेत. त्यामुळे ती सांगायला काही हरकत नाही असे त्यांना वाटते. पण तेवढ्यासाठी आपल्यावर प्रधानमंत्र्यांनी गैरमर्जी करावी याबद्दल श्री. नाईक यांच्या गटात नाराजी आणि दुःख होते. वरवर तरी असे वातावरण दिसत होते.

श्री. मोहन धारीया आणि सोशलिस्ट फोरमचे काही सदस्य यांनी महाराष्ट्र सरकारच्या काही धोरणांवर जे आडून टीकास्त्र सोडले होते त्यामुळे ही भावना दृढमूल होत होती. परंतु गेल्याच पंधरवड्यात इंदिरा गांधींचा एक खास दूत नाईकांसाठी एक खास निरोप घेऊन आला होता अशी वार्ता आहे.

परस्पर गैरसमजाचे वातावरण निवळून काढण्याची जबाबदारी या दूतावर टाकण्यात आली होती म्हणे. या दूताची प्रत्यक्ष श्री. नाईक यांच्याशी गाठ पडली होती की नाही हे कळले नाही. परंतु आमची तुमच्यावर गैरमर्जी आहे असा गैरसमज करून घेऊन नाराज होऊ नका असा निश्चित निरोप घेऊन हा दूत आला होता हे मात्र नक्की कळले. अर्थातच पुढच्या बोलाचाली झाल्या असणारच.

इकडे अशा तऱ्हेच्या घटना घडत असताना मुख्यमंत्रीपदाचे प्रमुख इच्छुक श्री. शंकरराव चव्हाण यांचीही जोरात तयारी चालू आहे. श्री. नाईक काही

पृष्ठ ५६ वर

# कृपाछत्रपतींचे कोंडाळे

अर्थात

महाराष्ट्र काँग्रेस फोरम

फॉर

सोशॅलिस्ट ॲक्शन

चंद्रशेखर

कुणाचे दुःख काय असेल हे सांगता येत नाही. आणि त्या दुःखाचे काय हे त्याहून सांगता येत नाही. धान्यटंचाई, बेकारी, जागा टंचाई, वगैरे सार्वजनिक कारणांनी लोकांना दुःख होते व ते टाळण्यासाठी रेशनिंग, नियंत्रण, वगैरे उपायांचा अवलंब करण्यात येतो; हा प्रकार आता सर्वमान्य झाला आहे. या नियंत्रणाच्या कक्षेत आता निवडणुकीचे तिकीटही येणार असे दिसते.

हैराण झालात ना ? होणारच ! अहो निवडणुकीचे तिकीट ही काय जीवनावश्यक वस्तु आहे ? तिकीट न मिळाले तर असे काय होणार आहे ? पण हे झाले तुमचे-आमचे. राजकारणाचा धंदा करणारांच्या दृष्टीने निवडणुकीचे तिकीट ही जीवनावश्यकच गोष्ट आहे. आणि म्हणूनच पुण्याला नुकत्याच झालेल्या एका राजकीय अधिवेशनात चक्क अशी मागणी करण्यात आली आहे की, एका कुटुंबात एकापेक्षा अधिक व्यक्तीस निवडणुकीचे तिकीट देण्यात येऊ नये.

कोणी काही म्हणो, माझ्या दृष्टीने ही समाजवादाची परीसीमा झाली. अन्नधान्य, जागा, नोकऱ्या, वैद्यकीय सोयी, शिक्षण यांचे नियंत्रित वाटप करणारे अनेक देश पृथ्वीच्या पाठीवर असतील, पण निवडणुकीच्या तिकीटासाठी नियंत्रणांची मागणी करणारे फक्त भारतातच निघाले. या प्रगल्भ भारतीय समाजवादाचा विजय असो !

एवढी क्रांतिकारक मागणी करणाऱ्या संघटनेचे नाव महाराष्ट्र काँग्रेस फोरम फॉर सोशलिस्ट ॲक्शन हे असावे हे ओघानेच आले. त्याचे उद्‌घाटन श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्यासारख्या धंदेवाईक राजकारण्याने करावे हेही ओघानेच आले आणि चव्हाणसाहेब उद्‌घाटनाला आल्यावर वृत्तपत्रांनी या जन्मसोहळयास पहिल्या पानावर प्रसिद्धी द्यावी हे सुद्धा ओघानेच आले.

बाकी प्रसिद्धी दिल्याशिवाय आपल्यासाठी झगडणारे इतके लोक आहेत हे जनतेस तरी कसे कळावे ? गेल्या मार्चपासून जनतेला आपले वाटत होते की आता जनतेचे स्वतःचे सरकार आले, ते आता गरिबी हटविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही आणि आता झगडया-बिगडयाचा काही प्रश्न उरलेला नाही. सरकारचाही तोच विचार होता, पण काय करावे मध्येच हे 'बंगला देश' निर्वासित आले आणि सगळा घोटाळा झाला. एक कोटी लोक पोसायचे म्हणजे काय चेष्टा आहे ? आता लक्षभोजने घालण्याचा सराव असलेले कार्यकर्ते काँग्रेस पक्षात व सरकारात आहेत म्हणून ही गोष्ट जड जात नाही हे एक सोडा !

तरीपण आर्थिक बोजा पडला. पूर्व भारतातील राज्ययंत्रणा टेकीला आली, मध्यवर्ती सरकारचे सर्वच मंत्र्यांना 'बंगला देश' प्रश्नावर परदेशी जावे लागले, या सगळया गोंधळात 'गरिबी हटाव' कार्यक्रमाकडे लक्ष देण्यास सरकारला वेळ तरी कोठे मिळाला ? आता तर काय युद्धाची छाया राष्ट्रावर पडली आहे तेव्हा कसला समाजवाद आणि कसली गरिबी हटाव घेऊन बसलात ?

असे जरी असले तरी सरकारचा निर्धार पक्का आहे. पण होते काय की सरकारच्या मागे व्याप अनेक – 'सरकार रात्रंदिवस काम करते' हा खुद्द पंतप्रधानांचा निर्वाळा – तेव्हा साऱ्या गोष्टी लक्षात ठेवणे सरकारला शक्य नाही. या गडबडीत समाजवादाचा विसर पडू नये म्हणून सरकारनेच आपल्या पक्षाच्या काही कार्यकर्त्यांना अशी विनंती केली की, बाबांनो, समाजवादाची चर्चा सतत चालू ठेवा – या हरीजागरात खंड पडू देऊ नका; म्हणजे आमच्या डोळयासमोर तो प्रश्न राहील आणि सवड मिळाली की आम्ही समाजवादाची पताका परत खांद्यावर घेऊ.'

अ. भा. फोरम आणि महाराष्ट्र काँग्रेस फोरम फॉर सोशालिस्ट ॲक्शन यांच्या उत्पत्तिची कारणमीमांसा वरीलप्रमाणे असावी असा एक नम्र तर्क – नाहीतर असे बघा, सरकार काँग्रेसचे—सर्व सत्ता काँग्रेसच्या हाती— असे असताना समाजवादाच्या अंमलबजावणीसाठी काँग्रेस पक्षात पुन्हा एक फोरम कशाला आणि त्याने उमेदवारांची यादी वगैरे करण्याचे प्रयास तरी कशाला ?

काँग्रेस दुभंगण्यापूर्वी आताचे सिंडीकेट नेते समाजवादी वाटचालीला अडथळा करतात असे म्हणता येत होते. त्यासाठी तरुण तुर्क वगैरे समाजवादी गट आपला

पृष्ठ ५३ वर

श्री. मा. भावे

## स्वप्न–नायक

कौमार्यावस्थेत प्रत्येक व्यक्तीचे कोणी ना कोणी स्वप्न-नायक असतात. लोकप्रिय खेळाडू, चित्रपट तारे वा तारका, लोकनेते यांपैकी जो अधिक लाडका असेल त्याच्याभोवती खरे अगर खोटे सद्‌गुणांचे वलय गुंफून त्याला स्वप्न-नायक बनविले जाते. एकटे असताना त्याच्यासारखे वर्तन करण्याचे निश्चय होतात. समवयस्कांच्या संगतीत त्या स्वप्ननायकाच्या बाजूने वाद केले जातात.

जे व्यक्तीच्या बाबतीत खरे आहे, तेच समाजाच्या बाबतीतही असावे. समाजाचे सुद्धा स्वप्न-नायक असतात. ब्रेट हार्ट नावाच्या लेखकाने ' रोअरिंग कॅम्पचा लक ' म्हणून एक कथा लिहिली आहे. ' रोअरिंग कॅम्प ' नावाच्या वस्तीत ' लक ' नावाचा मुलगा जन्मला. रोअरिंग कॅम्प ही वस्ती जुगारी, दारुबाज लोकांची ' अमेरिकन वेस्ट 'मधील वस्ती होती. परंतु या वस्तीने ' लक 'ला आपला स्वप्न-नायक बनविले. वस्तीतील प्रत्येकजण आपले वर्तन लकला आवडेल की नाही याचा विचार करून ठरवू लागला. थोड्याच दिवसात त्या वस्तीतील समाज पूर्णपणे सुधारला. काही दिवसांनी पूर येऊन सारी वस्ती वाहून गेली. लकही त्यात वाहून गेला. लकचे वय ४–६ महिन्यांपलिकडे नव्हते.

याहूनही मोठ्या समाजांनी वेळोवेळी निरनिराळे स्वप्न-नायक कल्पिलेले आढळतात. इंग्लिश समाजाच्या इतिहासात रॉबिन हुड व त्याचे सवंगडी, ड्रेक व इतर सागरी साहस-वीर, सेसिल-ऱ्होडस् सारखे साम्राज्य संवर्धक असे अनेक स्वप्न-नायक होऊन गेले. त्यांच्या खऱ्या कथांना कल्पनांची कलाबूत लावून सजवण्यात आले. समाजाच्या परंपरेत त्यांना अढळ स्थान मिळाले.

अलिकडच्या काळात खऱ्या व्यक्तींना स्वप्न-नायकत्व मिळणे कठीण झाले आहे. दळणवळणाच्या साधनातील सुधारणेमुळे कोणतीही प्रसिद्ध व्यक्ती समाजापासून पुरेशी दूर राहू शकत नाही. अतिपरिचयातून अवज्ञा निर्माण होते व स्वप्न-नायकाचे काल्पनिक पंख गळून पडतात. यामुळे जेम्स बॉण्डसारखे कृत्रिम स्वप्न-नायक निर्माण झाले. समाजाला स्वप्न-नायकांची जरूर इतकी आहे की खरे स्वप्न-

नायकांची जरूर इतकी आहे की खरे स्वप्ननायक महाग झाले तर कृत्रिम स्वप्न-नायक पुरवावे लागतात.

तथापी खऱ्या स्वप्न-नायकांची जागा हे कृत्रिम स्वप्न-नायक भरून काढू शकत नाहीत. गणितात काही वक्ररेषांशी संबद्ध अशा ॲसिम्टोट नावाच्या सरळ रेषा असतात. मूळ वक्ररेषा व ॲसिम्टोट वाढविल्या असता एकमेकांच्या शक्य तितक्या जवळ येतात, पण एकमेकींना मिळत मात्र नाहीत. स्वप्नाळू समाजांतील जीवन आणि स्वप्न-नायकांचे जीवन यांचा संबंध हा वक्ररेषा आणि ॲसिम्टोट यांच्यातील संबंधासारखा असावा लागतो. पण मूळ स्वप्न-नायक पूर्णपणे कृत्रिम असेल तर वास्तव जीवन त्या स्वप्न-नायकाच्या जीवनाजवळ जाणे अशक्य आहे.

सुदैवाने पाश्चात्य देशातील तरुण-तरुणींना स्वप्न-नायकांचा एक नवा वर्ग गेल्या काही वर्षात उपलब्ध झाला आहे. हे नवे स्वप्न-नायक म्हणजे दक्षिण अमेरिकेतील देशात गनिमी पद्धतीने युद्ध करणारे क्रांतिकारक. क्यूबातील क्रांतीपासून फिदेल कॅस्ट्रो आणि चे ग्वेव्हारा ह्यांची नवी स्वप्न-नायकांची कुळी अस्तित्वात आली. जुन्या साम्यवादांतील दोषांपासून मुक्त असा नवा साम्यवाद हे स्वप्न-नायक उद्‌घोषित आहेत असे लोकांना वाटू लागले. ज्याप्रकारे क्यूबातील क्रांति घडली त्यामुळे फिदेल कॅस्ट्रो आणि त्यांचे साथीदार यांच्याभोवती अद्‌भुततेचे एक वलय निर्माण झाले.

'एन्काउंटर' मासिकाच्या जुलै १९७१ च्या अंकात अशाच एका नवोदित स्वप्न-नायकाची हकीकत आली आहे. या स्वप्न-नायकाची जात कॅस्ट्रोच्या टोळी-पेक्षा थोडी निराळी आहे. तो चिली देशांतील असून त्याचे नाव 'कमांदांत पेप' असे आहे. चिली देशातील प्रमुख प्रश्न जमीन वाटपाचाच आहे. गेल्या निवडणुकीत तेथे आलांद नावाचा कम्युनिस्ट नेता राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्यापासून जमीनदारांची जमीन बळकावून कुळांना व भूमिहीन शेतमजुरांना वाटून देण्याचे काम 'कमांदांत पेप' करीत असतो. चिलीअन सरकार मात्र असा कोणी 'कमांदांत पेप' असल्याचे मान्य करावयास तयार नाही.

'कमांदांत पेप'चे खरे नाव ग्रेगोरिओ जोस लिआंद असे असून तो फक्त २६ वर्षे वयाचा आहे. त्याचे वडील डेअरीच्या धंद्यात होते. 'पेपने' शेतकीचे शिक्षण घेतले. नंतर तो अधिकृत कम्युनिस्ट पक्षाचा सभासद झाला. परंतु तो पक्ष त्याला फारच मवाळ व सुखासीन वाटल्याने जहाल डाव्या पक्षात तो सामील झाला. नंतर लिफाईन नावाच्या भागातील कुळे व भूमिहीन यांच्यात त्याने चार वर्षे काम केले. तेथीलच एका शेतकऱ्याच्या मुलीशी पेपचे लग्न झाले आहे.

पेप बरोबरच व्हॅलेंटिना नावाची एक मुलगी कार्य करीत असते. पेपसारखे तिचेही घराणे मध्यमवर्गीय. अमेरिकेतील मेरिलँड संस्थानातील एका शाळेत व नंतर चिलीतील एका विद्यापीठात तिचे शिक्षण झाले. ती तेवीस वर्षे वयाची आहे.

लेखक पेपला भेटला, तो पेपने नुकत्याच ताब्यात घेतलेल्या एका मळ्यावर. ह्या मळ्याचे क्षेत्र एक लाख पंचवीस हजार एकर असून त्यावर १३० कुळे काम करीत होती. त्या मळ्याचा मालक कन्स्टमन नावाचा जर्मन (परंतु चिलीचाच नागरिक) होता. या कुळांना क्रांतीचे शिक्षण देण्यासाठी व मळ्याची सहकारी तत्त्वावर पुनर्रचना करण्यासाठी पेप आणि व्हॅलेंटिना मळ्यावर राहात होते.

पेप व व्हॅलेंटिना कुळांच्यात पूर्ण मिसळून गेले आहेत. ते शेतमालकाच्या बंगल्यात राहात नव्हते. तो बंगला कुळांच्या ताब्यात देऊन ते स्वतः मजुरांच्या झोपडीत राहात. गादीवर न झोपता मजुरांप्रमाणेच जमिनीवर झोपत. दारू पिणे त्यांनी सोडून दिले होते. कारण शेतमजुरांनी दारूत पैसे उधळणे त्यांना पसंत नव्हते.

पेपने आतापर्यंत १० लाखाहून अधिक एकर जमीन जमीनदारांपासून 'मुक्त' केली आहे. त्याच्याबरोबर व्हॅलेंटिनासारखे अनेकजण कार्य करीत आहेत. पेपची भेट झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी लेखक आणखी २८ विद्यार्थ्यांना भेटला. हे विद्यार्थी शेतमजुरात साक्षरता व आरोग्य यांविषयी प्रचार करीत होते. त्यांच्यासाठी 'जनतेशी कसे बोलावे' या नावाचे एक पुस्तक आहे. 'कसेल त्याची जमीन' हे पेप व त्याचे सहकारी यांचे घोषवाक्य आहे.

पेपच्या आजपर्यंतच्या कार्यात रक्तपात झालेला नाही. जमीन ताब्यात घेतली जात असता पोलिसांनी हस्तक्षेप करू नये असा सरकारचा आदेश आहे. सध्याचे शेतकीमंत्री चोन्चोल हे ताब्यात घेतलेल्या शेतमळ्यांना गुप्तपणे पैसे पुरवितात. सध्याच्या सरकारचे धोरणही जमीन ताब्यात घेऊन तिचे वाटप करावे असेच आहे. पण सरकारने ताबा घेतल्यास काहीतरी मोबदला द्यावा लागतो आणि पेपसारख्यांनी जमीन बळकावल्यास मोबदल्याचा प्रश्नच येत नाही. यामुळें पेपसारख्या कार्यकर्त्यांना गुप्तपणे पाठिंबा देणे व मदत करणे सरकारच्या फायद्याचेच आहे.

पेप व कम्युनिस्ट सरकार यांच्यात असे सहकार्य असल्याने अजून तरी सशस्त्र क्रांतीची गरज निर्माण झालेली नाही. परंतु पेपला असे वाटते, की सध्याच्या सरकारविरुद्ध उजवे गट प्रतिक्रांती घडवून आणतील व मग सध्याचे कार्य चालू ठेवण्यासाठी गनिमी युद्धाचा अवलंब करावा लागेल. त्यासाठी संघटना बांधली पाहिजे आणि पुरेसा वेळ मात्र हाताशी नाही. कारण एखाद्या वर्षातच प्रतिक्रांती होण्याचा संभव आहे.

□ □ □

सौं. नलिनी अंबाडे

# सदर्न रेल्वे, झिंदाबाद !

प्रवासापूर्वी रेल्वेचे रिझर्वेशन करणें आणि त्यातल्या त्यात दूरच्या प्रवासाचे 'स्लीपर'चे रिझर्वेशन म्हणजे केवढे दिव्य आहे. त्याचा अनुभव घेतल्याशिवाय कळणार नाही. भल्या पहाटे उठून धावत पळत स्टेशनवर जावे तो खिडकिशी आधीच तीस-पस्तीस जण डुलक्या देत उभे असतात. खिडकी उघडण्यास पुष्कळ अवकाश असतो. कपभर चहा घ्यावासा वाटतो, पण रांगेतून जाता येत नाही. जांभया देत पुढल्या माणसाच्या वर्तमानपत्रात डोके घालावे...पुन्हा आळस द्यावा घड्याळ पुन्हा पुन्हा पाहावे...तोवर बाहेर उजाडलेले असते...सकाळी येतांना 'तसेच' उठून आल्यामुळे आता 'घाईने लागलेली' असते...पण रांगेतून जाता येत नाही...इतक्यात 'क्यू' मोडला जातो व धक्काबुक्की रेटारेटी सुरू होते. वेळेपेक्षा पंधरा मिनिटे उशीरा खिडकी उघडल्याचे तुमच्या ध्यानात आलेले नसते. तुम्हीं देखील रेटारेटीत सामील होता. तासाभरात खिडकीच्या पुष्कळच जवळपास जाता. जाळीतून आतला 'प्राणी' दिसतो. शांतपणे सिगरेटचे झुरके घेत सावकाश एकेकाला कटवित असतो. एकाला फॉर्म नीट भरण्यास परत पाठवितो, तर दुसऱ्याला चिल्लरसाठी, तिसऱ्याला तो सांगतो 'यहाँ नही, बारा नंबर विंडोपे जाव' तेवढ्यात कुणी मिलिटरींवाला वॉरंट घेऊन येतो आणि सगळ्यांचा अर्धा तास खातो. एव्हाना चिल्लर घेवून मघाचा परततो, तर सारे ओरडतात 'बीचमे घुसता साला' तुमच्या आधीचे दोघेचौघेजण चार पाच तिकिटे प्रत्येकी घेवून आनंदात जातात. तुम्ही विचार करता प्रत्येकाच्या पॅन्टीं निळ्याच कशा?... आणि तो क्लार्क तुम्हाला सांगतो, 'टू-टायटरही संपले, सिटिंग संपले, सोळा पंध्रा चौदा सगळ्या तारखा फुल् झाल्या.

'मग सतराचे द्या. सतराला जाईन.'

'ते आज देता येत नाहीं. उद्याला. फक्त दहाच दिवस आधी' सकाळचे ९॥ वाजता निराश होऊन तुम्ही बाहेर येता. विचार करता की उद्याला पण असंच होणार, त्यापेक्षा गाडीवरच हमालाला दोन रुपये दिले तर तो आधीच डब्यात जागा 'धरून' ठेवतो ! बस्स तेच करू !

हे वर्णन झाले तुमच्या महाराष्ट्रातील. आमच्या मद्रासचे वर्णन तर ह्यापेक्षाही भयानक आहे. आदले दिवशी रात्रीच खिडकीशी झोपलात तरच दुसऱ्या दिवशी

सकाळी बर्थ मिळण्याची आशा. मद्रास-दिल्ली प्रवासात दोन रात्री झोपून जायचे असेल तर आधी एक रात्र 'खिडकीशी' काढायला हवी, किंवा पाच रुपये 'सोडायला' हवेत ! मद्रास स्टेशनवर तर रात्री कणभर चहादेखील मिळणार नाही की तान्हे मूल भूकेले झाले तर चमचाभर दूध नाही. सरकारी एकुलते एक कॅन्टीन सकाळी ७ ला उघडतं नि रात्री ८ वा. बंद होते. शेवटची लोकल १० वा. रात्री गेली की, फलाटावरचे दिवे बंद करून टाकतात ते सकाळी ४॥ ला मुंबई मेल येईपर्यंत ! पण आमचा भविष्यकाळ उज्वल आहे. मद्राशी जनतेची ही गरसोय आमच्या मान्यवर मंत्र्यांना जरी दिसली नाही तरी सदर्न रेल्वेचे जनरल मॅनेजर चेन्नबसप्पा यांना दिसली. त्यांना फार फार वाईट वाटलं. त्यांचे हृदय भरून आले, डोळयांमधून अश्रू वाहू लागले. घळाघळा. तेव्हा ते मदूरेस होते. झटदिशी वार्ताहरांची बैठक बोलाविली व एक अभिनव योजना जाहीर केली...इतकी अभिनव की भारतात सर्व रेल्वेत पहिला मान आमचाच ! बहुजन हिताय, बहुजन सुखाय पाहा बरं, मद्रासलाच स्थाईक होण्याचा तुम्हाला मोह होईल !

सदर्न रेल्वे लौकरच प्रमुख शहरांतून 'मोबाईल बुकिंग ऑफिसे' सुरू करणार आहे. फिरत्या पोस्टाप्रमाणे ह्या फिरत्या मोटारी लौकरच गल्लोगल्लीं फिरणार... चौकाचौकात उभ्या राहणार. बिडीची जाहीरात करतात तसा स्पीकरवरून पर्यटनाचा प्रचार करणार की नाही हे अद्याप ठरलेलें नाही. पण येथून पुढे आम्हाला घराजवळ तिकिटे मिळणार. दिल्लीचे रिझर्वेशन गल्लीतच होणार. आशा करूया, कीं ह्या योजनेची पुढचीं पायरी म्हणजे त्या मोटारीस फायर-ब्रिगेडच्या शिड्या असाव्यात म्हणजे तिसऱ्या वा चौथ्या मजल्यावरील लोकांना तिकिटे हातात मिळतील. जिने उतरा-चढा नको.

आता, तुम्ही शंका काढणार की, स्लीपरच्या एका डब्यात ७५ पेक्षा एकदेखील जादा बर्थ नसते. त्यापैकी किती स्टेशनवाल्यांनीं आणि किती मोबाइलवाल्यांनी रिझर्व्हे करायच्या ? मोटार कोणत्या पेठेत आधी जाणार व किती किती वेळ थांबणार ? मग त्या पेठेत बाहेरच्या पेठेतले 'उपरे' येऊन तिकिटे मागू लागतील तर काय करणार ? अधल्यामधल्या खेड्यापाड्यांची मिळतील का ? कुणीतरी हिशोब करणार की, एक ड्रायव्हर, दोन कारकून, एक मॅनेजर, एक कॅशिअर, गाडी (व्हॅन) किंमत, पेट्रोलचा खर्च हे सारे वजा जाता नफा काय उरणार ? त्या त्या भागातले आमदार रेल्वेकडे वजन आणतील. आमचेही शहर मोठ्ठे आहे आम्हाला का नाही ? त्यापेक्षा स्टेशनवरतीच दोन जादा खिडक्या उघडल्या तर ? किंवा आहेत त्याच २४ तास उघड्या ठेवल्या तर ? रिझर्वेशनच्या चार्टस्वर दर अर्ध्या तासाने पोझिशन दाखविली तर लोक विनाकारण रांगेत भाबडेपणाने उभे राहणार नाहीत. अहो शहाणे, चूप बसा. मग आमचे वैशिष्टय ते काय राहिले ? आम्ही मोबाईल जरूर करणार.

सदर्न रेल्वेच्या जनरल मॅनेजरांनी वर्तमानपत्रात जाहीर केलेली आणखी पुढील दुसरी योजना तर आशियात प्रथम असेल. लोकशाही राज्यात लोकांना म्हणजे जनतेला सरकार किती प्रेमाने सांभाळू शकते त्याचे हे आदर्श उदाहरण. गाडीच्या ऐन वेळेवर टॅक्सी, टांगा कांही मिळत नाही. रिक्षा मिळाली तर स्टेशनपर्यंत जिवंत पोचण्याची खात्री नाही. बसमध्ये सामान घेत नाहीत म्हणून पॅसेंजर्सना घरापासून स्टेशनवर आणण्याची एक ' पिक्प् ' योजना ते अमलात आणणार आहेत. सुरवातीस योजना पहिल्या वर्गाच्या उतारूंकरिताच मर्यादित असेल, बाकी तपशील अद्याप विचाराधीन आहे म्हणे. तामीळनाडूमध्ये टॅक्सींचे राष्ट्रीयकरण करण्याचे शिजते आहेच सध्या, त्याला ही योजना मग पूरक ठरेल, आता ही सरकारी ' पिक्प् ' टॅक्सी तुम्हाला गाडीच्या वेळेवर नेईल की उशीरा नेईल ही शंका किरकोळ आहे. अर्थात अशावेळी उतारूंनी निराळा टांगा, रिक्शा करून गाडी गाठल्यास रेल्वे तो गुन्हा समजणार नाही अशी आशा करूया. ही ' पिक्प् ' सवलत फक्त प्रवास करणाऱ्या उतारूसच मिळेल—त्यास पोहोचवण्यास जाणाऱ्यांनी आपापली सोय पाहावी हे अध्याहृत. पहिल्या वर्गास जर टॅक्सी, तर दुसऱ्या वर्गास रिक्षा, तिसऱ्यास टांगा किंवा कसे याचा खुलासा मात्र झालेला नाही. माझी रेल्वेला विनंती आहे, की, उतारू त्या गावी पोचल्यावर त्याला लॉजपर्यंत ड्रॉप करण्याचीही योजना असावी. तिकिटांची दरवाढ करण्यास किती सुरेख सबब बरं !

आमच्या रेल्वेला मालवाहतुकीतदेखील फार मार खावा लागतो. मुख्य कारण खाजगी ट्रकवाल्यांशी स्पर्धा करणे रेल्वेला जमत नाही—व जमणारही नाही—कधीच! वास्तविक आर. टी. ओ. नियमात अधिकाअधिक अडचणी निर्माण करून, भरमसाठ टॅक्सेस वाढवून, लॉऱ्यांना ' प्रांतबंदी 'ची वेसण घालून, मालवाहतूक रेल्वेकडे ओढण्याचा आत्तापर्यंत आटोकाट प्रयत्न झालाय, पण व्यर्थ ! व्यापारी कसले हट्टी ! माल ते पाठवितात मोटारींनीच. रेल्वेने म्हणे वेळ लागतो आणि वाटेत चोऱ्या फार होतात, म्हणून काय झालं ? माल देशातल्या देशातच राहतो ना ! उतारू वाहतुकीप्रमाणे माल वाहतुकेचेही राष्ट्रीयीकरण झाले म्हणजे रेल्वेस स्पर्धा राहाणार नाही. रेल्वेबोर्डाचे एक माननीय सदस्य एन्. एस्. स्वामीनाथन् यांनी मद्रासला गेल्या आठवड्यात वार्ताहरांची बैठक घेतली. देशात सुमारे तीन लाख वॅगन्स आहेत. तरीदेखील खुद्द रेल्वेच्याच कोळसा वाहतुकीसाठी बंगाल, बिहार भागात रोज ७००० वॅगन्सची मागणी असताना, रेल्वेला जेमतेम ६१०० वर गप्प बसावे लागते. खाजगी व्यापाऱ्यांना वॅगन ' मिळविण्यासाठी ' काय करावे लागते हे इथे उघडपणे सांगण्यासारखे नाही. म्हणजे असे की, वॅगन टंचाईच्या तीव्रतेनुसार ' भाव ' बदलत असतात ना ! स्वामीनाथन् म्हणाले, एकट्या पूर्व-रेल्वेच्या ताब्यातील १०,००० वॅगन्स सध्या ' पडून ' आहेत. कारण ठाऊक आहे ? वॅगन्सच्या खालच्या बाजूस आतमध्ये असणाऱ्या तांब्याच्या तारांची चोरी. ती तार बाजारात ५० रु. किलो आहे.

व्यापारी मालवाहतूक रेल्वेने करीत नाहीत त्याला कारणे दोन. पहिले कारण

वेळ फार लागतो, दुसरे कारण चोऱ्यामाऱ्या. ह्यांवर उपाय मात्र जाहीर झाला तिसराच. सदर्न रेल्वेच्या जनरल मॅनेजरांनी 'From Factory To Shop' योजना आखली आहे. म्हणजे कारखान्यातून स्टेशनपर्यंत आणि त्या गावी पोचल्यावर स्टेशन ते दुकान ही लॉरी वहातूकसुद्धा रेल्वेच करील, आता तुम्ही म्हणाल 'रेल्वेला आहे तेच सांभाळता येईना, त्यात भर कशाला ?' पण तुम्हाला हे कळत नाही की, ह्या योजनेमध्ये नवीन नोकरभरती होऊन त्यांची गरिबी हटवली जाईलच, पण एका दगडात तीन पक्षी 'मरतील' एक खाजगी भांडवलदार लॉरीवाले, दुसरा माल पाठविणारे, तिसरा माल घेणारे !

बंगलोरच्या 'म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स'ने मात्र खरोखरच धाडस दाखविले. कालच्या तीस ऑक्टोबरला रेल्वेमंत्री श्री. हनुमंतय्या यांना बोलावले व सरळ लेखी तक्रार हातात दिली. तीत बेधडक लिहिले, की रेल्वेमधील चोऱ्या बेसुमार वाढल्या आहेत व ही 'चोर' मंडळी म्हणजे कोणी बाहेरची नसून रेल्वेचेच नोकर व त्यांचे सगेसोयरे आहेत. डिपार्टमेंट त्यांच्यावर काहीही करू शकत नाही. आठ वर्षांपूर्वी रेल्वेने स्वतःचे पोलीस-दल (RPF) काढले. तेव्हा चोऱ्या होत असत चार कोटींच्या आसपास व दलावर खर्च होई दोन कोटी. आज परिस्थिती काय आहे ? पोलीसदलाचा खर्च वाढलाय बारा कोटींपर्यंत तर चोऱ्यांचे नुकसान आहे दरसाल आठ कोटींचे. स्पष्ट बोलायचे म्हणजे कुंपणच शेत खाते आहे. ह्या रेल्वेतील चोऱ्यांपुढे खुद्द हनुमंतय्यांनीदेखील हात टेकले आहेत. वास्तविक रेल्वे पोलीसखात्याची पुनर्रचना करणे, अचानक धाडी घालणे, सापडणाऱ्यांविरुद्ध 'कडक उपाय' हे सारे मार्ग अनुभवून थकले. तरीसुद्धा गेल्या वर्षी ३८ प्रथम श्रेणीच्या ऑफिसर्सवरती व १३१९ कर्मचाऱ्यांवरती 'कडक उपाय' योजले आहेत म्हणे, आता 'कडक उपाय' म्हणजे नेमके काय ते 'हनुमंतय्या'च जाणो ! बंगलोरला काल त्यांनी जाहीर केले की, येथून पुढे व्यापाऱ्यांना चोऱ्यांपोटी दिलेली नुकसानभरपाई जबाबदार व्यक्तींच्या पगारातून वसूल केली जाईल. रेल्वे पोलिसांत मिलिटरीतून माणसे घेतली जातील. वरील दोन्हींचे इकडे स्वागतच होत आहे.

एकीकडे चोऱ्या, तर दुसरीकडे अव्यवहार्य योजनांपोटी भरमसाट खर्च ! मग का नाही रेल्वे बजेट तोट्यात जाणार ? आज बंगला देशाच्या निर्वासितांना पुढे करून दरवाढ केली, उद्या काय सबब शोधणार ? एकीकडे देशभर वॅगन्सची तीव्र टंचाई तर दुसरीकडे त्रिचनापल्लीच्या रेल्वे वॅगन फॅक्टरीला 'हळू चला' सूचना. कारण काय तर म्हणे चौथ्या पंचवार्षिक योजनेत माल वाहतूक अपेक्षेपेक्षा खूप कमी झाली. शेवटी कालच्या सप्टेंबरच्या २३ ला हुकूम फिरवण्यात आले, रेल्वेने आज नीट प्लॅनिंग केले तर कोट्यावधी रुपयांचा फायदा क्षणात होईल ! पण प्रत्यक्षात दरवर्षी भाडी मात्र वाढत आहेत हेच दुर्दैव !

ते भारतीय रेल्वेच काहीही असो. आमची सदर्न रेल्वे मात्र सर्वच बाबतीत पुढे

पृष्ठ २४ वर

# नित्य नवा दिस जागृतीचा

आयुष्यात सर्वात सोपी गोष्ट कोणती ? तर देवाची भक्ती करणं. वारकरी पंथानं तर ही सोपी गोष्ट आणखी सोपी केली. देवाच्या भक्तीसाठी धनदौलत नको, आयाससायास नको, यमनियम नको; हवा फक्त भक्तिभाव. दोन हात आणि तिसरे मस्तक. म्हणा, 'विठ्ठल, विठ्ठल, ज्ञानेश्वरऽऽऽमाऊली, ज्ञानराज माऊली तुकाराम,' की झाली भक्ती. धरली पंढरपूरची वाट आणि टेकले विठोबाच्या पायावर डोके की झाली भक्ती. चंद्रभागेच्या काठी नाचले आणि काल्याचा प्रसाद खाल्ला की झाली भक्ती.

ह्या प्रकाराला पाहूनच काही आक्षेपक म्हणतात की संतांनी महाराष्ट्राला टाळकुटे बनवले.

आणि त्यात काय खोटं आहे ? महाराष्ट्रात इतर गोष्टींचा कितीही दुष्काळ असला तरी विठ्ठलभक्तांचा फार सुकाळ आहे. जिकडे पाहावे तिकडे भक्त. शहरात भक्त, खेड्यात भक्त; ब्राह्मण भक्त, मराठे भक्त, वैश्य भक्त; पुरुष भक्त, स्त्रिया भक्त; सुशिक्षित भक्त, अशिक्षित भक्त.

खरोखर भक्ती इतकी सोपी आहे काय, की कुणीही उठावे आणि विठ्ठलाचा गजर करीत भक्त व्हावे ?

तुकाराम महाराजांना जर हा प्रश्न विचारला तर ते ताडकन सांगतील की,

> भक्ति तो कठिण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥१॥
> जेथे पाहे तेथे देखीचा पर्वत । पायाविण भित तातडीची ॥२॥
> कामावले तरि पाका ओज घडे । रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे ॥३॥
> तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ॥४॥

म्हणजे भक्ती सोपी असते ह्या गोष्टीचा तुकारामाने निकालच लावला म्हणायचा ! तुकाराम म्हणतो की भक्ती करणे फार कठीण गोष्ट आहे. किती कठीण आहे म्हणून सांगू ? अहो, ती गोष्ट सुळावर पोळी भाजून दाखविण्याइतकी कठीण आहे. सपाट तव्यावर पोळी भाजता येईल. पण टोकदार सूळ तापवला तरी त्या सुळावर पोळी टाकताच टचकन भोकसं पडून ती पोळी सुळाच्या मानेभोवतीच गच्च बसेल. टाकली पोळी की पडलं भोकसं. म्हणजे पोळी कधी तरी भाजली जाईल काय ? भक्ती करणं ही गोष्ट सुद्धा सुळावर पोळी भाजण्याइतकीच कठीण आहे.

तुकाराम म्हणतो की जो कोणी भक्ती करण्याचं ठरवील तो कोणीतरी बलवान

माणूस असला पाहिजे. असा माणूस सहसा सापडत नाही. फार विरळ असतो असा माणूस. खरं म्हणजे हा माणूस शूरच म्हणायला हवा. आयुष्यात भक्ती करण्याच्या गोष्टीची निवड करणं म्हणजे एकप्रकारे पराक्रमच करणं आहे.

भक्तीबद्दल तुकारामाचं हे असलं बोलणं म्हणजे एकप्रकारे भक्त होऊ पाहणाऱ्यांचा उत्साहभंग करण्यासारखंच आहे. म्हणजे भक्तीचा सोपेपणा सांगून हजारो लोकांना अनुयायी करायच्या ऐवजी तुकारामाने लोकांना बिचकावण्याचंच काम केलं !

आणि अशा तुकारामाने म्हणे महाराष्ट्राला टाळकुटे बनवले ! वा वा ! खासा न्याय !

तुकारामाने महाराष्ट्राला टाळकुटे बनवण्याऐवजी नव्या प्रबोधनासाठी तयार केले असे का म्हणत नाही ? वर सांगितलेल्या अभंगातला शेवटचा चरण वाचा. काय म्हणतो तुकाराम ?

"तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ।।"

तुकाराम म्हणतो की भक्ती करायची असेल तर मनाला नेहमी अंकुश लावला पाहिजे? कोणता अंकुश ? तो अंकुश म्हणजे प्रत्येक नवा दिवस हा जागृतीचा दिवस असला पाहिजे. मग तुम्ही देवाला शरण जा किंवा जाऊ नका. देवबिव ह्या गोष्टी इथं विचारातच घेऊ नका. पंढरपूरला जाऊ की नको, पालखीला नमस्कार करू की नको, ज्ञानेश्वराच्या घोड्याला स्पर्श करू का नको, चंद्रभागेच्या वाळवंटात नाचू की नको, हे सर्व प्रश्न विचारत बसू नका. भक्ती करायची असेल तर फक्त एकच गोष्ट करा. ती म्हणजे प्रत्येक दिवस हा जागृतीचा दिवस करा. प्रबोधन करणं म्हणजेच भक्ती करणं. सतत जागृत राहा. मेंढरांप्रमाणे वागू नका. वेदांनी सांगितलं म्हणून स्त्रियांना स्वातंत्र्य नाकारू नका. हरिजनांमुळे विटाळ होतो असे मानू नका. आपल्या मुलाबाळांना ज्या दयेने वागवता तीच दया नोकरचाकरांना आणि त्यांच्या मुलाबाळांना दाखवा. (दया करणे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी) उठा, जागे व्हा आणि तीर्थामध्ये फक्त दगड आणि पाणी आहे हे प्रबोधन स्वीकारा. उठा जागे व्हा, देव सज्जन माणसात आहे हे जाणा. (तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ।।) उठा, जागे व्हा, वृक्षवल्लींना सोयरे करून निसर्गातील अक्षय आनंद लुटा. उठा, जागे व्हा, रंकांना विसरू नका.

तुकारामाने सांगितलेला हा भक्तीचा मार्ग कोणाचे हृदय उचंबळून टाकणार नाही ? तुकारामाने सांगितलेला हा कठीण मार्ग प्रत्येक सामान्य माणसासाठीच होता. प्रत्यक्षात खरे म्हणजे तुकाराम हाच एक सामान्य माणूस होता. चुकतमाकत, रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग करीत करीत हा सामान्य माणूस जागा झाला, प्रत्येक दिवस जागृतीचा करू लागला, उसाची मोळी आळीतल्या सर्व मुलांना वाटू लागला, 'सत्य-असत्याशी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमत ।।' अशी माणुसकीला शोभणारी नवी भाषा बोलू लागला.

तोच संदेश घेऊन आम्ही पुढे गेलो असतो तर ?

तर मग पुढच्या प्रबोधनासाठी आम्हाला सरकारवर विसंबून राहावे लागले नसते. हरिजनातला पोट असलेला माणूस आमच्या जाग आलेल्या डोळ्याला दिसला असता आणि आम्ही त्याला हॉटेलचे दरवाजे खुले केले असते. पण आमचे व्यावसायिक ह.भ.प. महाराजांनी झोपेचे सोंग घ्यायचे ठरवल्यावर कोण काय करणार? सरकार जागृत झाले आणि हॉटेलवर पाटी लागली की हे हॉटेल सर्व जातीजमातीच्या लोकांना खुले आहे. आज शहरात का होईना पण ब्राह्मणाच्या मांडीलामांडी लावून हरिजन सागुती मटण खातो, पण खुद्द पंढरपूरचा विठोबा अजून हरिजनाजवळ मांडीला मांडी लावून बसू शकत नाही.

याचा अर्थ असा, की तुकारामाच्या मताने आज फक्त सरकारच तेवढे शूर आहे, खरे भक्त आहे. (निवडे तो बळी विरळा शूर ॥ १ ॥) आणि तमाम वारकरी मंडळी शेळपट आणि झोपाळू आहे. खरे म्हणजे ही तमाम वारकरी मंडळी आणि त्यांचे ह. भ. प. म्होरके हे तुकारामाचे कोणी लागतच नाहीत. आज तुकारामाला नवजागृतीच्या भक्तीसाठी सरकारच्याच तोंडाकडे आशेने पहावे लागत आहे. तुकारामाला तेवढा दिलासासुद्धा फारफार मोलाचा वाटत असेल. ◻ ◻ ◻


---

## अय्यय्यो मंद्रास्स !

पृष्ठ २१ वरून

आहे. १९६३ मध्ये हिंदी-विरोधी आंदोलनात जाळपोळीमध्ये एकट्या रेल्वेचेच सहा कोटींचे नुकसान, हा दक्षिणेचाच उच्चांक होता. सदर्न रेल्वेवर कुठेही 'डायनिंग कार'ची सोय नाही, ना 'बफे' नाहीत. म्हणजे केवढा प्रचंड अन्नाचा अपव्यय(?) आम्ही वाचवितो. 'मोबाइल बुकिंग' आणि 'पिक्प् द पॅसेंजर' योजना भारतात प्रथम सदर्न रेल्वेच्याच ठरतील. कुणी सांगावे, कदाचित याही पुढे जाऊन, भावी काळातील योजना अशा असतील :– प्रवाशांना डब्यातील संडासामधील आरशासमोर स्नो व पावडर मोफत मिळेल–खाली नळाला पाणी असणे नसणे मुद्दा गौण ! लोकांना वाचण्यास मोफत 'तमीळ' साहित्य चालत्या गाडीत मिळेल. डब्यात दिवे नसल्याने प्रवाशांनी मेणबत्तीवर वाचल्यास हरकत नाही. चालत्या गाडीत स्पीकरवरून 'तमीळ', 'तिरुकुरल' किंवा शुक्रवारी 'गांधी पाठ' ऐकविले जातील. प्रत्येक डब्यामध्ये दारे, खिडक्या बंद करून, १६ मिमिची मंत्र्यांच्या दौऱ्यांची किंवा कुटूंबनियोजनाची फिल्म दाखविली जाईल. प्रवाशांचे समाधान हाच आमचा फायदा.. बहुजन हिताय...बहुजन सुखाय...ह्या आमच्या वाटेत येणाऱ्या अंगुली मंगुली किंवा गांगुली कुणालाही घरी बसवू तत्क्षणी आम्ही... म्हणा : सदर्न रेल्वे, झिंदाबाद !

◻ ◻ ◻




नव्या देवता, नवी मंदिरे, तोच पुजारी जुना
नव्या आरत्या, नव्या प्रार्थना, वरपांगी ह्या खुणा.

भाव मनीचा तोच, बदलली श्रद्धास्थाने परी
बलिदानाची तीच तयारी, हवनकुंड नव जरी.

साध्य बदलले, परी साधने अजुनी असती जुनी.
मूर्ति बदलली, दगड तोच, घण तोच परी अजुनी.

यात्रास्थाना नव्या भेट दे यात्रिक तोच जुना
तेच फुलांचे हार अर्पितो काल कुणा, अजि कुणा.

व्याख्यानाचे विषय बदलले, व्याख्याता ना नवा
ध्येय बदलले, ध्येयासक्ती नच चिवट नवीन वा.

जन म्हणती जग पूर्ण बदलले, तया कळो वा न वा;
तक्रारीचे रूप बदलले, सूर नसे हा नवा.

प्र. स. मोहरीर

## माझ्या वेदनेस

माझ्या वेदनेस नको
तुझ्या डोळ्यांतील पाणी
कोरांटीच्या फुलासाठीं
नको सुगंधाची गाणी...

निखळल्या चांदणीला
हवा आधार कशाला–
कशी पुरावी लक्तरें
अथांग या आभाळाला...?

माझ्या वेदनेस हवा
एक जिव्हाळा राधेचा
विष प्राशिता मीळावा
एक होकार मीरेचा...!

सौ. अनुराधा कुलकर्णी

## तुझे रूप उर्वशीचे

तुझे रूप उर्वशीचे
डोळे बदामी बोलके
भाळावरी उडतात
काळ्या बटांची पाखरे ॥ १ ॥

गर्द काश्मिरी गुलाबाची
तुझ्या मुखावरी प्रभा
हास्य मुखी प्रकटता
जाते थिजून उषा ॥ २ ॥

कधी ज्योत्स्नेची शालीनता
तुझ्या मुखी विलसते
भोळ्या भावाची गंगा
शांत संथ वाहते ॥ ३ ॥

कधी चूकून फुलते
कुंतलात गुलाबकळी
आणि उगाचच भुलते
कुण्या रसिकाची मनपाखोळी ॥४

द. कों. उंडे

## आस्वाद

बदललेल्या जगातील परिवर्तने कशी वरवरची आहेत, आणि मुळात जगाचे स्वरूप कसे जुनाटच राहिलेले आहे, याचे चित्रण प्र. स. मोहरीर यांनी आपल्या कवितेत केलेले आहे, पण श्रद्धास्थाने बदललेली आहेत. बलिदान तसेच होत आहे. फक्त बलिदानाचे रूप निराळे आहे. जगाची मूलप्रवृत्ती मुळीच बदललेली नाही. अतिशय सोप्या आणि वेगवेगळ्या रूपकांच्या द्वारा कवीने ही गोष्ट स्पष्ट करून मांडलेली आहे. नव्या यात्रास्थानांस भेट देणारा जुना यात्रिक, नव्या विषयावर व्याख्यान देणारा जुना व्याख्याता, जुन्याच सुरात नव्या रूपाची तक्रार–अशा वेग-

वेगळ्या प्रकारे एकच गोष्ट मांडलेली आहे. कवीची सुबोध भाषा आणि सुस्पष्ट विचारधारा यांमुळे कविता लक्षात राहण्यासारखी झालेली आहे.

—

'माझ्या वेदनेस—' या कवितेत सौ. अनुराधा कुलकर्णी या कवयित्रीने एका मुग्ध व्यथेचे बोलके चित्र रेखाटलेले आहे. मनातल्या मनात साठवून ठवलेली अशी ही प्रीतीची मुग्ध वेदना आहे. डोळ्यांतील पाण्याचे उत्तर या वेदनेला नको आहे. स्वतःच्या साधेपणाच्या आर्ततेला सुगंधाचे वरदानही तिला नको आहे. कोरड्या सहानुभूतीचा आधार तिला पुरणारा नाही. कारण तिच्या वेदनेच्या आभाळावर पांघरूण घालील असे वस्त्र या आधारापाशी नाही हे तिला माहीत आहे. राधेचा जिव्हाळा आणि मीरेच्या विषप्राशनामागील आर्त निष्ठा मात्र तिला हवी आहे. प्रीतीच्या विफलतेतच सफल झालेल्या या दोन प्रेमिकांचा प्रतीकाधार तिला पुरणारा आहे. आपल्या वेदनेचे प्रतिबिंब या दोघांच्या वेदनांच्या कृतार्थतेत ती शोधणार आहे. साधे सरळ निवेदन, उत्कृष्ट भाववृत्ती आणि समुचित प्रतिमांची योजना यामुळे ही कविता आकर्षक आणि परिणामकारक झालेली आहे.

'तुझे रूप उर्वशीचे' ही द. कों. उंडे यांची कविता म्हणजे स्त्रीच्या सौंदर्याचे एक गौरवगीत आहे. अर्थात हे सौंदर्य रसिकतेने वर्णिलेले असल्यामुळे त्याबद्दलच्या संवेदनाही तीव्र आहेत. सगळी सुंदर प्रतिमाने येथे दाटीवाटीने आणून बसवलेली आहेत. उर्वशी, बदाम, पाखरे, काश्मिरी गुलाब, उषा, ज्योत्स्ना, गंगा ही सगळी मंडळी हे सौंदर्य व्यक्त करण्यासाठी उपयोगी पडली आहेत. या प्रतिमानांच्या मांडणीत कसलीही सुसंगती नाही म्हणून हे जाणवते. एरवी प्रत्येक कल्पना स्वतंत्रपणे पाहिली तर रमणीयच आहे. पण सगळ्यांचा मिळून एकसंध सौंदर्यपरिणाम जाणवावयास पाहिजे, तो मात्र जाणवत नाही. पहिली दोन कडवी निर्यमक आणि नंतरची दोन सयमक आहेत, शेवटची ओळ निष्कारण लांबून वृत्तदोष निर्माण करते, वगैरे गोष्टी त्यामुळे लक्षांत येतात. एक समग्र सौंदर्यलुब्धवृत्ती कवितेत परिणामकारक उभी ठाकली असती तर हे काहीच दोष जाणवले नसते. कवीची भाषाशैली मात्र मोहक आहे, हे विशेष.

—रसिक

त्यांनी परत एकदा मान तिरकी केली, डोळे किलकिले केले आणि लांब माळावर नजर फेकली. समोरचं ऊन त्यांना आणखीन गडद झाल्यासारखं वाटलं. कदाचित् इतका वेळ खाली पाहिल्यामुळे असेल... कदाचित् सूर्य आणखीन वर चढलाही असेल... सूर्य म्हणजे आयुष्यातले भलेबुरे प्रसंग... आणि माळ म्हणजे आपण... त्यांच्या मनात एक कल्पना डोकावली.

प...ण ! माळ... म्हणजे आपण ! इतका कोरडा, इतका शुष्क ?... छ, छे ! आपण हिरवे होतो, तजेलदार होतो. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित डोकावलं. डोळे जरासे बारीक झाले. आणि त्यांना आपण फार फार तरुण आहोत असं वाटायला लागलं. त्यांना वाटलं, पटकन् आपण उठावं आणि सगळ्या माळाची घडी घालून लांब फेकून द्यावा. सूर्य एका हातानं झाकावा आणि जोरात ओरडावं. वेड्यासारखं ...वेड्यासारखं ! वे...ड्यासारखं...? वेड्या...

ते थबकले. त्यांचा चेहरा ओशाळला. " नाही नाही... " त्यांनी मान हलवली आपण तरुण नाही. तजेलदार नाही. ते स्वतःलाच समजावत होते, आपण वृद्ध आहोत. म्हातारे आहोत.

---

# लहरी

**अशोक पुणेकर**

---

त्यांनी समोर टेबलावर पाहिलं तिथला रेडिओ नेहमीसारखा त्यांच्या डोळ्यांत खुपला. त्यांच्या मोठ्या मुलांनी त्यांचा वेळ जाण्याकरता दिला होता...वेळ जाण्याकरता... हॅं: ! मला... ? आणि रेडिओ...वेळ जाण्याकरता ! " रेडिओ म्हणजे मैफल करण्याची ऐपत नसलेल्या अनेक माणसांनी काढलेला पर्याय वाटायचा त्यांना. रेडिओच्या दुकानात गिऱ्हाइकं पाहिली, की त्या माणसांना घरी बोलावून त्यांना मनसोक्त गाणं ऐकवावं, दिलखुलास रिझवावं... आपण आत्तापर्यंत जगलो ते आयुष्य ह्या मैफलीकरता, असं त्यांना वाटायला लावावं अशी मैफल, असं गाणं... असं नाचणं... ? ना...चणं, नाच...णं ? त्यांच्या तोंडून हलकेच शीळ निघाली. बोटं आरामखुर्चीच्या हातांवर ताल धरू लागली.

आता त्यांना मोगऱ्याचा वास येत होता. पैंजणांचा आवाज कानांत घुमत होता. कुठेतरी खोल तबला ताल धरत होता. सारंगी मन कापायला लागली होती. आणि



त्यांचा चेहरा उजळत होता. पावलांची लयबद्ध हालचाल.. हातांचा ताल. आणि गोंडस चेहरा. माझी माझी....

त्यांनी वाह म्हणण्याकरता तोंड उघडून समोर पाहिलं. त्यांचे डोळे लकाकले... चमकले. समोरचं ऊन त्यांना असह्य झालं. काळोख्या अंधारात एकदम दिवे लावून स्वप्नांना लाथ मारली जावी असं त्यांना झालं. त्यांचा चेहरा ओढला गेला. शिरा ताणल्या, डोळे मोठे झाले आणि तोंडातून आवाज झाला... मोठ्ठा !

खालून त्यांचा नोकर मुल्ला धावत आला. "क्या हुवा ? क्या हुवा, हुजूर ?" ते परत ओरडले. मुल्लानी त्यांचं डोकं गच्च धरलं. इतक्यात बन्सीधरनी पाण्याचा पेला आणून त्यांच्या तोंडाला लावला. खरंच, पाण्याची त्यांना गरज वाटत नव्हती. त्यांनी नाही नाही म्हणून हलवलेली मान मुल्ला आणि बन्सीधरच्या कर्तव्यतत्परते-पुढे विरून गेली. आता त्यांना बरं वाटत होतं. मुल्लानं पाठीवर हात फिरवण्याचं

आता थांबवलं होतं आणि ते दोघेही कांही फुटांवर आज्ञाधारकपणे उभे होते. त्यांनी जा असा हात केल्यावर ते दोघेही निघाले. त्यांनी एकमेकांकडे पाहिलं आणि जिन्यात वळल्यावर त्या दोघांच्या हसण्याचा आवाज त्यांच्या कानावर पडला.

त्यांची मान लटलटत होती. चेहरा घामानं भिजला होता. त्यांना आता अंगावरून धडाधड पाणी ओतावं असं वाटायला लागलं होतं. त्यांची नजर समोरच्या तीपाईवर गेली. त्याच्यावर सुंदर कोरलेली चांदीची पानदाणी ठेवली होती. त्यांनी हात लांब करून ती पानदाणी जवळ ओढली आणि पान जमवण्यात रमून गेले.

त्यांना आता आपल्या घोड्याची आठवण येत होती. तुफानची ! तो म्हातारा झाल्यामुळे त्यांच्या मुलांनी त्यांच्यासमोर त्याला गोळ्या घालून ठार मारला होता. त्या वेळेला तुफानच्या डोळ्यांत दिसलेली करुणा त्यांना आठवत होती. त्यांना एकदम भीती वाटली. त्यांना आपण कदाचित परत ओरडू असं वाटलं. त्यांनी आपले स्नायू क्षणभर ताठ केले. हातांत तयार केलेला विडा त्यांनी गपकन् तोंडात कोंबला जणू ते येणारी किंकाळी त्या विड्याच्या धक्क्यानं परतवत होते. त्यांचं मन सुन्न झालं. त्यांनीं समोर पाहिलं.

समोरचा माळ कोरडाच दिसत होता, मेल्यासारखा...थिजलेला...म्हातारा... ते दचकले. त्यांनी आपली माळावरची नजर बळेबळे काढली आणि छताकडे लावली. वरती तुळईवर एक मोठं झुंबर लटकत होतं, काचेच्या नळ्या असलेलं काचेच्या हंड्या असलेलं. परंपरागत कित्येक वर्षांपासून ते तिथेच होतं. त्यांनी डोळे बारीक करून पाहिलं. त्यांना त्याच्यांत लावलेला इलेक्ट्रिकचा बल्ब दिसला. त्यांचे दात खालच्या ओठावर रोवले गेले.

" मी अंधारात मेलो तरी चालेल...पण मला वीज नको...विजेचे गोळे नको. " त्यांना चारपांच वर्षांपूर्वीचा प्रसंग आठवत होता. मुलगा त्यांची समजूत घालत होता. गावांत इलेक्ट्रिसिटी येऊन बरेच दिवस झाले होते. बहुतेक सगळ्या प्रतिष्ठित घरातून आता कंदील बाहेर नेण्याइतकेच वापरण्यात येत होते. वडिलांनी आक्रस्ताळेपणानं विरोध दाखवल्यावर त्यांच्या मुलाला जन्मदात्याबद्दल शरम वाटली होती. त्यांच्या सुनेनं त्यांना धारधार शब्दांनी समजावलं होतं. आणि शेवटी मुलगा आणि सून इलेक्ट्रिसिटीचं फिटींग करून आले तसे मुंबईला परत गले होते.

मग रेडिओ आला. पंखा आला. आणखीनही काही गोष्टी आल्या. त्या गोष्टींना त्यांनी हातही लावला नाही. मोठ्या मुलान रेडिओ आणला तेव्हा तो कसा लावायचा वगैरे उत्साहानं सांगितलं होतं. त्यांनी फक्त हुंकार दिले होते.

" साब चाय् " बन्सीधरनं ट्रे समोर ठेवला आणि जरा ताटकळत उभा राहिला. त्यानी हळूच विचारलं " साब, रातको क्या पकाऊ ? " " अं ? हा ऽऽ ! " ते गप्प बसले. बन्सीधरनं काहीवेळ वाट पाहिली आणि चाचरत तोच प्रश्न परत विचारला. त्यांना त्या प्रश्नाचा–तो विचारणाऱ्या बन्सीधरचा–भयंकर राग आला.

त्यांना बन्सीधरला काठीनं मारून घालवावसं वाटलं पण ते खालच्या स्वरांत म्हणाले " कुछ भी ! " बन्सीधर काहीतरी पुटपुटला आणि खाली निघून गेला.

त्यांनी चहाचा कप हातात घेतला. तोंडातलं पान पिकदाणीत थुंकलं ! त्यांचा चेहरा आकसला, त्यांना ही कपबशी मुळीच आवडत नाव्हती. त्यांना पाहिजे होती पितळी कपबशी. त्यांना वाटलं बन्सीधरच्या नावानं शंख करावा. त्याला ओरडून बोलवावं आणि...

त्यांनी शांतपणे चहात पाहिलं. चहावर पातळ साय आली होती. त्यांनी कप तोंडाला लावला. एका घोटांत तो गार चहा संपवून टाकला. कप समोरच्या तीपाईवर ठेवला. त्यांना कशी कोण जाणे अचानक एक गाण्याची लकेर ओठावर आली आणि ओठातून ओघळली.

' नाही आवत ऽऽऽ नाही आवत... "

त्यांची मान डोलायला लागली. डोळे बारीक होऊन पैंजणी लगडलेल्या पावलांचा वेध घ्यायला लागले. बोटं चाळवू लागली बास् असंच आठवणीत....

कर्रकन् दार वाजलं. मुल्ला आत आला होता. त्यांच्या शिरा ओढल्या गेल्या. डोळे लाल झाले. हाताच्या मुठी वळल्या. ते तिरमिरीत उठले " तू ऽऽ तू बहार.... "

" सात्र चाय् का कप. "

त्यांनी एका आवेशात चहाचा कप उचलला. डोळे मोठे करत, ओरडत सण्कन् मुल्लाच्या दिशेनी भिरकावला. त्यांनी समोर पाहिलं मुल्ला खाली वाकल्यामुळे कप समोरच्या रेडिओवर बसला होता. काचेचे तुकडे तुकडे खाली पडले होते. मुल्ला तड्मड्त जिन्यातून पळाला. ते समाधान चेहऱ्यावर रेंगाळत कांचा पडल्या होत्या तिथे गेले. त्यांनी त्या काचांवर आपल्या चढावाचा पाय ठेवला. ते हसले. जोरात. आणखीन जोरात. आणखीन जोरात....

त्यांना आता आपण जग काखोटीला घेऊन फिरायला निघाल्यासारखे वाटत होते.



सुहास बापट

पुस्तके

# गडकऱ्यांची संसारनाटके

## सुजाण समीक्षा

कालानुसारी प्रगत अशा ज्ञानाबरोबर आणि जाणीवसंचिताबरोबर समीक्षेचाही विकास व्हावा. पण प्रत्यक्षात मात्र असे दिसते, की खुद्द साहित्यप्रांतापेक्षाही समीक्षाप्रवाहातच जास्त भोवरे निर्माण झालेले दिसून येतात. साहित्यापेक्षा मराठी समीक्षा अधिक परपुष्ट असल्यामुळे नवनवीन आयात मालाप्रमाणे नवनवीन फूटपट्टया तयार होतात आणि नवेपणाच्या उत्साहाने त्या प्रचलित वाङ्मयाला लावून पाहिल्या जातात. काही दिवसांच्या चलतीनंतर त्या मोडून पडतात. एखादा दक्ष विमर्शक मात्र अभिजाताच्या सनातन मूल्यभावाचे भान ठेवून केवळ नवेपणाच्या आहारी न जाता आपल्या विमर्शाचे फलित लोकांसमोर मांडताना दिसतो. ' गडकऱ्यांची संसारनाटके ' हे श्र्यं. वि. सरदेशमुख यांचे पुस्तक हे अशा प्रकारचे फलित होय. त्यातील मुख्य प्रमेयांचा येथे परिचय करून देत आहे.

ज्या ललितकृतींची समीक्षा विमर्शक करतो त्या जर जुन्या असतील तर सावधान विमर्शकावर दुहेरी जबाबदारी असते. समकालीन कलाकृतींचे समीक्षण करताना येणारा वर्तमानाचा दाब जुन्याबाबत संभवत नाही. पण त्याचबरोबर मध्यंतरीच्या काळात इतर विमर्शकांनी केलेल्या विमर्शांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम आपल्या भूमिकेवर घडण्याची शक्यता असते. या परिणामाला दूर ठेवणे ही सावधान विमर्शकाची पहिली जबाबदारी, आणि दुसरी जबाबदारी म्हणजे आपल्या विमर्शातून खरेखुरे नवे देण्याची. व्यक्तिकेंद्री भूमिका स्वीकारून केलेल्या समीक्षेमुळे लेखक येथे आधीच्या समीक्षेच्या गुंतावळयात फारसा अडकलेला नाही आणि खंडनमंडनाला येथे अवाजवी महत्त्व आलेले नाही. त्याचबरोबर काही नवे देण्याचा प्रयत्नही लेखकाने केला आहे. एवंच सावधान विमर्शकाच्या दोन्ही जबाबदाऱ्या लेखकाने पार पाडल्या आहेत. लेखकाने नवे काय मांडले आहे हे विवेचनाच्या ओघात येईलच.

गडकऱ्यांच्या साहित्यावर आजपर्यंत भरपूर लिहिले गेले आहे. आणि त्यातून प्रत्यक्ष समजुतीपेक्षा ढोबळ मतपट्टिका जास्त तयार झाल्या आहेत. या नामपट्टिका वा बिरुदे गडकऱ्यांच्या साहित्याचे अंतरंगदर्शन यथार्थतेने घडवत नाहीत असे

लेखकाला जाणवलेले आहे. लेखक या समीक्षेला ‘अशी तशी’ साहित्यशास्त्रीय चिकित्सा म्हणतो. या ‘अशा तशा’ समीक्षेबरोबरच इतर समीक्षेबद्दलही लेखकाने अशी तक्रार केली आहे, की आपल्याकडील तथाकथित स्वतंत्र समीक्षा खूपसे तंत्र-मंत्राचे आडाखे सांभाळण्याची कसरत करते. समीक्षेचेसुद्धा उगमस्थान मानवी अनुभूती आहे हे विसरले गेले आहे. वाङ्मयप्रकार, त्यांची मिश्रणे, संकेतांना डावलणाऱ्या रचना व या रचनांना साहाय्य करणारी शैलीतील विविधता ही वाङ्मयाप्रमाणे समीक्षेतही दिसावी अशी त्यांची अपेक्षा आहे.

## शोधकाची भूमिका

‘गडकऱ्यांची संसारनाटके’ हा गडकऱ्यांचा पूर्ण नाटकांचा विचार आहे. या विवरणातील लेखकाची भूमिका ही मूल्यमापन करणाऱ्याची नसून समजूतदार शोधकाची आहे. लेखकाच्या शब्दात हा गडकऱ्यांच्या नाटकातील सामर्थ्यस्थानांचा विचार आहे; त्यातील दोषाविष्करण अनुषंगिक आहे. कलावंताच्या केवळ दोषांचे आविष्करण व चर्चा ही लेखकाला चैतन्याचा अपव्यय करणारी व सत्वाची हानी करणारी वाटते.

लेखकाला जाणवलेली गडकऱ्यांच्या संसारनाटकांची तीन प्रमुख वैशिष्टये पुढील-प्रमाणे आहेत. एक म्हणजे या नाटकांची कथानके पात्रांच्या व्यक्तित्वदर्शनाला शरण गेलेली आहेत. दुसरे वैशिष्टच म्हणजे हे व्यक्तिमत्वदर्शन अतिबौद्धिकतेचा पांगुळगाडा डावलून सुजाणपणे भावात्मक झाले आहे. आणि तिसरे वैशिष्टच असे की, एका अंगाने त्यांची नाटके व्यक्तीचे मनोमंथन करीत विकसू पाहातात व दुसऱ्या अंगाने नैतिक, आत्मिक समस्यांचे उलटसुलट फासे मांडून संसाराचा सारीपाट विकट कसा आहे याचे दर्शन देतात. या तीन अवलोकननिष्कर्षांनंतर लेखकाने या विमर्शाचा आणखी एक उद्देश नमूद केला आहे. गडकऱ्यांनी निर्मिलेल्या, प्रकर्षाने त्यांच्या जीवात्म्याशी सख्य साधणाऱ्या पात्रांच्या चरित्राची व चारित्र्याची आत-बाहेरून ओळख करून घेणे हा तो उद्देश होय.

यानंतरच्या प्रास्ताविक टिपणात लेखकाने गडकऱ्यांची भावात्मता, त्यांचा रोमँटिसिझम, त्यांचा विनोद, त्यांची भाषा इत्यादी अंगांचे मार्मिक विश्लेषण केले आहे आणि या सर्वांतून गडकऱ्यांचे नाविन्य कशात? याचे लेखककृत उत्तर असे, की गडकऱ्यांनी व्यक्तिमूल प्रेरणेच्या बळावर अस्तित्वावर शोकसंवेदनेचा मागोवा घेतला.

यानंतरच्या प्रकरणांमध्ये क्रमाने लेखकाने ‘प्रेमसंन्यास’, ‘पुण्यप्रभाव’, ‘भावबंधन’ व ‘एकच प्याला’ या चार नाटकांचे परिशीलन केले आहे. प्रस्तावनेत साररूपाने मांडलेल्या निष्कर्षांचे येथे सविस्तृत दिग्दर्शन आहे. विवेचनाच्या ओघात अनेक प्रथितश समीक्षकांच्या गडकऱ्यांसंबंधीच्या निष्कर्षांचा अपुरेपणा आणि अयथार्थत्व लेखकाने दाखवून दिले आहे. तसेच ‘एकच प्याला’ ही कोणाची

ट्रॅजिडी, यासारख्या प्रश्नांचे नवे विवेचन केले आहे. ट्रॅजिडी ही अमुक एका व्यक्तीची नसते. ती थोड्याफार फरकाने सर्वांचीच असते आणि बाह्यपरिस्थिती-इतकीच व्यक्तीची मनोघटनाही तिला तितकीच जबाबदार असते. हे ट्रॅजिडीच्या संदर्भातील विचारांचे सार आहे. लेखकाच्या एकंदर विवेचनावरून दोन गोष्टी प्रामुख्याने जाणवतात. गडकऱ्यांची ही चार पूर्ण नाटके ही ' संसारनाटके ' आहेत. हे मुख्य प्रमेय. ' संसारनाटके ' ही संकल्पना मूळची गडकऱ्यांचीच; ती लेखकाने प्रमेय म्हणून स्वीकारली आहे आणि ' संसार ' शब्दाचा तात्त्विक व प्रत्यक्ष अर्थही विस्ताराने स्पष्ट केला आहे.

संसारनाटकत्वाशी संबंधित अशी दुसरी गोष्ट म्हणजे या परिचयात उल्लेखिलेली लेखकाने स्वीकारलेली व्यक्तिकेंद्री भूमिका. ' जीवनमूल्या 'ची श्रेष्ठकनिष्ठता अखेर व्यक्तिसापेक्ष आहे. अमके मूल्य प्राण देण्यास योग्य आणि अमके अयोग्य हे एका व्यक्तीने दुसरीला सांगण्याचा मुळी नैतिक अधिकारच नाही. ही एकप्रकारची अनुभवसिद्ध जीवनदृष्टी आहे. ती व्यक्तिमूल प्रेरणेच्या बळावर अस्तित्वातील शोकसंवेदनेचा मागोवा घेते. अस्तित्व पत्करताच मरणही पत्करावे लागते याची तिला खात्री आहे. सामाजिक, राजकीय आणि राष्ट्रीय म्हणून उद्घोषिलेली मूल्येही गाभ्यातून व्यक्तिसंबद्ध असतात या विश्वासाने ही दृष्टी नैतिक समस्यांचा दुवा आत्मिक समस्यांशी जोडते. एकाच माणसात परस्परविरोधी भाववृत्तींचे रणमैदान सज्ज असते आणि त्या थैमानाचा न्यायनिवाडा करू शकणारी शक्तीही त्याच्यातच वळ धरते.

व्यक्तिकेंद्री भूमिकेचे स्वरूप थोडक्यात वरीलप्रमाण आहे. ही भूमिका एक समज अथवा जाणीव म्हणून स्वीकारून लेखकाने गडकऱ्यांच्या संसारनाटकांकडे बघि-




तले आहे. आणि या दृष्टीने पाहिले की, प्रचलित वाङ्मयीन रूपभेदांचे आणि समस्यांचे स्वरूप तळापासूनच बदलते. रूपभेद संकेतनिष्ठ राहू शकत नाहीत. व्यक्तींचे सुष्ट-दुष्ट फार काय नायक-खलनायक हे वर्गीकरणसुद्धा फार थिटे वाटते. वाङ्मयीन पात्रांच्या उक्तींचा आणि कृतींचा नवा आंतरसंदर्भ जाणवू शकतो. या सर्वांची उदाहरणे लेखकाच्या विवेचनात सापडतील.

लेखकाचे विवेचन आणि प्रतिपादन मला आवडले असले तरी लेखकाने मान्यता दिलेल्या या अस्तित्वसापेक्ष व्यक्तिकेंद्री भूमिकेविषयी, तिच्या पूर्णसत्यत्वाविषयी मी साशंक आहे. उदाहरणार्थ 'जीवनमूल्यांची श्रेष्ठकनिष्ठता अखेर व्यक्तिसापेक्ष' यासारखे विधानसुद्धा 'अखेर'ला वाव देऊन केवढी तरी संदिग्ध पोकळी निर्माण करते. जीवनमूल्यांचे सामाजिक स्तरावरील अस्तित्व व त्यांचे व्यक्तिस्तरावरील अस्तित्व यांच्यात सतत आंतरिक संघर्ष असतो. पण तरीही व्यक्तिस्तरावरील अस्तित्वात सामाजिकतेचाच भाग मोठा असतो. त्यातील श्रेष्ठकनिष्ठताही सामाजिकच असते. फक्त व्यक्तित्वाच्या कोंदणात तिला बसविताना तिचे तात्त्विक सार्वत्रिक रूप संकुचित होते आणि प्रत्यक्षाच्या पातळीवर तिला अनेक ठिकाणी मुरड बसते. तेव्हा या मूल्यांच्या व्यवहार्यतेच्या अर्थाने व्यक्तिसापेक्षता मानता येईल. पण व्यक्तिमनाने त्यांच्या अंगिकाराविषयीही तसेच म्हणता येईल असे निश्चितपणे म्हणता येत नाही.

हा विषय अमर्याद आहे. तो बाजूला ठेवू.

सुजाण आत्मीयतेने गडकऱ्यांच्या संसारनाटकाचे अंतरंगदर्शन दर्शन घडविणारी ही समीक्षा वाचकाला प्रक्षुब्ध करील असा विश्वास वाटतो. □

**गडकऱ्यांची संसारनाटके : त्र्यं. वि. सरदेशमुख : मौज प्रकाशन, मुंबई : मूल्य रु. दहा**



# डिफकॉन:३

दाखवायचे दात आणि खायचे दात
यांच्या फटीतले सहा दिवस....

**जिप्सी मधुकान्त**

'हे पहा ... याकडे नजर टाका' प्रयोगशाळेतल्या एका छायाचित्र परीक्षकाने आपल्या सहकाऱ्यांना खुषीची हलकी शीळ घालत म्हटले.

सेकंदकाटा भराभर पळत होता. रात्रभर कुणालाच झोप नव्हती आणि डोक्यावरची टांगती तलवारही दूर झालेली नव्हती. फिलम २० फुटापर्यंत एन्लार्ज करण्यात आली. मग प्रखर आणि सूक्ष्म उपकरणांच्या सहाय्याने छायाचित्र परीक्षकांचे गट त्या फिलमचा वेध घेऊ लागले. त्यांना आपण करीत असलेल्या कामाची जाणीव होती, त्यामुळे एक प्रकारचा तणावही निर्माण झालेला. शांतपणे नि तेवढ्याच काळजीपूर्वक पण गतीने त्यांचे काम चालले. ७५० चौरस मैलांचा केळीच्या उपवनाचा तो परिसर त्यांना फिलममध्ये अगदी कणकण पहायचा होता. साऱ्या रात्रभर हा उद्योग जारी होता. छायाचित्र परीक्षणाचा तो एक ऐतिहासिक विक्रम होता. यू-२ने घेतलेल्या फिलमचे परीक्षण चालू होते. १४ ऑक्टोबर ६२ ला

रात्री सुपरसॉनिक जेटने ती वॉशिंग्टनला पोचविण्यात आली. ते काम म्हणजे १० मैलांचा हमरस्ता रांगत रांगत, लेडीज रिस्टवॉचचा सेकंदकाटा सूक्ष्मदर्शक भिंगाने शोधण्यासारखे होते. पण दुसऱ्या दिवशी, सोमवारी १५ ला या कामाचे सार्थक झाले.

त्या निरीक्षकाने दाखवलेला भाग म्हणजे क्युबातला सॅन क्रिस्तोबल जवळचा झुडपांनी माजलेला परिसर होता. सराईत नजरांनी त्यात मध्यम रेंजचे प्रक्षेपण तळ हुडकून काढले ! ते चार ठिपके होते. तेथे आठ प्रक्षेपणास्त्रे ट्रेलरवर लादलेली होती. तसेच इंधनाचे इतर ट्रेलर्स, लष्करी ट्रक्सचा शेतावळा, ५०० सैनिकांना पुरेल एवढा तंबूचा परिसर त्या चित्रात उमटून दिसत होता. अर्थात बारीक ठिपक्यांच्या रुपात.

तो सर्व रशियन तळ होता ! शंकाच नव्हती. त्या फिल्मच्या परीक्षणानंतर आकार-प्रकार-वस्तू इ. वरून विशेषज्ञांनी मत दिले होते. रशियन प्रक्षेपण तळाशी त्याचे साम्य होते. ती अस्त्रे काही क्युबाची नव्हती. मध्य क्युबातल्या, रेमोदिओत जवळच्या विस्तीर्ण कुरणावर गेले पाच आठवडे हे तळ उभारणीचे काम चालू होते. सागुआला ग्रान्द्रे या गावाजवळच्या तळाचे काम तर जवळपास पूर्ण होत आले होते. या तळांची बांधणी, तयारी छायाचित्रावरुन दिसत होती. १२ शे, २६ शे मैल रेंज घेणारी ती क्षेपणास्त्रे होती. सॅन क्रिस्तोबाल जवळच्या गुआनाजे या खेड्याजवळच्या कुरणातही असेच तळ, वाहने, काँक्रिटच्या इमारती, लष्करी तंबू होते. क्षेपणास्त्रांचा तळ बांधून कसल्यातरी दूरगामी योजनेची धारणा ती.

सी. आय. ए. खडबडून गेली ! शीतयुद्धात आता काहीतरी ठिणग्या पडणार असे वाटू लागले.

सोमवारी दुपारी फिल्म परीक्षणाचे काम संपले. सिक्युरिटी टेलिफोनवरून एक गुप्त संदेश धडाडला — 'क्युबात आक्रमक अशा अण्वस्त्रतळांचे बांधकाम वेगात होत असून लष्करी सज्जता होत आहे, याचा सज्जड पुरावा हाती आला आहे.' एकदा का या तळावरची तयारी पूर्ण झाली म्हणजे त्याच्या कक्षेत अमेरिकेतील अनेक शहरांना पूर्वसूचना न मिळता धोका संभवणार !

## 'शुद्ध संरक्षण'

हे कसे घडले होते ? वॉशिंग्टनच्या नाकावर टिच्चून क्रेमलिनने ही कर्तुकी कशी केली ? दयेची भीक घालण्याइतकी तयारी ! अर्थात १९६२ च्या सुरुवातीपासून वृत्तपत्रे, सुरक्षा यंत्रणा यांना ही कुणकुण लागलीच होती. प्रत्यक्ष पुराव्याच्या अभावी निश्चित निदान मात्र होत नव्हते. शीतयुद्धाचे वारे असले तरी बड्या शक्ती परकीय तळाचा असा वापर करण्यास धजावत नव्हत्या. परस्परांना दबून होत्या.

मध्यंतरीच्या काळात रशिया क्युबात कसली जहाजे नेते, एस. ए. II ही विमान-

वेधी क्षेपणास्त्रे नेते का याचा गुप्तहेर छडा लावीतच होते. सप्टेंबरच्या अखेरीस झाकपाक करून आलेल्या सहा नौकांच्या काफिल्यात काय होते ? या नौका रात्री गोदीस असत. कडेकोट बंदोबस्तात पहाटेची प्रभा फाकण्यापूर्वी कसला माल उतरवून निघून जात ? हे असे छुप्पा पद्धतीने काय घडत होते ? सप्टेंबरच्या ११ ता. स क्रेमलिनलाही कळले होते, की वॉशिंग्टन अस्वस्थ होऊन संशयास्पद झाले आहे. ख्रुश्चोवने जाहीर केले होते की, आपली अस्त्रे इतकी सामर्थ्यशाली आहेत की अन्यत्र कुठे भाड्याचे घर घ्यायची गरज नाही ! घरबसल्या ती हवी तेथे फेकू ! क्युबाला देण्यात येणारी सामुग्री त्यांच्या संरक्षणाच्या गरजेसाठी आहे ... शुद्ध संरक्षण. १३ सप्टेंबरला वार्ताहरांनी केनेडींनासुद्धा छेडले ! त्यांच्या सुरावरून असे दिसले, की क्रेमलिनचा दावा पटण्यासारखा आहे. पण क्युबातल्या तळाने अमेरिकेच्या संरक्षणव्यवस्थेला किंचितही दुरून आव्हान मिळाले तर त्यासाठी कुणाचीही गय केली जाणार नाही. असा निर्वाणीचा इशारा त्यात होता.

## हरवलेली छायाचित्रे !

क्युबाकडे निघालेल्या रशियन नौकांचा सुगावा आधी ' नित्याच्या कामगिरीवर' निघालेल्या अमेरिकन नौदलाच्या विमानांना लागला. २८ सप्टेंबरला त्यांनी घेतलेल्या छायाचित्रांचे परीक्षण नॅशनल फोटोग्राफिक इंटरप्रिटेशन सेंटरमध्ये दोनतीन दिवसात करण्यात आले. पण त्यातला नेमका एक गठ्ठा ११ दिवस कुणाच्या ध्यानातच आला नव्हता ! त्यातच रशियन नौकांतील दोघींवर लादलेल्या अवजड अस्त्रांसंबंधी छायाचित्रे होती ! आता वेळ दवडून उपयोग नव्हता. जुन्या संग्रहातून लगेच त्या धर्तीची छायाचित्रे आणून अभ्यास सुरू झाला. चिकित्सा सुरू झाली. १९५८ साली सुरक्षा यंत्रणेने टिपलेल्या अशाच प्रकारच्या रशियन नौकांशी ती जुळत होती. त्या नौकातून ७५० मैल वेध घेऊ शकणारी २८ जेट बॉंबर्स वाहून नेली होती.

त्या नौकांचा तलास काढा : गुप्तहेर खात्याला शीघ्र आदेश मिळाला. त्या काफिल्यात काय आहे, याची बित्तंबातमी काढायची होती.

नौकांवरची सामुग्री एका वापरात नसलेल्या विमानतळाच्या मैदानात नेली जात होती. तळाची डागडुजी सुरु झाली. विमानवेधी हल्ल्याची यंत्रणा उभी होत होती : तपास लागला. १४ ऑक्टोबरला छायाचित्रांच्या परीक्षणावरून तज्ज्ञांनी निष्कर्ष काढला. अण्वस्त्रे, बॉंबस यांचा निश्चित माग लागला होता. त्या छायाचित्रांवरुन आढळत होते की, कमीत कमी अशी २१ विमाने सज्ज होती. अमेरिकेच्या दिलेल्या आश्वासनाला पाने पुसली होती. बॉंबर्सचा शोध लागला. सॅन क्रिस्तोबालच्या तळाचा माग घ्यायचा होता. मग पडताळा आला असता.

यू - २ च्या दृष्टीने ही नित्याची गोष्ट. त्यांची यंत्रणा इतकी परिपूर्ण की एकाच उड्डाणात बरीच मोलाची माहिती हस्तगत होई. १४ मैल उंचीवरुन सव्वाशे मैल

रुंद, तीनहजार मैल लांबीच्या परिसराचे चित्रण होई. नऊ बाय अठरा इंचाची फिल्म मिळे. त्यावरून संशोधक जमिनीवरच्या वस्तूंचे प्रत्यक्ष आकारमान ठरवू शकत. अगदी इंचाच्या अंशात फरक पडत नसे इतके अचूक चित्रण असे ते. सहा-मैल उंचीवरुन घेतलेल्या छायाचित्रातून जमिनीवरचा टेनिसबॉलही हुडकता येई ! कॅस्ट्रोशी १९६१ मध्ये बिघडलेल्या संबंधापासूनच यू-२ ची टेहळणी चालू होती. पण ती तेव्हा तात्कालिक होती आता नजर जारी करण्यात आली. ऑक्टोबर १४ ला निर्णायक पुरावा देणारी ती फिल्म मेजर रुडॉल्फ अँडरसन आणि मेजर रिचर्ड हेसर या पायलट्सनी घेतली होती.

## बड्या अधिकाऱ्यांची धावपळ

फोटो इंटरप्रिटेशन सेंटरचा पहिला फोन अर्थातच त्या दिवशी सी. आय. ए. प्रमुख जॉन मॅक्‌कोनला गेला. पण त्यावेळी मॅक्‌कोन आपल्या मुलाचे शव आणण्यासाठी लॉसएंजेलीसच्या विमानावर होता. त्याचा मुलगा रेसिंगच्या अपघातात ठार झाला होता. वॉशिंग्टनला ही वार्ता पोचवण्याचे काम त्याचा साहाय्यक ले. ज. मार्शल कार्टरवर आले.

मग एकच धावपळ सुरू झाली. सी. आय. ए. कडून बातमी कळताच ले. ज. जोसेफ कॅरोलने संरक्षणमंत्रालयाच्या डे. सेक्रेटरीला–रॉस्वेल गिलपॅट्रिकला फोन लावला. कार्टर, कॅरोल आणि दोघे छायाचित्र परीक्षक, जॉइंट चीफ ऑफ द स्टाफ जनरल मॅक्स्वेल टेलरच्या घरी रात्री पोचले. तेथे मेजवानीची तयारी सुरू होती ! राजनैतिक खात्याचा डे. सेक्रेटरी अलोक्सिस जॉन्सनही तेथेच होता. लगबगीने क्युबातील ' क्रायसिस 'चा सारांश त्यांच्या कानावर टाकण्यात आला. अमेरिका एका षड्यंत्राच्या पंज्यात सापडली होती, हे त्यांनी मान्य केले. एका अण्वस्त्रधारी शक्तीला दुसऱ्या लाल शक्तीने आव्हान दिले होते.

रात्री ८–३० वा. जनरल टेलरच्या घरून राष्ट्राध्यक्षांच्या खास सल्लागाराला फोन करण्यात आला.–मॅक्‌जॉर्ज बंडी. त्याच रात्री आणखी काही उच्चाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. प्रे. केनेडींना सकाळपर्यन्त ही बातमी कळवली नव्हती. मॅकजॉर्ज बंडीनेच थोडा सबूर केला. शासनाची अत्यावश्यक ती चक्रे हलवण्याची व्यवस्था जारी केली. या प्रकरणातले पूर्ण तपशील हाती लागून आणि इतर कारवाई सुरू होईपर्यंत थांबणे जरूर होते. काही तासांचा अवधी गेला.

दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी सकाळी १६ ऑक्टोबरला एक सुरक्षा अधिकारी सोबत ध्ययाचित्रांचा गठ्ठा आणि दोन विशेषज्ञ घेऊन व्हाईट हाऊसच्या पश्चिम दालनात गेला. त्या भागात केनेडींचे कार्यालय होते. आधी बंडीची त्याने भेट घेतली. त्याला तपशील सादर केला. पंचेचाळीस मिनिटानंतर बंडीने केनेडींच्या खास लिफ्टचे बटन दाबले. वरच्या मजल्यावर पोचून राष्ट्राध्यक्षांच्या खोलीच्या दरवाजावर टकटक केले. बेल किणकिणली. रात्रभरात ज्या काही महत्त्वाच्या घडा-

मोडी झाल्या असतील त्यांची खबर राष्ट्राध्यांना देणे आणि त्याबाबतचे आदेश मिळवणे, हे सकाळचे ड्रेसिंगच्या आधीचे बंडींचे नित्याचे काम होते.

त्या दिवशी केनेडींनी नुकतीच सकाळची ताजी दैनिके चाळली होती. गाऊन अंगावर होता. बंडी आत येताच वर्तमानपत्रातल्या ताज्या वार्तानुसार त्यांनी भराभर हुकूम दिले. मध्येच बंडीने सांगितले. 'क्युबात क्रेमलिनने आक्रमक तळ उभारले आहेत. त्याची सज्जड छायाचित्रे हाती आली आहेत, तुम्ही पाहालच नंतर.'

केनेडींनी या क्षणी कोणती प्रतिक्रिया व्यक्त केली ते गुलदस्तातच आहे. या प्रकरणावर त्यांचे मत नंतर ' मेमॉयर्स 'मध्येच नोंदले जाईल, अशीच निरीक्षकांची अटकळ. (अर्थात ते सारेच आता संपले आहे ! ) काही असो, बंडीने आणलेल्या रिपोर्टवर केनेडींनी तत्काळ नजर टाकली.

' दहा मिनिटांनंतर बंडी केनेडीच्या खोलीतून बाहेर पडला. त्याच्या हातात यादी होती—नॅशनल सिक्युरिटी कौन्सिलच्या सर्वोच्च सभासदांना राष्ट्राध्यक्षांनी लौकरच बोलावले होते.

बंडी निघून गेल्यानंतर केनेडींना या घटनेवर विचार करायला निश्चितच काही अवसर मिळाला असेल. गुप्तहेरांची यंत्रणा निखळ पुराव्यासाठी धडपडत असली तरी वॉशिंग्टनला भीक न घालता त्यांनी हा तळ उभारायला कमीत कमी एखादे वर्ष तरी घेतलेच असेल ! क्रेमलिन असे काही करील, याची कल्पना नव्हती... १९६१ च्या व्हिएन्ना परिषदेनंतर उभयतात बरीच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष देवाण घेवाण झाली होती. जॉर्जी बोल्शाकोव्ह या रशियन दूतावासातील एका उच्च पदस्थाचा या वाटाघाटीत बराच संबंध आला होता. १ ऑक्टोबरला त्याला क्रेमलिनने बोलवून सूचना दिली की, केवळ क्युबाच्या संरक्षणासाठी हा प्रकल्प आहे. अमेरिकेच्या केसाला त्यात धक्का लागणार नाही. ती अस्त्रे कमी पल्ल्याची आहेत. अशा प्रकारे—क्युबाची संरक्षणव्यवस्था, कमी पल्ला इ. शब्दप्रयोगांनी क्रेमलिनने आपला हेतू कळवला होता. जॉर्जीनेच ही देवाण घेवाण केली. याउलट व्हाईट हाऊसची प्रतिक्रिया अशी आहे की ख्रुश्चोवच्या या ' दुटप्पी ' षडयंत्रानेच वातावरण बिघडले. इतिहास याची अशीच दखल घेईल.

## घटनाच वेग घेत होत्या....

पण यू–२ ने घेतलेली छायाचित्रे प्रसारित झाली म्हणजे हे बिंग बाहेर फुटणार होते. आता अमेरिका हा प्रश्न कसा हाताळते, शक्तींचा समतोल कसा राहतो : हेच आव्हान होते. या निर्णयाला आता पर्याय नव्हता आणि पळवाटही नव्हती ! घटनाच आता वेग घेत होत्या.

बंडी केनेडींशी बातचीत करीत होता त्याचवेळी सेक्रेटरी ऑफ स्टेट : डीन रस्कलासुद्धा याची माहिती दिली जात होती. वॉशिंग्टनभर उच्चपदस्थांना सजगतेचा इशारा दिला.

## सारे कसे ‘ संथशांत !’

९–३० वा. राष्ट्राध्यक्ष केनेडींच्या अधिकृत दिनक्रमाला सुरुवात झाली. अंतराळ-शास्त्रज्ञ कमांडर शिरा, आपली पत्नी व दोन मुले यांच्यासह आले. त्यांची खाजगी भेट होती. थोड्याफार गप्पागोष्टी करून, फोटोचा कार्यक्रम उरकून ते दक्षिणेच्या हिरवळीवर हिंडले.

असे संथशांत दर्शवणे भाग होते ! नंतरचा आठवडाभर ही प्रशांत अभिनयाची भूमिका बजावायची. नाहीतर पायाखाली काय जळते, म्हणून बातमीदारांनी पिच्छा पुरवला असता !

११–४५ वा. राष्ट्राध्यक्षांनी मीटिंग बोलावली. बंडीने निमंत्रण दिलेले ते सभासद कॅबिनेट रूममध्ये एकत्र आले. सुरुवातीला, यात गंभीर ध्येयधोरणाचा प्रश्न नाही, परिस्थितीचा अंदाज घ्यायचा आहे, असे घोषित करण्यात आले; असे सांगण्यात येते. तथापी जसजसे पुरावे उपलब्ध झाले तसतसा खंबीरपणा निर्णायक होत गेला. यात असही एक दृष्टिकोन व्यक्त झाल्याचे सांगण्यात येते, की शक्तींचा समतोल भंगण्यासाठी, लक्ष उडवण्यासाठी केलेला हा मानसिक प्रयोग असू शकेल. अण्वस्त्रे सोडायचीच, तर रशिया ती आपल्याच भूमीवरून आधी सोडील. काहींच्या मते लक्ष पलटवण्याचा खरा बिंदू ‘ बर्लिन ’चा होता.. क्युबातले तळ हे आव्हानच होते.

तज्ज्ञांच्या मते त्या काळात अमेरिका आणि इतर दोस्त राष्ट्रे यांच्यापाशी मिळून ३८९ अण्वस्त्रे सुसज्ज होती. यातली 'मिनिटमन' तर ६००० मैल पल्ल्याची आणि ३९ सेकंदात प्रक्षेपित होणारी होती. याउलट रशियापाशी आंतरखंडीय ७५ क्षेपणास्त्रे होती. ५० इतर कमी पल्ल्याची, अशी मिळून १२५ होती. खुद्द रशियापेक्षा क्युबातला हा ‘ उद्योग ’ क्रेमलिनला स्वस्त पडणार होता. आणखीही अनेक लष्करी डावपेचांची चर्चा करून एका मुद्यावर मात्र एकमत होत होते : शक्तींचा असमतोल क्युबातल्या लाल प्रक्षेपक तळाने घडवून आणला. आणि त्याला आव्हान देण्याचा धोका अमेरिकेच्या पदरी आला होता.

मर्यादेबाहेर गोष्ट केव्हाच घडली होती. हा करपाश सोडवणे म्हणजे युद्धालाच आमंत्रण होते.

ऑक्टोबर १६ ते ऑक्टोबर २१ या सहा दिवसांवर आजवर पुष्कळच लिखाण प्रकाशित झाले आहे.

क्युबातील लष्करी हालचाली, अण्वस्त्रे इ. ची पुरेपूर माहिती मिळवणे हे पहिले काम होते. सी. आय. ए. आणि इतर यंत्रणा घड्याळाच्या काट्याशी झगडू लागली. यू–२ विमानांनी जमेल तेवढा खाली सूर मारून छायाचित्रण सुरू केले. पश्चिम गोलार्धात कुठेही धडकू शकतील अशी क्षेपणास्त्रे सज्ज असलेले नऊ तळ हुडकण्यात आले. मध्यम पल्ल्याच्या ४८ क्षेपणास्त्रांची मोजदाद झाली. अतिदूर पल्ल्याची

काही आढळली नाहीत. कदाचित ती नौकांवरच असावीत ! किंवा संघर्ष टळल्या-वर त्यांचे क्युबातच विच्छेदन झाले असेल. ४७ ठिकाणी विखुरलेले सैन्यतळ, तसेच तीन विमानतळ, नौका-तळ इ.चा पत्ता लावण्यात आला. केनेडींचे शासन मानीत होते त्याप्रमाणे हे केवळ 'तंत्रज्ञ' नव्हते ! याशिवाय क्युबाच्या भूगर्भ-रचनेचा फायदा घेऊन काही गुहाही सुसज्ज होत्या ! रेडिओअॅक्टिव्ह मटेरिअल सुरक्षित ठेवण्या-साठी काहींची रचना शिशाने घडवली होती.

## सहा पर्याय

केनेडींच्या पहिल्या मीटिंगच्या वेळी सहा पर्याय पुढे मांडण्यात आले—

एक : काहीही न करणे ! पण हे अशक्य होते. कारण धोक्याची कल्पना पटली होती.

दोन : ख्रुश्चोव्हकडे खाजगीरीत्या कडक निषेध प्रकट करणे. सुरुवातीला याबाबतीत काही हालचाली झाल्या, क्रेमलिनला १७ तास एक खास दूत म्हणून अॅडले स्टीव्हनसन याला धाडण्यात आले होते.

तीन : यूनोत हा प्रश्न उपस्थित करावा. पण यात आशेचा किरण अंधुक होता.

चार : विदेशी जहाजांवर सक्त नियंत्रण घालणे. नाकेबंदी करणे, पण दोस्त आणि तटस्थ राष्ट्रांना ते जाचक वाटले असते. पण हे पहिले पाऊल टाकायची वॉशिंग्टनची तयारी होती.

पाच : अण्वस्त्रांचा मागोवा घेण्यासाठी अचानक विमानहल्ला ! पण यात भयंकर धुमश्चक्री झाली असती...

सहा : कॅस्ट्रोशी सरळ सरळ दोन हात करणे. पण याला वेळ लागला असता.

ता. १७ आणि १८ च्या बैठकीत पाचव्या मुद्यावर विमर्श झाला. अॅटर्नी जनरल रॉबर्ट केनेडीने सर्व बाजू विचारात घेता म्हटले होते : माझा भाऊ या दशकातला जनरल तोजो (पर्ल हार्बरवर १९४१ मध्ये हल्ला चढवण्याचा हुकूम याने दिला होता) बनू चाहत नाहीय्......

अखेरीस रॉबर्ट केनेडी आणि संरक्षण सचीव रॉबर्ट मॅक्नामारा यांनी embargo ची, चौथ्या मुद्याची, कल्पना पुढे रेटली. राष्ट्राध्यक्षांनी या कृतीस quarntine असे अभिधान दिले. १८ ऑक्टोबरनंतर ही कल्पना अमलात आणण्याची चक्रे घुमू लागली.

विलक्षण संघर्षात वावरत असताही केनेडी नेहमीप्रमाणे संथ शांत होते. ती खास केनेडी स्टाईल होती. गुरुवारी कसोटीची मालिका सुरू झाली. सकाळी ७–१० वा. मॅक्नामाराच्या केबिनमध्ये रॉबर्ट केनेडी, जनरल टेलर आणि मॅक्नामारा यांनी क्युबातली ताजी फिल्म पाहिली. तेथली प्रक्षेपणास्त्रांची प्रगती फोफावली होती.

मग सोविएतचे परराष्ट्रमंत्री ग्रोमिको यांच्याशी मीटिंग ठरली होती. सरळ

सरळ बोलणे अमेरिकनांना रुचते, असे त्याने तिरकसपणे म्हटले. केनेडींनी १३ सप्टेंबरचे विधान पुढे केले : आक्रमक हेतू ठेवून क्युबात रशिया तळ उभारीत असेल तर अमेरिका जे काय करायचे ते करीलच. ग्रोमिकोने साखरगाठी बांधीत म्हटले : रशिया अशा झंझटीत कधीच पडत नाही! केनेडींनी मोठ्या प्रयासाने संयम ठेवला !

## सागरक्षेत्राची नाकेबंदी

कितीही खबरदारी घेतली तरी १९ ता. स अफवा उठल्या होत्या. काहीतरी घडणार आहे! नौदल जेट विमानांचे एक स्क्वाड्रन फ्लोरिडापाशी होते, वृत्तपत्रांना त्याचा वास लागला ! अधिकाऱ्यांना नेमके काही सांगणे अवघड झाले. ठरलेले कार्यक्रम बदलले गेले. 'कार्यबाहुल्याने' व्हर्जिनियाची भेट रस्कने रद्द केली. पेंटॅगानने नेमकी उत्तरे द्यायचे टाळले.

तरीपण तणाव टाळण्यासाठी केनेडी ओहियो आणि इलिनॉईस येथे भाषणांसाठी निघाले, पण त्यांचाही कार्यक्रम रद्द झाला ! मध्येच ते परतले. जॅकेलिनशी आणि मुलांशी ते बागेत थोडा वेळ हिंडले. तेवढ्याने त्यांना तरतरी आली. प्रसन्नपणे ते पुन्हा कामात गढले.

अखेर शनिवारी निर्णय ठरला. क्युबातली सर्व क्षेपणास्त्रे हलवण्याची मागणी निश्चित ठरली. मर्यादित प्रमाणात embargo लागू करण्याचे : विदेशी नौकांच्या हालचालींवर नियंत्रण—: ठरले. त्यासाठी २४ तासांची मुदत देण्यात आली.

केनेडींना निर्णायक भाषण करायचे होते.

२१ ता. च्या मध्यरात्री नौदलाला सज्ज राहण्याचा संदेश देण्यात आला. अटलांटिकमधील सागरक्षेत्राची नाकेबंदी करायची होती. वेगवेगळ्या विनाशिका, क्रूझर्स, शक्तिशाली पाणबुड्या, विक्रमी आधुनिक सज्ज नौका. ह्या 'टास्क फोर्स १३६' ने क्युबाभोवती भक्कम कडे केले.

वायुदलही सावध होते. वेगवेगळ्या तळांवर संदेश गेलेच होते.

रविवारी दुपारपर्यंत फ्लोरिडाला युद्ध छावणीचे स्वरूप आले. रात्री अॅडमिरल मक्एलरॉयला 'सिनक्लँट'—कमांडर इन चीफ अटलांटिक—कडून आदेश मिळाला. त्यानुसार डिस्ट्रॉयर डिव्हिजन ६०१ च्या विनाशिका ग्रेट बहामा व फ्लोरिडाच्या किनाऱ्यानजीक मोर्चे बांधू लागल्या.

रुश्चोव्हलाही याची कल्पना आली होती! अमेरिका बहुधा काही 'कडक अॅक्शन' घेणार नाही, असे गृहीत धरूनच बहुधा क्रेमलिनने सुरुवात केली असावी. पण २३ ऑक्टोबरला २ वा. मॉस्कोला—केनेडींचे भाषण तरळत गेले तेव्हा ह्या कल्पना वितळल्या. भलीभक्कम लष्करी तयारी उभारली जाणार, याबद्दल क्रेमलिनला शंका नव्हती. अनपेक्षित घटनांचे वृत्तान्त येत होते : भूमध्य सागरातले ६ वे आरमार नोरफोकला येऊन ठेपलेले. सागरी कारवाईच्या आणखी बातम्या येतच होत्या.

वॉशिंग्टनमधील राजदूत डोब्रिनिन ला सेक्रेटरी ऑफ स्टेट रस्क ने ६ वा बोलावणे धाडले. अचानक. विषयाचा उपोद्घात नव्हता.

सरळ आव्हानाची मुहूर्तमेढ रोवली जात होती. आपण करू ते धोरण आणि बांधू ते तोरण ही स्थिती राहिली नाही, याची क्रेमलिनला जाणीव होत होती.

## डिफ्कॉन : ३ चा आदेश

२२ ऑक्टो. १९६२ ला केनेडींच्या भाषणाचा तो क्षण ऐतिहासिक महत्त्वाचा होता. पेंटॅगॉनहून त्याच वेळी एक आणिबाणीचा आदेश प्रसृत झाला. जगातल्या प्रत्येक अमेरिकन तळावरच्या इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डावर फ्लॅश झळकू लागले. डिफ्कॉन (डिफेन्स कन्डिशन) ३चा हुकूम मिळाला. एकूण ५ डिफ्कॉन होते. डिफ्कॉन नं. ५ नॉर्मल. — शांततेच्या काळातील. डिफ्कॉन—२ म्हणजे एकदम आणिबाणी. — या आदेशाने एकदम युद्धाचा पवित्रा घ्यायचा. आणि डिफ्कॉन — १ च्या आदेशाने युद्धाला तोंड लागणार. डिफ्कॉन — ३ चा आदेश मिळाला म्हणजे डिफ्कॉन — २ साठी सज्ज राहण्याची पूर्वसूचना. जनरल थॉमस पॉवरच्या युद्धकार्यालयातून संदेश प्रसारित झाले. सर्वच तळावरील विमाने अस्त्रांनी सज्ज होऊन पुढल्या क्षणाची वाट पाहू लागली.

वायु दलाकडे तीन शक्तीमान रडार क्युबाचा वेध घेण्यासाठी होते. पण त्यातूनही २ ते ८ मिनिटापर्यंतच पूर्वसूचना मिळू शकली असती. त्यामुळे सोमवारी केनेडींचे भाषण व्हायच्या सात तास आधी जनरल पॉवरने लक्ष्ये हेरण्याचे काम सुरू केले. मध्यम पल्ल्याच्या बी—४७ बॉंबर फोर्सला कधी नव्हे तो 'हुश्शार'चा संकेत मिळाला. किनाऱ्या किनाऱ्याने ४० नागरी तळावरून ही बॉंबर्स घिरट्या घालू लागली. त्यांचे इंधन इ. साठीची तयारी अनेक वर्षांपूर्वीपासून आखणी करून ठेवली होती.

नागरी तळावरची ही बॉंबर्स पूर्वी आपले दरवाजे खुल्ले ठेवीत — अर्थ असा की आत काही अण्वस्त्रे नाहीत, याची खात्री लोकांना पटावी. आज हे दरवाजे बंद होते! मध्यान्हानंतर जनरल पॉवरने बी — ५२ बॉंबर्सलाही आदेश दिला. काही मिनिटात सज्ज! वस्तुस्थिती अशी होती की ३० दिवस आधी हा आदेश द्यावा. बी—५२ फोर्सला एकूण २०,०२२०० मैलांचे उड्डाण करावयाचे, ७० द. ल. गॅलन इंधन घ्यायचे. आणि हे सारे अगदी केसाची गलती न होता, अपघात न होता! त्या दृष्टीने आलेला हा तत्काळ पडताळा विस्मयजनक होता.

'जागतिक शांतता आणि सहकार्यावर आधारलेले आमचे धोरण आहे. पण आता पुढची कृती आवश्यक आहे. ती केवळ सुरुवात ... आमच्या संरक्षणाच्या सिद्धतेला आव्हान देणाऱ्या कुठल्याही शक्तीशी आम्ही निश्चित मुकाबला करू. शरणागतीचा किंवा माघारीचा मार्ग आम्ही कधीही पत्करणार नाही.'

मॉस्कोत रात्रीचे २.१८ वाजले होते. केनेडींचे प्रभावी शब्द उमटत होते. अर्थ

स्पष्ट आणि निर्धाराचा होता. क्रेमलिन अवाक् झाले.

श्वास रोखून पाहायला लावणारे क्षण वेगाने सरकू लागणार होते.

आणि यात युद्ध हवे की नको, ही निवड मात्र क्रेमलिनची होती की अमेरिकेची ?

वॉशिंग्टनला 'पी अवर मायनस वन' (प्रेसिडेंट केनेडींच्या भाषणाची वेळ) ला स्टेट डिपार्टमेंटची सूत्रे हलू लागली. सोविएत राजदूत डोब्रिनिन डीन रस्कच्या प्रतीक्षालयात येऊन ठेपला होता. रस्कला भेटण्यापुर्वी डोब्रिनिन बातमीदारांशी गप्पा मारत होता. २५ मिनिटांनी तो रस्कला भेटून परतला तेव्हा त्याच्या हातात केनेडींच्या भाषणाची 'अॅडव्हान्स' प्रत होती. थरकलेला वाटत होता. बातमीदारांनी विचारले, सोविएत –अमेरिका यांच्यात बेबनाव झालाय ? डोब्रिनिन एवढेच म्हणू शकला – रस्कलाच विचारा !

## 'योग्य वेळी उत्तर मिळेल !'

२३ ऑक्टोबरला मंगळवारी यूनोच्या सुरक्षा मंडळाची तातडीची बैठक झाली. स्टिव्हन्सनने रशियाच्या आक्रमक धोरणाच्या चिंध्या उडवल्या. रशियन प्रतीनिधी झोरिनने आधी गम खाल्ली, पण मग त्यानेही कडाडून हल्ला केला. अशी क्षेपणास्त्रे क्युबात नाहीतच, किंवा तसा काही पुरावा अमेरिकेने सिद्ध केला नाही, हे त्याचे उत्तर. स्टिवन्हनसनने लगेच म्हटले, महाशय, एक साधाच प्रश्न : ही अस्त्रे रशियाने क्युबात उभारलीत की नाही, याचे हो किंवा नाही, एवढेच उत्तर द्या. भाषांतरासाठी थांबू नका !

झोरिन म्हणाला – मी अमेरिकेच्या कोर्टात नाहीय ! अशा अवस्थेत दरडावणीला मी उत्तर देत नाही.

स्टीव्हनसन–हो किंवा नाही हे तुमचे उत्तर असू शकते. त्यांचे अस्तित्व तुम्ही नाकारलेच आहे. तुमचे मला खरोखरच पटलेय का, हे मला जाणून घ्यायचे आहे.

झोरिन–आपले भाषण चालूच ठेवा ! योग्य वेळी तुम्हाला उत्तर मिळू शकेल.

स्टिव्हनसन उसळला–अगदी जगाच्या अंतापर्यंत थांबायची इच्छा असली तर या उत्तरासाठी वाट पाहण्याची माझी तयारी आहे. येथेच काय हवा तो पुरावा दाखवण्यास आत्ता मी तयार आहे. मग त्याने यू–२ ची फिल्म दाखवली. छायाचित्रे दर्शवली.

२४ ऑक्टोबरला बुधवारी मॉस्कोतली एक आंतरराष्ट्रीय व्यापारी परिषद संपत होती. विल्यम नॉक्स हा एक प्रतिष्ठित अमेरिकन व्यापारी त्यात होता. परिषदेचे सूप वाजल्यानंतर आपल्या यजमानांचा तो निरोप घेत असताना त्याला अचानक क्रेमलिनकडून बोलवणे आले ! राजमार्ग सोडून संबंध सुधारण्यासाठी हा मार्ग पत्करला गेला...

१५ मिनिटे उशीराच नॉक्स आपल्या रशियन दुभाष्याबरोबर तेथे पोचला.

ख्रुश्चोव्हने तीन तासपर्यंत घणाघाती मुलाखत घेतली त्याची ! धमक्याच होत्या त्यात. क्युबातल्या तळांचा गौप्यस्फोट कबूल करून त्यांचा आक्रमक हेतूही स्पष्ट केला. अमेरिकन नौदल फारतर एक-दोघा रशियन जहाजांचा मार्ग अडवू शकेल, पण तसे झाले तर : ती तिसऱ्या युद्धाची ठिणगी...

मग ख्रुश्चोव्हने आपले विख्यात 'पिस्तूल तत्त्व' त्याच्यापुढे मांडले. हाताने नेम धरून त्याने म्हटले, हे पाहा, जर अशी तुझ्यावर पिस्तुलाची नळी धरली तर ते पिस्तूल आक्रमक शस्त्र ठरेल, पण जर तुझा नेम चुकवण्यासाठी मी नळी उभारली तर ते संरक्षक : एवढाच फरक होय ना ?

कोरडेपणे नॉक्सने उत्तर दिले की, या लष्करी गुंतागुंतीत आपले काही गम्य नाही. सरक्षक आणि आक्रमक शस्त्रातला फरक काही केवळ हेतूंचा नाही...पण ख्रुश्चोव्हने विषय बदलला.

त्यानंतर नॉक्सने त्याच पावली वॉशिंग्टन गाठले. तज्ज्ञांना एकूण मुलाखतीचा वृत्तान्त दिला.

## पी डे प्लस...

बुधवारी यूनोने दोघा राष्ट्रांना पाचारण केले. पण केनेडींनी त्यातली मख्खी ओळखली. 'शांततेच्या हेतूच्या पाठपुराव्यासाठी' क्रेमलिनने बैठक मान्य केली. पण केनेडींनी निर्धाराने सांगितले—क्युबातली गुप्त अस्त्रांची उचलबांगडी केल्या-वाचून दुसरा पर्यायच नाही !

ख्रुश्चोव्हवरचे दडपण वाढत होते.

त्याआधी मंगळवारी २३ ता.स पी डे प्लस वन : संरक्षण मंत्री मॅक्नामारा यांनी घोषित केले की, क्युबाकडे २५ रशियन जहाजे येत आहेत, आणि त्यांनी आपला मार्ग गेल्या चोवीस तासांत बदललेला नाही.

बुधवारी : पी डे प्लस टू : मॅक्नामारांनी अंदाज वर्तवला, की ७·३० ला संध्याकाळी त्यांच्याशी गाठ पडेल. त्या दिवशी दुपारी काही जहाजांनी सकृद्दर्शनी आपला मार्ग बदलल्याची बातवणी केली.

गुरुवारी : पी डे प्लस थ्री : १२ जहाजांनी निश्चितच आपला मार्ग बदलला असल्याची मॅक्नामाराने घोषणा केली. त्यात शस्त्रास्त्रे होती. 'बुखारेस्ट' नावाचे एक तेलवाहू जहाज सरळ समोर येत होते. त्याची तपासणी करून जाऊ देण्याचा आदेश देण्यात आला.

शुक्रवारी : पी डे प्लस फोर : क्युबातले तळ हलवण्याऐवजी नव्या गतीने त्यांची उभारणी चालू असल्याची छायाचित्रे स्टेट डिपार्टमेंटने प्रसारित केली. ती अस्त्रे हलवल्यानंतरच बाकीचे धोरण मान्य केले जाईल, ही भूमिका कायम होती.

शुक्रवारी रात्री मनु पालटला !

मॉस्कोहून लांबलचक पत्र व्हाईट हाऊसला आले. तातडीच्या तारेने—गुप्त. त्यातला संपूर्ण मजकूर कधीच उजेडात आला नाही.

## पहिला दोर कोण ठेवणार ?

मध्ये ढिली गाठ दिलेली असावी आणि त्या दोराची दोन्ही टोके दोन दिशांनी शर्थीने ओढत असावे, तसे आपणादोघात चाललेय, असे रुश्चोव्हने त्यात म्हटल्याचे सांगण्यात येते. दोघांनी शर्थ केली तर ती अधिकच पक्की होईल. पण केनेडींनी आपले टोक खेचणे थांबवले तर रुश्चोव्हही थांबेल. शिवाय त्यात प्रक्षेपणाबाबत ' नरो वा कुंजरो ' केल्याची कबुली दिली होती. पण केनेडींनी ती आक्रमक असल्याचा दावा ' समजू ' शकल्याचे मान्य केले.

रात्रभर तज्ज्ञांनी त्या आश्चर्यजनक पत्राचा कीस काढला. क्युबावरील मोहीम अमेरिकेने स्थगित केली तर तळ हलवण्याची तयारी आहे असा गर्भितार्थ मंजूर करण्यात आला.

शनिवारी सकाळी : पी डे प्लस फाईव्ह : तासने रुश्चोव्हचे आणखी एक पत्र प्रसरित केले. अमेरिकेची तुर्कीतून नाटो प्रक्षेपणास्त्रे हलवण्यात यावी, असा त्यात स्पष्ट सूर होता. मग यूनोजवळ अनाक्रमणाचा जामीन द्यायला दोन्ही बाजूंची तयारी होती.

केनेडींनी हा दुटप्पी व्यवहार अमान्य केला. ' तास 'चे ते पत्र प्रेसला दिले. पण आपल्या तज्ज्ञांशी शुक्रवारच्या गुप्त पत्राला काय उत्तर द्यावे, याचा खल केला. शनिवारी रात्री ८ वा. ते उत्तर मार्गी लागले. आपल्या धोरणास आवश्यक त्या तत्त्वांचाच त्यांनी त्यात पाठपुरावा केला. अन्य व्यवहाराला बगल दिली. मुख्य म्हणजे युनोच्या निरीक्षणाखाली क्यूबातले तळ त्वरित हलवले जावेत. आपल्या परीनेही त्यांनी क्युबावर आक्रमण केले जाणार नाही, याची खात्री दिली. ' क्वारन्टाईन ' योजना मागे घेतली जाईल, असे म्हटले.

शनिवार हा या नाट्याचा काळाकुट्ट दिवस होता. रशियन ध्येयधोरण अडीग राहिल्याचे दिवसभर लक्षण दिसत होते.

सकाळी १० वा. क्युबावरून यू–२ चे परतीचे उड्डाण घेत असता मेजर रुडॉल्फ अँडरसनचे यू–२ पाडण्यात आले ! आणखीही दोन लो–लेव्हल विमानांवर गोळीबार झाला.

पहिल्या गुप्त पत्रातल्या आश्वासनाला हरताळ फासला जात होता–क्रेमलिनकडून. चढाईचा दुटप्पी डाव.

असंही मानणं शक्य होतं : सेनाधिकाऱ्यांनी क्रेमलिनचा सल्ला, मार्ग धुडकावला असावा ! दुसरे पत्र रुश्चोव्हच्या नावे प्रसारित करून ते वेळ काढूपणा करीत होते काय ? एखादीही ठिणगी आता ज्वालाग्राही होणार होती...

दुपारी असा एक तणावाचा प्रसंग निर्माण झाला, की अपघाताने अमेरिकेने या मॅचमधून माघार घेतली की न कळे. अलास्कातील तळावरच्या एका यू–२ ला उत्तर ध्रुवावरील वातावरणाचे नमुने आणण्याचा–नुकत्याच झालेल्या रशियन

अण्वस्त्र चाचणीच्या–कामगिरीवर धाडले होते. परतताना त्याची दिशा चुकून सरळ मॉस्कोची वाट धरली त्याने ! रशियन हद्दीत शिरले.

खाली रशियन विमानवेधी तोफा त्याचा समाचार घेण्यास सज्ज होत्या ! लाल विमाने घोंगावत होती.

अखेर गुप्त संदेशाचे मौन सोडून त्याने बिनतारी संदेशाद्वारे योग्य त्या दिशा-नियंत्रणाची मागणी केली.

ख्रुश्चोव्हने ह्याचा वेगळाच अर्थ लावून प्रचाराचा फायदा घेतला असता तर...

रॉजर हिल्शमन–स्टेट डिपार्टमेंटच्या गुप्तहेर यंत्रणेचा प्रमुख केनेडींच्या ऑफिस-कडे धावतच निघाला. गेले तीस तास त्याला झोप नव्हती...एका टेबलाशी सावरून त्याने ही अवचित घटना केनेडींना कथन केली...

केनेडींनी या संघर्षात विलक्षण संयमाचे बळ प्राप्त केले होते. त्याचे ऐकून ते हसत सुटले : ' तुला माहीत आहे : एखाद्याला वेळेवर निरोप कधीच पोचला नाही तर...'

नंतर केनेडींनी या घटनेचे स्पष्टीकरण करून दिलगिरी व्यक्त केली.

रविवार सकाळ : पी डे प्लस सिक्स : ख्रुश्चोवने तणाव मोकळा केला. क्युबा-तले तथाकथित तळ परत हलवण्याच्या आज्ञा दिल्या गेल्या !

आव्हान कुणीच स्वीकारले नाही !

कॅस्ट्रोची राजवट, क्रेमलिनचे क्युबावरचे प्रेम तसेच राहिले. पण प्रत्ययाला आली ती अमेरिकनांची समर्थ तयारी आणि भावना. क्रेमलिनला एक ऐतिहासिक धडा लाभला. ' कागदी वाघ ' म्हणून कुचेष्टा करणाऱ्या अमेरिकेच्या कागदी वाघालाही अण्वस्त्रांचे दात आहेत ! आणि परक्या अण्वस्त्रांचे आक्रमण ते परतवू शकतात.

या घटनेनंतर आता पुष्कळच पाणी वाहून गेले आहे. एक ऐतिहासिक संघर्ष इतकेच जरी त्याचे स्वरूप राहिले असले तरी शीतयुद्धाच्या नाटकातला तो एक गरम भाग होता आणि एखाद्या ज्वालामुखीसारखा तो उसळला होता. पण सहाव्या दिवशी तसाच निमाला म्हणून बरे. दाखवायचे दात आणि खायचे दात यांचे जगाला दर्शन घडले...

गेल्या आठवड्यात, ९ नोव्हेंबरला डॉक्टरांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाली. डॉक्टर पूर्वीच ज्ञानवृद्ध झालेले आहेत. आता हळू हळू ते वयोवृद्धही होत आहेत. पण ते ' म्हातारे ' कधीच होणार नाहीत. ........

# डॉ. रा. शं. वाळिंबे

## एक प्रपाती व्यक्तिमत्त्व

**निशिकांत मिरजकर**

कॉलेजच्या ट्रिपबरोबर एकदा गोकाकला गेलो होतो. आयुष्यात प्रथमच तेव्हा धबधबा पाहिला; आणि मंत्रमुग्ध होऊन गेलो. खळाळत वाहत येऊन फसाळत कोसळणारे ते बेगुमान पाणलोट कितीतरी दिवस डोळ्यापुढून हलत नव्हते. त्या जलप्रपातात सौंदर्य होते, भव्यता होती, गती होती, बेगुमानपणा होता. आसपासच्या सगळ्या स्थिरचराला गतिमय आणि नादमय करण्याची किमया त्या कोसळण्यात होती. सगळ्यांना वाहून घेऊन जाण्याचा आवेश होता. त्या कोसळणाऱ्या प्रपाताच्या धारेत उभे राहावे, अंगाखांद्यावर त्या आवेशाचे तुषार हिंदोळावेत, नव्हे, त्या गतीत वाहून जावे अशी एक विचित्र ओढ त्यावेळी माझ्या मनात निर्माण झाली.

पदव्युत्तर अभ्यासाच्या वेळी पुणे विद्यापीठात गुरुवर्य डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या निकट सान्निध्याचे भाग्य लाभले, आणि तेव्हाची ती ओढ मोठ्या विलक्षण रितीने पुरी झाल्याचा प्रत्यय आला. तोच आवेश, तीच भव्यता. तीच बेगुमान गती. डॉ. वाळिंबे यांचे अवघे व्यक्तिमत्त्व म्हणजे सदैव स्फूर्तीचे ओघ बरसणारा एक अविरत प्रपात आहे. धबधबा आहे.

अगदी साधीसुधी किरकोळ देहयष्टी. रूपाची राजस भव्यता मुळीच लाभलेली नाही. पण सगळ्या हालचालीत आणि वागण्याबोलण्यात अशी ऐट आणि रुबाब

भरून राहिलेला की कोणाच्याही मनावर त्याचा कायम खोल ठसा उमटलाच पाहिजे. त्यांना नव्याने पाहणाऱ्याच्या मनात वाळिंबे या व्यक्तीपेक्षा, वाळिंबे हे व्यक्तिमत्त्व अधिक ठसठशीतपणे साकार होते. कारण ते फार दिमाखदार आहे. ऐश्वर्यसंपन्न आहे. हे ऐश्वर्य आहे ज्ञानाचे, विद्वत्तेचे, व्यासंगाचे. त्यांचे ते तेजस्वी डोळे सहज आपल्याकडे एकटक पाहू लागले, की चिंतनाच्या अवकाशात तरंगणाऱ्या सिद्धान्त प्रमेयांची प्रतिबिंबे त्यात उमटलेली दिसतात. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण आवाजातून, वर्षानुवर्षांच्या व्यासंगाचे मंत्रोच्चारण सतत जाणवत राहते. त्यांची प्रत्येक हालचाल ही ज्ञानाचे भांडार उपभोगणाऱ्या सम्राटाची हालचाल असते.

डॉ. वाळिंब्यांचा व्यासंग ही नवख्यांना दिपवणारी आणि जिज्ञासूंना सतत स्फूर्तिप्रद वाटणारी गोष्ट आहे. त्यांनी आजवर एवढे वाचले आहे, एवढे पचवले आहे, आणि त्यांना इतके सुचले आहे, की त्या सगळ्याची नुसती जंत्री करणे हे देखील फार मोठे अभ्यासोपयुक्त काम होऊ शकेल. स्वत: डॉ. वाळिंब्यांच्याकडे निरनिराळ्या संदर्भांची सुव्यवस्थित टिपणे केलेली कार्डे तयार असतात. पण बहुधा त्यांची त्यांना गरजच भासत नसावी असे मला वाटते. कारण बहुतेक सर्व संदर्भ त्यांना मुखोद्‌गतच असतात. चर्चेच्या ओघात एखादा विषय सुरू झाला की त्यासंबंधीचे पाश्चात्य–पौर्वात्य संदर्भ त्यांना भराभरा आठवत जातात. टीकाशास्त्राची व्याख्याने देताना एम्. ए. च्या वर्गात आम्हाला त्यांनी नुसते पाश्चात्य लेखकच नव्हे, तर अमूक संदर्भ कोणत्या पुस्तकात कोणत्या पानावर अंदाजे सापडेल हेही स्मरणाने सांगितले होते. आणि हा अंदाज सहसा चुकत नसे.

वाङ्‌मयाच्या अभ्यासकाला संस्कृत आणि इंग्रजी टीकावाङ्‌मयाचे सखोल अवगाहन करणे जरूर आहे, असा डॉ. वाळिंबे यांचा आग्रह असतो. भामट, विश्वनाथ, जगन्नाथ, अभिनवगुप्त आणि ॲरिस्टॉटल, रिचर्डस, जॉन ड्युई, सुसान लँगर, जॉर्ज सँटायना ही नावे आणि त्यांच्या लेखनाचे संदर्भ त्यांच्या जिव्हेवर लीलया नाचत असतात. हे सगळे ग्रंथकार मूळातून वाचण्याविषयी त्यांचा कटाक्ष असतो. संस्कृत न वाचता त्यावर टीका करणे आणि इंग्रजी न वाचता त्यातील संदर्भ देणे या दोन्ही गोष्टींचा त्यांना संताप येतो. त्यामुळे काही संस्कृत आणि इंग्रजीच्या प्राध्यापकांपेक्षाही आपले संस्कृत आणि इंग्रजी टीकावाङ्‌मयाचे वाचन जास्त झालेले आहे, असा आश्चर्यकारक सुखद शोध डॉ. वाळिंब्यांच्या विद्यार्थ्यांना नेहमी लागत असतो.

डॉक्टरांच्या व्यासंगाचा साक्षेप सर्वकष असतो. केळकर व्याख्यानमालेच्या वेळी त्यांची काही कच्ची टिपणे पुन्हा लिहून काढण्याचे काम त्यांनी मला सांगितले होते. उतरून काढताना एका मुद्द्याविषयी मला आलेली शंका मी मार्जिनमध्ये लिहून ठेवली. दुसऱ्या दिवशी व्याख्यानात डॉक्टरांनी त्या शंकेचा उच्चार करून

तिच्यासंबंधी साधार सविस्तर विवेचन केले आणि सानंद आश्चर्याचा अनुभव मला मिळाला. तसेच आमच्या कॉलेजमध्ये त्यांना कलामंडळाच्या उद्घाटनासाठी मी बोलावले. कार्यक्रम काहीसा अचानकच ठरल्यामुळे व्याख्यानाचा विषय ठरवायला वेळच मिळाला नाही. "तुमचे कलामंडळ, इथले श्रोते आणि आजचा प्रसंग याला अनुसरून तुम्हीच विषय जाहीर करा." असे डॉ. वाळिंबे यांनी मला सांगितले. त्याप्रमाणे त्यांचा परिचय करून देताना 'मराठी रंगभूमीची वाटचाल' हा विषय मी जाहीर केला आणि विविध नाटकांचे, नाट्यप्रयोगांचे तारीखवार धडाधड संदर्भ देऊन आपल्या अमोघ वक्तृत्वाने डॉक्टरांनी ते गच्च भरलेले सभागृह दीड तास चित्रासारखे तटस्थ करून ठेवले.

खरोखर, डॉ. वाळिंब्यांचे वक्तृत्व हे एक कलात्मक आश्चर्य आहे. त्यांच्या प्रपाती व्यक्तिमत्त्वाचा तो देखणा श्राव्य आविष्कार आहे. चांगल्या कवीचे वर्णन करताना, 'त्याला शब्द जुळवावे लागत नाहीत, ते आपणहून अहमहमिकेने त्याच्यापुढे येऊन पडतात ('अहम्पूर्विकया परापतन्ति')' असे उद्गार अभिनवगुप्ताने काढले आहेत. डॉ. वाळिंब्यांचे वक्तृत्व हे त्याचे साक्षात उदाहरण आहे. या वक्तृत्वाला ओघ आहे आणि आवेशही आहे. समुद्राच्या एका लाटेपाठोपाठ दुसरी लाट यावी तसा लाटांचा विन्यास या वक्तृत्वात आहे. ऐकणाऱ्याला मंत्रमुग्ध करण्याचे सामर्थ्य त्यामध्ये आहे. 'श्रीनामदेव दर्शन' ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाच्या वेळची गोष्ट. आळंदीच्या यात्रेच्या वेळी हा समारंभ झाला. लक्षावधी श्रोत्यांचा प्रचंड समुदाय. आम्हा तिघाही संपादकांची भाषणे त्या गर्दीत कुठल्याकुठे विरघळून गेली. डॉ. वाळिंबे बोलायला उभे राहिले आणि सारा जनसमुदाय जादूने भारल्याप्रमाणे तटस्थ होऊन ऐकू लागला. थोडा वेळच ते बोलले, पण त्यामुळे कार्यक्रमाने एकदम पकड घेतली आणि तिथून मग सर्वच मातबर वक्त्यांची भाषणे रंगतच गेली. डॉ. वाळिंब्यांच्या वक्तृत्वातील सौन्दर्य केवळ सुंदर शब्दयोजनेचे नाही. ते विचार आणि उच्चार यांच्या एकरूपतेचे सौंदर्य आहे. त्यांचा प्रत्येक शब्द हा शब्द म्हणून सुंदर असतोच, पण तो अगदी हृदयाच्या चिंतनातून आणि विचारांच्या मंथनातून उच्चारला गेलेला असतो. त्या वक्तृत्वाला एक लय असते. नाद असतो. संगीताच्या एखाद्या रागाची खुलावट व्हावी तसे हे वक्तृत्व क्षणाक्षणाला अधिकाधिक खुलत असते. डॉ. वाळिंबे कितीही वेळ बोलले तरी श्रोत्यांना कंटाळा असा कधीच येत नाही, कारण श्रोते त्या प्रवाहाबरोबर तल्लीनतेने वाहात असतात.

डॉ. वाळिंब्यांचे लेखन ही त्यांच्या वक्तृत्वाचीच स्थायी आवृत्ती आहे. तोच आवेश, तीच परिणामकारकता, तीच प्रभावी शब्दयोजना आणि तीच संदर्भांची विपुलता आणि अचूकता. डॉक्टरसाहेबांनी उदंड लेखन केले आहे; आणि ते सगळे फार मोलाचे आहे. डॉ. वाळिंबे म्हणजे मराठी टीकावाङ्मयाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केल्यावाचून मराठी टीकेचा

इतिहास लिहिताच येणार नाही. ' साहित्याचा ध्रुवतारा ' (१९४५) ते ' सीमावृक्ष ' (१९७१) या दरम्यान सोळा ग्रंथ त्यांनी निर्मिले. वाङ्मय आणि नाटचच्या दोन्ही कलांचे प्रबंध त्यांनी ग्रंथातून मांडले, तसेच सामाजिक दृष्टचा महत्त्वाचे विचारही व्यक्त केले. वाङ्मयीन टीकेच्या मूलतत्त्वांची त्यांनी खुलासेवार साधार चर्चा केली, तसेच वाङ्मयीन रसास्वादाचे वेधक नमुने स्वतःच्या लेखणीतून निर्माण केले. साहित्यातील संप्रदायांची सोदाहरण चिकित्सा केली, तसेच गडकरी, बालकवी यांच्या कविव्यक्तिमत्त्वांचा शोध घेतला.

गडकऱ्यांच्यावर डॉ. वाळिंबे यांचे फार प्रेम. पण हे प्रेमही डोळस आहे, आंधळे नाही. गडकऱ्यांच्या विविध काव्यकृतींचा मुक्तकंठाने रसास्वाद घेणारे डॉ. वाळिंबे, ' फुटकी तपेली 'च्या गूढगुंजनावर टीका करताना ' अंधळा घोडा असुनि लंगडा तुम्ही राव ढकलत नेला ' ही पठ्ठे बापूरावांची ओळ मिस्किलपणाने उद्धृत करतात.

रसिकता हा वाळिंब्यांच्या टीकावृत्तीचा स्थायीभाव आहे, तर परखडपणा हे तिचे एक स्वयंसिद्ध वैशिष्टच आहे. ' ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती ' उलगडून दाखविणारे डॉ. वाळिंबे स्वतःला न पटणाऱ्या काही विकृतींविषयी पोटतिडिकेने बोलू लागले म्हणजे हे जाणवल्यावाचून राहात नाही. सौंदर्याचे विलक्षण वेड आणि असुंदरतेचा तिटकारा हा त्यांचा स्वभावच आहे. ' साहित्यातील ग्राम्य आणि अश्लील ' यांची चर्चा याच भूमिकेतून त्यांनी केलेली आहे.

वागण्याबोलण्याच्या लकबी, आचारविचार व उच्चार येथपासून तो घराभोवतालच्या बागेपर्यंत डॉक्टरांच्या या सौंदर्यवृत्तीचे दर्शन सर्वत्र प्रत्ययास येते. किंबहुना जीवनातील सौंदर्याचे रसिकतेने ग्रहण करणे व करविणे हे त्यांच्यातील टीकाकाराचे जीवनदर्शन आहे.

डॉ. वाळिंबे यांच्या वयाला ९ नोव्हेंबरला साठ वर्षे पूर्ण झाली. परंतु त्यांच्यातील जिद्द, परिश्रमांची पराकाष्ठा आणि लेखनाचे अनुष्ठान तिळमात्रही कमी झालेले नाही. अजूनही नव्यानव्या लेखनाचे संकल्प त्यांनी करून ठेवले असतील, काही पुरे होण्याच्या मार्गावरही असतील. त्यांच्या टीकाप्रतिभेचे नवेनवे उन्मेष अजूनही मराठी वाङ्मयाला समृद्ध करीत राहतील. डॉक्टर पूर्वीच ज्ञानवृद्ध झालेले आहेत, आता हळूहळू वयोवृद्धही होत राहतील. पण आमचे हे लाडके गुरू कधीच 'म्हातारे' होणार नाहीत. आम्हा तरुणांनाही नवी प्रेरणा, नवी स्फूर्ती व सुजाण मार्गदर्शन नित्य मिळत राहील असेच त्यांचे व्यक्तिमत्त्व कायमचे राहील. कारण हा एक बेगुमान गतीने कोसळत राहणारा स्फूर्तीचा अविरत जलप्रपात आहे !

□ □ □

 पृष्ठ १४ वरून

एक निराळा असा चढा सूर लावीत असे. आता सर्व प्रतिगामी काँग्रेसमधून बाहेर पडले, राहिलेले सर्व सच्चे समाजवादी असे असताना काँग्रेस सरकारने समाजवाद आणावा असा आग्रह धरण्यासाठी नवा फोरम कशासाठी ? पक्षाच्या बैठकीतून, अधिवेशनातून, विधानसभेत व लोकसभेत समाजवादी दडपण आणता येणार नाही काय ? पक्षाच्या धोरणाची चर्चा व तपासणी ही पक्षाच्या अंतर्गत यंत्रणेत करता येत नाही काय ? कोणत्याही पक्षात हे काम अखंडपणे चालूच असते. त्याचा एवढा गाजावाजा करण्याचे व त्यासाठी फोरमचे नवीन संघटन कशाकरता ?

उद्‌घाटक श्री. चव्हाण यांच्या मनात यापैकी काही प्रश्न अंधुक स्वरूपात असावेत, असे दिसते. आपल्या भाषणात त्यांनी एक खास ' यशवंतरावी ' सल्ला दिला तो असा की, अशा एक विचारसरणीचे लोक एकत्र आले की संघटनेतून फुटून आपला वेगळा पक्ष काढतात. परंतु काँग्रेसमधून फुटून असा वेगळा पक्ष काढलेल्या समाजवादी पक्षाची आज काय परिस्थिती झाली आहे ते ध्यानात ठेवावे.

श्री. चव्हाण यांनी उद्‌घाटनाच्या भाषणातच समारोपाचे भाषण करण्याची ही नवीच कला संपादन केली असावी – म्हणजे पुन्हा त्या ठिकाणी जाण्याची तसदी नको ! गोड भाषेत मांडलेल्या वरील सल्ल्याचा स्पष्ट अर्थ असा की, ' समाजवाद जरूर मागा – पण आखून दिलेल्या मर्यादेबाहेर जाल तर पक्षाबाहेर पडावे लागेल ' भांडवलशाहीमधील ' लिमिटेड कंपनी 'च्या व्यवस्थेत हे ' लिमिटेड समाजवादाचे ' उत्तर दिसते !

चव्हाणांच्या या इशाऱ्याला ऐतिहासिक दाखला आहे. पंडित नेहरू स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात व त्यानंतर काही दिवस समाजवाद्यांना असेच मर्यादित स्वातंत्र्य देत होते. नेहरूंच्या वृत्तितील एका रोमँटिक अशा धाग्याचा तो परिपाक होता. म. गांधींचा कर्मठ व हिंदुत्वाशी नाते राखणारा सर्वोदयवाद व सरदार पटेलांचा रोखठोक व स्थिरवादी राष्ट्रवाद यापेक्षा काही वेगळ्या अशा प्रणालीचे नेहरूंना आकर्षण होते. आपल्या नेतृत्वाला एक विशिष्ट वलय देण्यासाठीही त्यांनी समाजवाद्यांना हाताशी धरले. पण पक्षकारणाच्या आड येताच या समाजवाद्यांना बाहेरचा रस्ताच दाखविण्यात आला. पहिला समाजवादी पक्ष असा स्थापन झाला.

गेली दोन सव्वादोन वर्षे समाजवादी सूर धरून चव्हाणांना थोडासा "वियरीनेस" आला आहे. तसे ते हाडाचे समाजवादी नव्हतेच. म्हणून त्यांनी याप्रसंगी काँग्रेसी समाजवाद्यांना थोडासा घरचा आहेर देऊन ठेवला आहे. पक्षाच्या एका बैठकीत पंतप्रधान श्रीमती गांधी यांनी तरुण तुर्क चंद्रशेखर यांनाही वैतागून सांगून

टाकले होते, की तुम्ही पक्षाचे नेतृत्व बदलण्यास मोकळे आहात. चव्हाण साहेबांची थोडी निराळी तऱ्हा आहे इतकेच.

आता इशारा द्यावयाचा होता तर चव्हाण उद्घाटनाला तरी का आले? सगळीकडे थोडे थोडे पेरून ठेवायचे ही त्यांची राजकीय नीती आहे. निवडणुकीच्या आधी त्यांनी "आता लढा श्रीमंत शेतकऱ्यांविरुद्ध" अशी एक आरोळी मारून ठेवली होती. त्यानंतर आजतागायत यासंबंधी आपली भूमिका त्यांनी स्पष्ट केलेली नाही. त्यांच्या राजकारणाची चाल अशी 'सबरंगी' असल्यानेच त्यांना एकोणसत्तर साली जड गेले नाही. सिंडिकेटमध्ये नसलेले पण सिंडिकेटचा विरोधही नसलेले असे तेच एक काँग्रेस नेते 'त्या' वेळी होते हे लक्षात ठेवले पाहिजे.

महाराष्ट्र काँग्रेस फोरम फॉर सोशॅलिस्ट ॲक्शन याच्या स्थापनेविषयी विचार व्यक्त करताना चव्हाण साहेबांच्या भूमिकेविषयी एवढ्या विस्ताराने लिहिण्याचे कारण एवढेच, की या फोरममधील सर्व मंडळी चव्हाणसाहेबांचा वरदहस्त लाभलेली आहेत. त्यांना छत्रपती म्हणतात—त्यांचे कृपाछत्र लाभलेले सर्व 'कृपाछत्रपती' या फोरममध्ये आघाडीवर आहेत. महाराष्ट्र मंत्रीमंडळाने या फोरमची विशेष दखल घेतलेली नाही—महाराष्ट्रातील मान्यवर व लोकप्रिय काँग्रेस नेत्यांनीही (त्यात अर्थातच मंत्रीदेखील आले) याविषयी फारसा उल्हास दाखविलेला नाही. असे असता या सर्वांचे परात्पर नेते श्री. चव्हाण मात्र फोरमला आशीर्वाद देतात याचा अर्थ काय?

हे कळण्यासाठी महाराष्ट्राच्या राजकारणाकडे नजर वळवावी लागेल. 'निवडणुकांनी समाजवाद येत नसतो' हा वेदान्त सांगतानाच फोरममध्ये हिरीरीने निवडणुकीच्या तिकिटांसंबंधी कांही अटी घातल्या जातात याचे इंगित कळणे फारसे अवघड नाही. साहेबांना कारणपरत्वे नको असलेली मंडळी या फोरमच्या विचारांच्या व प्रचारांच्या टप्प्यात जास्त करून येतील व त्यांचे 'समाजवादी'त्व येत्या काही महिन्यात कसून तपासले जाईल हे उघड दिसते. या गोष्टीला 'गटबाजी' म्हणणे साहजिकच अवघड जाईल. पण तिची सर्व लक्षणे तीच असतील. 'तरुणतुर्क' या राजकीय गौडबंगालाची सरशी झाल्यापासून विरोधकांना निष्प्रभ करण्याचा एक नवीनच मार्ग खुला झाला आहे. प्रस्तुत फोरम हा त्या मार्गावरीलच एक प्रयत्न आहे.

फोरमच्या उत्पत्तीसंबंधी आणखी एका कारणाचा उल्लेख करणे अप्रस्तुत होणार नाही. १९६२ पर्यंत या देशावर काँग्रेसची एकछत्री सत्ता होती. तीच परिस्थिती १९७१ च्या मध्यावधी निवडणुकीनंतर निर्माण झाली आहे. एकपक्षीय राजवटीची अखंडता गृहीत धरूनच काँग्रेस पक्षाने घटना, योजना वगैरेंची आखणी केली होती. ही मध्यंतरी १९६२–१९६९ या काळात काहीशी विस्कळीत झाली होती. काँग्रेस दुभंगल्यानंतर तिचा कायाकल्प होऊन पुन्हा एकपक्षीय राजवटीची प्रदीर्घ शक्यता निर्माण झाली आहे. ही शक्यता वाढवावी, बळकट करावी यासाठी पक्षांतर्गत विरोधी

गटाचे तंत्र पुन्हा एकदा वापरात येत आहे. यात पक्षीय अहंकारही कमी नाही. विरोधी पक्ष नालायक म्हणून आम्ही सत्तेवर आलो व म्हणूनच आता विरोधी पक्षांचे कामही आम्हालाच करावे लागत आहे असा एक आविर्भाव या फोरममध्ये आहे.

समाजवादी विचारसरणीचा प्रचार हा फोरम करणार आहे ही फार स्तुत्य गोष्ट आहे. परंतु जनतेला समाजवादी विचार पटलेला आहे म्हणूनच समाजवादी विचाराच्या नेत्या श्रीमती गांधी यांना व त्यांच्या नवकाँग्रेस पक्षाला लोकांनी प्रचंड बहुमताने निवडून दिले. तेव्हा आता प्रचाराची आवश्यकता नाही. जनतेने नवकाँग्रेसला कोरा चेक दिलेला आहे. असे असता दहा कलमी कार्यक्रमाची ठराविक काळात अंमलबजावणी करण्याऐवजी काँग्रेस पक्ष पुन्हा पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करीत आहे हे आश्चर्यकारक होय. राजकीय पक्ष हा एका विचारप्रणालीने बनलेला असतो व ती मान्य नसलेली माणसे पक्षात राहू शकत नाहीत. तेव्हा आपल्याच पक्षातील काही जणांचे मतपरिवर्तन करण्याचा व त्यांना सुधारण्याचा देखावा फोरमच्या कार्यकर्त्यांनी करण्याचे काहीच कारण नाही. हे जर खरे नसेल तर काँग्रेसच्या मागील फाटाफुटीत काही तात्त्विक अधिष्ठान नव्हते व ती एक बेजबाबदार गटबाजी होती असा निर्णय इतिहास देईल आणि ज्या पक्षाला दोन वर्षातच पुन्हा सुधारण्याची वेळ येते त्या पक्षाची कुवत जनता पूर्णपणे ओळखील.

फोरमच्या कार्यकर्त्यांना जनतेची हीच विनंती राहील, की समाजवादी संथेचा पाठ लोकांना वेळीअवेळी व वारंवार देण्यापेक्षा आपल्या पक्ष-बैठकीतच आपले विचार ठासून मांडा. धोरण पक्के करून घ्या आणि अंमलबजावणीच्याबाबत काळ ठरवून घ्या. ही साधी गोष्ट करण्याऐवजी ' एका कुटुंबात एकच तिकीट ' असल्या हास्यास्पद घोषणा करण्यात हा फोरम जर वेळ घालवील तर परमेश्वरच समाजवादाचे रक्षण करो असे म्हणण्याची वेळ येईल.

आपल्याच पक्षात चाललेल्या गैरप्रकारांची या फोरमपैकी काही मंडळी जाहीरपणे संभावना करण्याचे धाडस दाखवीत आहेत, म्हणून एवढी तरी माफक अपेक्षा व्यक्त करण्यास हरकत नाही. नाहीपेक्षा ' आशीर्वाद ' मागून ' समाजवाद ' येत नसतो !

अनाठायी भावूकपणा हे भारतीय राजकारणाचे व समाजकारणाचे एक वैशिष्ट्यच आहे. समाजवादाच्या पोतडचात ज्या गोष्टी या फोरममधील वक्त्यांनी भरल्या त्या पाहून अचंबा वाटतो. असे मोघम वक्ते समाजवादाचा प्रचार तरी कसा करणार हे कळत नाही. समाजवादी तत्त्वज्ञान ही गोष्ट गुळमुळीत, दहीखाऊ महिखाऊ अशा प्रकारची नव्हे, ' तुम्ही चांगले–आम्ही चांगले ' अशा गर्दभ–उष्ट्र न्यायाने वागण्याचे ते एक निरुपद्रवी तंत्र नव्हे.

ते एक कडवे आर्थिक तत्त्वज्ञान आहे. त्याला शंभर वर्षांहून अधिक परंपरा आहे.

मानवी इतिहासाच्या तर्कशुद्ध अन्वयाने सिद्ध झालेले व अनेक देशात प्रयोगित होत असलेले ते एक एकसंध, तार्किक आणि अंतर्विरोधी तत्त्वज्ञान आहे. दोन भल्या गप्पा मारून आपण समाजवादी तत्त्वज्ञान सांगतो किंवा त्यात सुधारणा करतो असा आव आणणे बरे. आपले मंत्री व राजकारणी ज्या सहजतेने व वेगाने समाजवादाच्या व्याख्येत व तत्त्वज्ञानात बदल करतात ते पाहून अचंबा वाटतो. ' सर्वांमुखी मंगल बोलवावें ' असे ते हरदासी तत्त्वज्ञान नसून सर्व समाजाच्या योगक्षेमाचे, प्रगतीचे आणि प्रेरणेचे ते एक युगप्रवर्तक अस्त्र आहे. योग्य त्या साधनेशिवाय आणि संयमाशिवाय अस्त्राचा वापर करता येत नसतो.

समाजवादाकडे बघण्याचा सध्याचा कॅज्युअल दृष्टिकोन बदलण्याचे काम जरी या फोरमने थोडेफार केले तरी त्याच्या अस्तित्त्वाला अर्थ प्राप्त होईल.

□ □ □

---

## मुंबई वार्ता

पृष्ठ १२ वरून

मंत्र्यांना काढून टाकणार अशी बातमी जेव्हा उठली तेव्हा, ' बघाच तर काढून, पाहू या काय होते ते ', अशी त्यांची वृत्ती दिसली. मराठवाड्यातले बरेचसे मंत्री त्यांच्या विरुद्ध गले आहेत, कोणत्याही एका जिल्ह्याचा सॉलीड पाठिंबा त्यांना असल्याचे दिसत नाही. तरीही त्यांचा आत्मविश्वास जबरदस्त आहे. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी जाहीरपणे श्री. नाईक यांना आपला पाठिंबा दर्शविला आहे. त्याची शंकररावांना फारशी फिकीर नाही. परिस्थिती पाहून यशवंतराव आपले मत बदलू शकतात असे त्यांच्या गटाचे म्हणणे आहे.

गेल्या काही दिवसात श्री. शंकरराव चव्हाण यांची वक्तव्येही बरीच धारदार बनू लागली आहेत. मंत्र्यांना जमिनीची विभागणी करण्यात सचिवालयातले उच्च अधिकारी मदत करतात असे ते बोलल्याचे वृत्त छापून आले होते. दुसऱ्या दिवशी रीतसर त्याचा इन्कारही छापून आला. शंकरराव आता निकराच्या प्रयत्नाला लागले असल्याची ही लक्षणे आहेत असे काहीजण मानतात.

तेव्हा या अशा गडबडी चालू आहेत. युद्ध झालेच तर या प्रकरणांवर तात्पुरता पडदा पडेल. पण युद्ध होणार होणार या भीतीने रोजचे व्यवहार थोडेच थांबतात ?

□ □ □

शरद गोखले

# रंगभूमी

## आपली आवड

### एक अभिनव कार्यक्रम :

महाविद्यालयीन रंगमंचावर वावरणारी मंडळी पुढे दैनंदिन जीवनाच्या रगाड्यामध्ये उतरली, की कोणा एका काळी आपण गात होतो, नाटकात कामे करत होतो,–आदी बाबी 'ऐतिहासिक' होतात. फार थोड्या मंडळींना पुढे या ना त्या स्वरूपात आपल्या कलेची जपणूक करण्याची संधी मिळते. विश्वनाथ ओक यांनी संयोजित केलेल्या स्वरानंद या संस्थेच्या 'आपली आवड' या अभिनव कार्यक्रमामुळे अशी दुर्लभ संधी महाविद्यालयीन पातळीवरील युवक महोत्सवामध्ये यश मिळवणाऱ्या अनेक तरुण कलाकारांना प्राप्त झाली.

'आपली आवड' या कार्यक्रमाची कल्पनाही मोठी छान आहे. मराठी माणूस हा जात्याच रसिक. नाट्य संगीताची, चांगल्या भावगितांची, लोकप्रिय चित्रपट गीतांची त्याची भूक–आकाशवाणीवरील तुटपुंजे भिकार कार्यक्रम पूर्ण करू शकत नाहीत. स्वरानंदच्या बॅनरखाली एकत्र आलेल्या या मंडळींनी ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या आवडीची निवडक मराठी गाणी गोड गळ्यातून ऐकताना प्रेक्षक रंगून जातात. या कार्यक्रमामध्ये सुमारे बारा–पंधरा कलावंत भाग घेतात. साथीची मंडळी सोडून प्रत्यक्ष गाणाऱ्या कलावंतामध्ये शोभा जोशी सर्वोत्तम वाटल्या. माईक आणि रेकॉर्डिंगला सुयोग्य आवाज, चार–मिनटांच्या मर्यादेत गाणे बरोबर बेतून रंगवण्याचे कौशल्य, यामुळे त्यांची गीते चांगली रंगली. विसरशील खास मला आणि श्रावणात घननिळा बरसल्या–रिमझिम रेशिम धारा, ही त्यांची दोन्ही गीते, क्वचित टाळी देणाऱ्या पुणेकरांची पसंती घेऊन गेली.

'आपली आवड'–ची जमेची दुसरी मजबूत बाजू म्हणजे मीना हसबनीस यांनी सादर केलेली सुंदर गीते–जिवलगा राहिले रे दूर घर माझे आणि 'मुंबईचा जावई' मधील आज कुणि तरी यावे हे सुंदर चालीतील अर्थवाही गीत, त्यांनी अप्रतिम रंगवले. श्रवणीयतेला प्रेक्षणीयतेची जोड लाभल्याने त्यांचा कार्यक्रम दुग्ध-शर्करा योग असल्याचे जाणवले. त्यांचे 'कानडा विठ्ठलू' हे गीत मात्र भरपूर

गुण देण्याच्या योग्यतेचे झाले नाही. नाट्यगीते गाण्याऱ्या तिसऱ्या स्त्री-कलाकाराची गीते अगदी बेताची झाली.

सुधीर दातार, देसाओी, आणि अन्य एक गायक असे तीन गायक असूनही अशा कार्यक्रमामध्ये पुरुष व स्त्री गायकांमध्ये जो तोल संभाळला जाणे आवश्यक असते तो संभाळला जात नाही. शोभा जोशी, आणि मीना हसबनीस यांचे पारडे सरळ सरळ जड राहाते. "भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी, अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहाणी"! हे गायकीला सोपे असलेले गीत, अपवाद म्हणून सोडलेले गाणे वगळता, पुरुष कलावंतांनी गायलेल्या गाण्यांपैकी एकही गाणे लक्षात राहण्याइतकेही सरस वाटले नाही. सागरा प्राण तळमळला,—या गीताने कार्यक्रमाचा समारोप करण्याची कल्पना चांगली वाटली.

## आशीर्वादासाठी पु. लं.

स्वरानंदच्या या कार्यक्रमामध्ये कौतुक सोहळ्याचा कार्यक्रम झाला. सर्वसाधारण परिस्थितीमध्ये त्रासदायक ठरू शकणारा हा कार्यक्रम पु. ल. देशपांडे यांच्या रंगतदार—आटोपशीर भाषणामुळे छान रंगला.

आशीर्वाद मागण्यासाठी मंडळींनी माझ्याकडे यावे, म्हणजे आशिर्वाद देण्यासारखा मी दिसू लागलो, ही कल्पना काही सुखावह नाही. असे सांगून पुलंनी आपण सर्वांतर्फे कलावंतांचे अभिनंदन करण्यासाठी उभे असल्याचे सांगितले. लाइट म्यूझिकला हलके संगीत न म्हणता, ते झटकन रंगणारे असल्याने प्रकाशमान संगीत म्हणावे, तीन तीन तास गाणाऱ्या कलावंतांना वेळेचे बाबतीत जो सैलपणा मिळू शकतो, तो मिनटांचे भावगीत गाणाऱ्या कलावंता—साथीदारांना मिळत नाही. हुकलेली कोणतीही जागा पुन्हा मिळत नाही, त्यामुळे शिकाऱ्याच्या तल्लखतेने त्याला जागरुक राहावे लागते. भावगीतामध्ये भावाला—जीव ओतून गाण्याला—फार महत्त्व असते, समोरील चोपडीमध्ये बघून गाणे गाणारा कलावंत—गाण्याशी एकरूप होणे कठीण आणि गायकाने, गाताना जीव ओतला नाही आणि अलिप्ततेने गाणे गायले तर श्रोता रंगणार कसा? आम्ही तीन—तीन तासाच्या नकला पाठ करतो तिथे तीन मिनटांचे गाणे पाठ करण्यासाठी कलावंताने कच खाऊ नये असा सल्लाही पू. लं.नी दिला.

तरुण मंडळींनी उत्साहाने सादर केलेला हा अडीच—तीन तासांचा रसीला कार्यक्रम आवडला, तथापी पैसे मोजून येणाऱ्या प्रेक्षकाला या कार्यक्रमाने आनंद दिला, तरी पूर्ण वसूली मात्र अजूनही होत नाही. त्यासाठी पुरुष-गायकांची बाजू अधिक मजबूत होणे आवश्यक आहे आणि गाण्यांच्या निवडीमध्येही जास्तीत जास्त ताजेपणा राहावा ही अपेक्षा आहे.

□ □ □

 पृष्ठ ८ वरून

करणाऱ्या स्थानिक लोकांना सुमारे ८० ते ९० रुपये मेहनताना मिळे, तर सर्वश्री दाते, सहस्रबुद्धे यांच्यासारख्यांना थोडे जास्त मिळत असे. स्थानिक लोकांचा सवाल असे, ही तफावत का ? पण ही मंडळी महिना दोन दोन हजार रुपये प्राप्तीवर पाणी सोडून आलेली होती, हा विचारच त्यांनी केला नव्हता. विनोबांनी ते सांभाळून घ्यायला हवे होते. स्थानिक लोकांना ते समजावून सांगायला हवे होते. विनोबांनी तसे ते सांगितले असते तर लोकांना ते जरूर पटले असते. कार्य पुढे चालू राहिले असते; पण दुर्दैवाने तसे काही घडलेच नाही. एक फार मोठी संधी वाया गेली. इतरांचा आग्रह मान्य करून, कोरापूटकडे जाण्याऐवजी ते महाराष्ट्रात आले.

भूदान चळवळीला यश प्राप्त होत होते अशा वेळी, दूरदृष्टी असलेल्या व्यक्तीने, प्रचंड जमीन भूदानात मिळणार, तेव्हा त्याचे वाटप योग्य रीतीने होण्याच्या प्रक्रियेसाठी खूप कार्यकर्ते लागणार, हे वेळीच हेरून प्रशिक्षीत कार्यकर्ते तयार करण्यासाठी आश्रम स्थापन केला. पण हेही आव्हान विरून गेले. दुसरी एक संधी हातातून गेली. असे काही घडले असते तर सर्वोदय चळवळीपाशी लाखो कार्यकर्त्यांची फौज उभी राहिली असती. ग्रामस्वराज्याची कल्पना योग्य प्रकारे कार्यान्वित झाली असती. पण दुर्दैवाने संघटना बांधली गेलीच नाही. त्यामुळेच सर्वोदयी कार्यकर्त्यांनी कार्य करायचे व त्याची मधूर फळे इतरांनी चाखायची असेच नेहमी घडत गेले आहे.

भाऊ मुंदडा यांच्याशी सर्वोदयावर खूप चर्चा करायची इच्छा होती, पण तितका वेळ नव्हता. भुसावळकडे जाणारी गाडीही स्टेशनात येऊन ठेपली होती. त्याच गडबडीत चर्चेचे सूत्रही गडबडले.

सातपुडा भागाशी माझा प्रथम संबंध आलातो बालवयात. दुसरी तिसरीच्या वर्गात शिकत असताना केव्हातरी. भूगोलात सातपुडा आणि तेथील अर्धनग्न भिल्लांचा अभ्यास तेव्हा केला होता. पण गेल्या आठवड्यातील तेथील दौऱ्यात त्या भागाशी, तेथील आदिवासींच्या प्रश्नांशी प्रत्यक्ष संबंध आला. धुळ्याकडून शहाद्याकडे जाताना बसमध्ये एक भिल्ल 'सावली' माझ्या समोरच बसलेली होती. काडीसारखी देहयष्टी असलेली ती सावली नव्या पिढीतील आहे हे दर्शविणारा एकमेव पुरावा म्हणजे त्याचा हातभर फाटलेला लेहंगा, मळकट लालभडक शर्ट. भिल्लांना दारिद्र्यामुळे अर्धनग्नावस्थेत दिवस काढावे लागतात हे लहानपणापासून मनात बिंबलेले. त्यामुळे त्या चित्राला कुठेतरी तडा गेला होता. फाटके का होईना पण अंगभर कपडे घालायला मिळत आहेत हे पाहून बरेही वाटत होते. सातपुड्याच्या जवळ जसा मी जात होतो तसा तेथील जीवनाचा प्रत्यय येत होता. तरीही सातपुडा पर्वतराजीतील अंतर्भागात मी गेलोच नाही. तेथील खडतर जीवन पाहायला

मिळालेच नाही; मात्र त्यासंबंधी खूप ऐकले. मनाला यातना व्हाव्यात अशी तेथील परिस्थिती.

शहरात बसून समाजसुधारणेच्या गप्पा मारणे, समाजवादावर चवीने चर्चा करणे किंवा 'गरिबी हटावो' व तत्सम घोषणा करणे फार फार सोपे आहे. ज्याने तेथील खडतर जीवनांचा एकदा तरी अनुभव घेतला आहे असा माणूस तेथे पुन्हा जायला धजावेल की नाही याबद्दल शंकाच वाटते.

तेथील आदिवासींची भाषा अपरिचित. आपली भाषा त्यांना समजणे कठीण. त्यांच्यावर चांगले संस्कार नाहीत. सतत दारूत चिंब बुडायचे हा तेथील प्रघात.

जमीनदारी जोरात. अन्यायाला सीमेचे तसे बंधन नाही. अशा या आदिवासींमध्ये एखाद्या संस्कारित माणसाने जाऊन राहाणे, त्या लोकांना समजावून घेणे, त्यांचा विश्वास संपादून घेणे. त्यांच्या सवयी व राहाणी बदलायला लावणे आणि त्यांना योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करून त्यांच्यात जागृती करणे हे काम काही सोपे नाही. शासनकर्ता पक्ष सोडाच; कोणत्याही डाव्या पक्षाला तेथे कार्य करण्याची बुद्धी अद्याप सुचलेली नाही. देशातील असे भाग व उपेक्षित ग्रामीण भाग यांच्याशी संपर्क फक्त सर्वोदयी कार्यकर्तेच ठेवू शकतात हे एक सत्य आहे.

धडगाव. सातपुडा पर्वत रांजीतील चौथ्या रांगेत वसलेले गाव.

भाऊ मुंदडा गेली दहा वर्षे या ठिकाणी ठाण मांडून बसले आहेत. स्वतःच्या हिमतीवर त्यांनी पैसा उभारून तेथील कार्य हाती घेतले. आदिवासी पोरांना शाळेत आणायचे. त्यांना खाऊ घालायचे त्यांना शिक्षणाचा लाभ द्यायचा हे कार्य गेली दहा वर्षे अविरतपणे चालू आहे. त्यांच्या प्रयत्नाचे फलित म्हणजे बाबा दौल्या वळवी, अंबरसिंग यांच्यासारखे कार्यकर्ते त्यांनी तयार केले आहेत. एक, दोन नव्हे तर तब्बल १५० सर्वोदयी कार्यकर्ते त्यांनी तयार केले आहेत. अंबरसिंगसारखा भूमिस्पर्श असलेला कार्यकर्ता आपल्या पक्षापाशी नाही म्हणून धुळ्याकडचे डावे गट हळहळत आहेत. अनेक आदिवासींना भाऊंनी दारू सोडायला लावली आहे. आदिवासींच्या समस्या फार मोठ्या आहेत. तेथे मलेरियाचा प्रादुर्भाव जोरात. असंख्य पोरं मुडदुसाने पछाडलेली. नागडी पोरं. खायला नाही. बाळंत होईपर्यंत गरोदर आदिवासी बाई शेतात राबते. तेथेच बाळंत होते. आजारी वा रोगी माणसाला वैद्यकीय मदतीसाठी २५ ते ३० मैलांवर यावे लागते. स्वतःला सामाजिक कार्यकर्ते म्हणवणारे मुंबई-पुण्याकडील डॉक्टर्स नोकरी म्हणूनही तेथे प्रॅक्टिस करायला तयार नाहीत. आता निदान कामचलाऊ रस्ता तरी आहे त्यामुळे एस्. टी. ची बस सहा महिन्यांपुरती जाऊ शकते. पण पूर्वी २६ ते २८ मैलांचे अंतर पायी चालून जावे लागत असे. आजही पावसाळ्यात हीच अवस्था असते पण अशाही परिस्थितीत भाऊ सातत्याने तेथे काम करीत आहेत. त्यांना दोनदा हृदयविकाराचा झटका येऊन गेला आहे. तरीही कार्य अविरतपणे चालूच आहे.

वर्ध्यांसारख्या ठिकाणी राहात होते. विनोबांचे सचिव म्हणून काम पाहात होते. विनोबांचा विरोध पत्करूनही ते आपले कुटुंब वर्धा येथेच ठेवून धडगाव येथे राहिले. एवढे प्रचंड कार्य असलेल्या भाऊंना त्या अफाट विखुरलेल्या प्रदेशांतील गावागावांतून फिरण्यासाठी एक साधी वा मोडकीतोडकी जीप मिळत नाही. ठरलेल्या ठिकाणी वेळेवर पोहचता यावे यासाठी परवा रात्री ते शहाद्याच्या एस्. टी. स्टॅन्डवर झोपले. सुमारे दीड-दोन तास झोप मिळाली असेल नसेल. पहाटे दोन अडीच वाजता ते उठले.

पण अशा या माणसावर अनेक आरोप होतात. स्वतःच्या हुशारीवर शिष्यवृत्ती मिळवून त्यांची मुले परदेशी गेली, पण एका सर्वोदयी कार्यकर्त्याची मुले परदेशी जातातच कशी, अशी कुजबुज सुरू झाली. ते मनात आणते तर केंद्रिय सरकार वा राज्य सरकारात मंत्री होणे त्यांना बिलकूल अशक्य नव्हते. कारण भाऊ हे गांधी, नेहरू, सरदार पटेल व विनोबा यांच्या निकटवर्तीयांपैकी. निवडणूक लढविण्याची विनंतीही त्यांना सरदारांतर्फे करण्यात करण्यात आली होती. पण त्यांनी तिकिटच नाकारले. कारण काय तर सर्वोदयाच्या कामासाठी तन-मन-धन अर्पण केले आहे, तेव्हा हातून तेच कार्य व्हावे म्हणून.

ढिला कारभार हा भाऊंचा दोष. जोपर्यंत त्यांचा उपयोग होतो आहे असे सत्ताधाऱ्यांना वाटले तोपर्यंत त्यांनी त्या दोषाकडे डोळेझाक केली. पण ते करीत असलेली आदिवासींमधील जागृती केव्हातरी आपल्या हितसंबंधाना बाध आणील असे दिसू लागताच त्यांच्यावर आरोप होऊ लागले. त्यांच्या चारित्र्यहननाची 'व्हिस्पर कॅम्पेन' उघडण्यात आली.

---

## सालदार

शेतमजुरांना तेथे सालदार म्हणतात. वर्षाच्या कराराने ते शेतमजुरी करतात. अक्षय्यतृतीयेला सारा खर्च हिशेब पूर्ण होऊन तो पुढील वर्षासाठी करार करायला मोकळा होतो. पण तेही सर्व कर्जफेड वगैरे पूर्ण असल्यासच.

त्याला पूर्वीपासूनच कडक वागणूक मिळत आली आहे. त्याचा दिनक्रम साधारणपणे पुढीलप्रमाणे असतो. ४ वाजता उठणे, पाणी भरणे, गोठा साफ करणे, गुरांचा दाणापाणी करणे. हे घरातील काम आटोपेपर्यंत ७ ते ७॥ होतात. मग सुमारे तासभर सुट्टी. ८॥ पासून हंगामानुसार शेतावर जाणे. नंतर कामानुसार दुपारची थोडी सुट्टी. मग पुन्हा रात्री घरची कामे. बैल गोठा, गाद्या टाकणे वगैरे काम. काही वेळा दुपारी विश्रांतीही मिळत नाही. हे सारे रात्रीपर्यंत चालते. ◻

---

भाऊंना पाठीशी घालण्याचा प्रयत्न येथे मुळीच चाललेला नाही. पण वस्तुस्थिती आहे ही अशी आहे. त्यांच्या दोषांबद्दल त्यांना शिक्षा मिळाली पाहिजे असे वाटणाऱ्यांना त्यांच्यापेक्षा अधिक दोषी दिसत नाहीत का ?

शहादे तालुका सध्या प्रकाशात आहे. भूमिहीनांचे, शेतमजूरांचे, गरिबांचे दीन दलितांचे प्रश्न सबंध देशभरच गाजत आहेत. सातपुड्यातही हे प्रश्न आज पुढे आले आहेत. भाऊ मुंदडा आणि त्यांचे सर्वोदयी कार्यकर्ते यांनी तेथे केलेल्या जागृतीचे परिणाम दिसू लागले आहेत. पाटीलवाडी प्रकरणातून हे प्रश्न चव्हाट्यावर आले. सातपुडा भागातील जमीन अत्यंत सुपीक आहे. तेथे जमीनदारीही जोरात आहे. गेल्या पाच वर्षात तेथे ५१ ट्रॅक्टर्स शेतावर फिरू लागले असे तेथील एका माहीतगाराने मला सांगितले. हे तेथील सधनतेचे लक्षण नाही काय ? हे ट्रॅक्टर्स काही भूमिहीन आदिवासींनी विकत घेतले नाहीत. धड ज्यांना दहा बारा आणे मजुरी मिळत नाही असे हे आदिवासी किती काळ दबून राहणार ? ७५ पैशांवर मजुरी दिली जाऊ नये अशी परवाच त्या भागात दवंडी पिटली गेली. दिवसभर मरमर मरायचं आणि त्या कष्टांची किंमत पूर्ण रुपायाही नाही हे किती दिवस चालायचं. एखादा दिवस असा उजाडेल, की कष्टकऱ्यांच्या घामाचे जे पाट वाहतील त्यात जमीनदारीची धूप होईल. पण हा शहाणपणा जमीनदारांच्यात आहेच कुठे.. शहाद्यातील एक स्वतंत्र विचारबुद्धीचे व निःपक्षपाती गृहस्थ म्हणाले ' येथे ओढही जीवंत आहेत, पण जमीनदारांना पाझर फुटत नाही. ' त्यांनीच जमीनदार आणि आदिवासींबद्दल खूप काही सांगितले–

–' भिल्लांच्या टोळक्या उभी पीके कापून नेतात तर जमीनदार विषारी दाणे खायला घालून आदिवासींच्या कोंबड्या ठार करतात. काळाची पावले ओळखून, जमीनदार व विशेषतः गुजर जमीनदार भूमिहीनांची जमिनीची भूक जाणून काही त्याग करतील आणि त्यांच्या ताब्यातील अधिक जमीन सहजासहजी देतील अशी शक्यताच कमी. कारण त्यांची भूमिका आहे ती अशी, की येथील जंगले साफ करून व कष्ट करून आम्ही जमिनीची मशागत केली आहे. मग ती आम्ही का सोडावी ? : शिवाय सत्तारूढ पक्षाच्या येथील शाखेत प्रामुख्याने भरणा आहे तो गुजरांचा. तेव्हा शासनावर दडपणे आणणे त्यांना सहज शक्य आहे.

–' अजूनही येथे साम्यवादी विचारसरणीचा प्रार्दुभाव झालेला नाही. पण पोटाची आग भागली नाही की स्वाभाविकपणे पावले तेथे वळली जातात. '

–' इतरांना तेथे पाय रोवणे थोडे अशक्यच आहे. पण नक्षलवादी तेथे शिरले तर ते तात्काळ तेथे बस्तान बसवू शकतील. कारण आज अनेक वर्षे येथे त्यासाठी आवश्यक असलेली पार्श्वभूमी तयार आहे. शासनपक्षासह इतर सर्वच पक्षांनी आपापल्या सोईप्रमाणे वेळप्रसंगी आदिवासींचे प्रश्न हाती घेऊन त्याकडे नंतर दुर्लक्ष केले आहे. म्हणूनच आदिवासींचे प्रश्न आहेत तेथेच रेंगाळलेले आहेत. '

—' म्हणूनच आदिवासींनी कोणत्याही पक्षाच्या कुबड्या घेऊ नयेत. त्यांच्यातच एखादा मार्टिन ल्यूथर किंग निर्माण होणे आवश्यक आहे. त्यांची–आदिवासींची–' इझी मनी 'ची प्रवृत्तीही जाणे आवश्यक आहे. अंबरसिंग साम्यवादी नाही. सर्वोदयी आहे. तो प्रामाणिक पोटतिडिक असलेला तरुण कार्यकर्ता आहे.

–ज्याने अजून राजकारण पाहिले नाही तो राजकारण काय खेळणार ?'

जनसंघाचे शहाद्यातील एक कार्यकर्ते म्हणाले, की अक्षय्यतृतीयेला सालदारकीचे करार करणे आणि मजुरांना आगावू धान्यवाटप करणे हा येथील प्रघात आहे. सुमारे एप्रिल ते जुलै या काळात आदिवासींना काम नसते व त्याबद्दल त्यांना आगावू धान्य दिले जाते. त्यात त्यांचे शोषण होतेच. कारण रुपया मजुरीऐवजी आठ आण्याचे धान्य त्यांना दिले जाते. अशिक्षीत आदिवासी हे जाणू शकत नाहीत.

त्यांनी केलेला एक आरोप फारच गंभीर आहे. पाहणीसाठी व चौकशीसाठी तेथे जाणारे बहुतेक सर्व सरकारी अधिकारी, बडे पोलीस अधिकारी यांची उतरायची सोय एका साखर कारखान्याच्या गेस्ट हाऊसमध्ये असते. त्यामुळे त्यांच्यावर दडपण येऊन ते योग्य प्रकारे काम करीत नाहीत.

जनसंघासारख्या कट्टर साम्यवादविरोध पक्षाच्या कार्यकर्त्यांनेही प्रांजळ निर्वाळा दिला, की तेथे साम्यवाद अजून आलेला नाही; पण वेळीच उपाययोजना न झाल्यास मात्र हा धोका टाळणे अशक्य आहे.

पाटीलवाडी व आसपासच्या भागातील सीलिंगपेक्षा अधिक असलेल्या जमिनीबद्दल ते म्हणाले की, पाटीलवाडीच्या भागातील आदिवासी मेहनत करून खाणारे आहेत आणि श्री. पाटील यांना सरकारने जमीन संशोधनासाठी दिली होती. पण आता तरी तेथे संशोधन होतच नाही. म्हणूनच ती जमीन आदिवासींना मिळणे आवश्यक आहे. मात्र शेत मिळाले तर काम न करणे, ते विकणे, कर्जबाजारी होणे ह्या त्यांच्या प्रावृतीत बदल होणेही आवश्यक आहे.

श्री. फकिरा जयराम (शहादा पंचायत समितीचे सभापती–काँग्रेसचे पुढारी व गुजर समाजाचे नेते) यांचे या प्रश्नावरील विचार वेगळे आहेत. सरकारने आदिवासींच्या कल्याणाच्या अनेक योजना पार पाडल्या आहेत. (३५० विहिरी खोदून देणे, बी बियाणांवर सबसिडी देणे, पंपसेट्स् बसवून देणे, बैलजोडी वगैरे देणे यांसारख्या) पण ते त्याचा उपयोग करून घेत नाहीत. बैल विकणे, बी-बीयाणे विकणे हा धंदा ते सर्रास करतात, बाहेरील वंजारी मजूर शहाद्यात येऊन पैसा करून जातात तर तेथील आदिवासी आळशीपणा करतात. तेव्हा जो पिकवीत नाही त्याला पिकवणाऱ्याकडून जमीन काढून घेऊन देण्यात काय हशील आहे ? त्यामुळे सारी अर्थव्यवस्थाच पार कोसळणार नाही का ? असाही सवाल ते करतात.

गुजर समाजातील इतरांप्रमाणेच त्यांनाही असं वाटतं, की या प्रश्नात गुजर समाजावर अन्याय झाला आहे.

ही झाली त्या भागातील काही लोकांची प्रातिनिधिक मते. पण येथे महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होत आहे, तो कायदेशीर शोषणाचा. श्री. विश्राम पाटील यांना सरकारने दिलेली जमीन ही आता कायदेशीरपणे त्यांच्या मालकीची झाली आहे. सीलिंगचा कायदा येईल तेव्हा येईल, पण तोपर्यंत प्रत्येक छोटा–बडा जमीनदार सीलिंगपेक्षा जादा असलेली जमीन कायदेशीररीत्या आपल्या व आपल्या कुटुंबी-यांच्या मालकी हक्कातच राहील असा प्रयत्न करील. मग सिलिंगलाही काय अर्थ उरतो ?

दहा-बारा आणे मजुरीवर काम करणारा आदिवासी झिजून मेला तर कोणाच्या बापाचे काय जाणार आहे ? पण त्यांच्यात थोडी जागृती होऊन तो हालचाल करू लागला की तो नक्षलवादी ठरतो ! सत्ताधाऱ्यांपुढे नक्षलवादाचे बुजगावणे नाचवले की काम फत्तेच. मग मवाळ सर्वोदयी कार्यकर्ताही जहाल ठरतो. निरुपद्रवी सर्वोदयी कार्यकर्ते कसला कपाळाचा नक्षलवाद आणणार ? खरं म्हणजे त्यांनी आता अधिक लढावू बाणा अंगी बाणवला पाहिजे. पण तेही विनोबा, जयप्रकाश ह्या त्यांच्या नेत्यांप्रमाणेच आव्हानाला सामोरे न जाणारे.

आदिवासी भागात दारिद्र्य तर इतके अफाट, की अल्प किंमतीतही तो विकला जाऊ शकतो, पण आता जागृत होत असलेला आदिवासी तेथेच रखडत राहील अशी शक्यता कमीच. तो उठणारच आणि मग त्याच्यापुढे पर्याय नसेल; त्याची कोंडी होणार असेल तर चक्रव्यूहात अडकलेला तो आदिवासी जिव्हारी घाव घालूनच ती कोंडी फोडायचा प्रयत्न करणार. नक्षलवाद हा असा फोफावतो; पण कायदेशीर शोषण करणाऱ्यांना त्याचे काय ? त्याना भान आहे ते आपल्या जमिनी टिकविण्याचे.

**– विजय वैद्य**



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

# ‘ रुपया पुस्तक ’ योजनेसंबंधी आणखी थोडे

‘ रुपया पुस्तक ’ योजनेची मुदत १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर १९७१ पर्यंत आहे.

योजनेत सहभागी होणाऱ्यांनी पाच वर्षांची वर्गणी रुपये शंभर फक्त प्रथम जमा करावयाची आहे. म्हणजे ‘ माणूस ’ अंक पाच वर्षांसाठी चालू राहील.

रक्कम मनीऑर्डरने किंवा ड्राफ्टने ‘ साप्ताहिक माणूस ’ या नावावर पाठवावी. चेक असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवणे अवश्यक आहे. सोबतच्या पत्रात ‘ रुपया योजना ’ असा स्पष्ट खुलासा असावा.

वर्गणी जमा झाल्यावर ‘ रुपया पुस्तक ’ योजनेतील पहिल्या पाच पुस्तकांच्या गटाचे (पुरंदरे वाङ्मय) वाटप ताबडतोब होईल.

कार्यालयात शंभर रुपये रोख वर्गणी वरील मुदतीत भरणाऱ्यास या योजनेतील ‘ पुरंदरे ’ गटाची पाच पुस्तके प्रत्येकी एक रुपया याप्रमाणे पांच रुपये किमत वेगळी जमा केल्यावर जागच्याजागीच देण्यात येतील.

या पुस्तकांचा पाठवणी खर्च (टपाल व पॅकिंग इत्यादी) वर्गणीदारांनी भरावयाचा आहे. हा खर्च अधिक प्रत्येकी एक रुपया प्रमाणे होणारी पाच पुस्तकांची पाच रुपये ही किमत मिळून एकूण रकमेची व्ही. पी. वर्गणीदारांकडे जानेवारी अखेर पाठवली जाईल. ही व्ही. पी. सोडवून घेण्याचे बंधन वर्गणीदारारांवर आहे.

योजनेतील दुसऱ्या पाच पुस्तकांचा गट एक किंवा दोन हप्त्यात ऑक्टोबर १९७२ पूर्वी वर्गणीदारांच्या हाती पडेल. पुस्तके घेताना प्रत्येकी रुपया याप्रमाणे होणारी किमत वर्गणीदारांनी भरावयाची किंवा सोसावयाची आहे. टपाल पॅकिंग इ. खर्च वर्गणीदारांकडे.

‘ सलामी योजना ’ व ‘ रुपया योजना ’ या दोन स्वतंत्र योजना असल्याने या दोन्ही योजनेतील पुस्तकांचे गट वेगवेगळे आहेत. गटातील पुस्तकांची अदलाबदल होऊ शकणार नाही.

‘ माणूस ’चे चालू वार्षिक वर्गणीदार पुढील पाच वर्षांसाठी शंभर रुपये वर्गणी भरून या ‘ रुपया पुस्तक ’ योजनेत सहभागी होऊ शकतील.

साप्ताहिक माणूस, नागनाथपाराजवळ, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० / दूरध्वनी : ५७३५९

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH 649




"हं ! सांगा पाहू, सर्वांत अधिक समाजवादी कोण ? जुन्या काँग्रेस-मधील नवे की नव्या काँग्रेसमधील जुने, की जुन्या काँग्रेसमधील जुने की नव्या काँग्रेसमधील नवे, की जुन्या काँग्रेसमधील अतिजुने की नव्या काँग्रेसमधील अति नवे की...